**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 80/2008.**

श्री विलास कृष्णराव बालपांडे
रा. डॉ. वाडीयाचा दवाखाना मागे,
के. डी. गौरचा घराजवळ,
हंसापूरी नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री धिरज कुमार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
नझूल अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी नझूल विभाग जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे दि. 17.10.2007 रोजी मेयो हॉस्पीटल कंम्पा>ड येथील दुकान नं. 1 अ चे पुनर्वसन अर्जावर कोणती कार्यवाही करण्यात आली. सोबत दि. 17.10.2007 रोजीचे अर्जाची प्रत जोडलेली आहे.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.12.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति. जिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 11.12.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता अर्जदार यांच्या दि.15.10.07 रोजी सादर केलेल्या अर्जानुसार मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी अशा प्रकारचा आदेश दिलेला दिसून येतो. परंतु आदेशामध्ये स्पष्टपणे विश्लेषण केलेले नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. 18.12.2007 रोजी मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर येथे मेयो हॉस्पीटल कंम्पा>ड जनरल मर्चंट असोसिऐशन यांनी 90 दुकानदारांची जी यादी मा. उच्च न्यायालयातील रिट याचीकेत सादर केली आहे त्याची प्रत यासोबत सलग्न करण्यात येत आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय अपील मेमोमध्ये पुनर्वसन करण्याचे दि. 17.10.2007 ला अपीलकाराने दिलेले अर्जावर माहिती असे वर्णन व स्वरुप दिलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांच्या दि. 17.10.2007 चे अर्जावर काय कार्यवाही केली याबाबतची माहिती त्यांना दिली नसुन दुकानदारांची यादी दिलेली आहे. विहित मुदतीत माहिती दिलेली नाही व जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या

माहितीचे अवलोकन केले असता मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे जनरल मर्चंट असोसिऐेशन यांनी 90 दुकानदारांची जी यादी मा. उच्च न्यायालयातील रिट याचीकेत सादर केली आहे त्याची प्रत जोडण्यात आलेली आहे परंतु दि. 17.10.2007 चे अर्जावर काय कार्यवाही केली ती माहिती दिली नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सदरच्या प्रकरणातील तपशिल हा आयोगाचे निदर्शनास आणल्यावर असे दिसून येते की अपीलकर्ता यांना या सर्व प्रकारणाची माहिती आहे. मा. उच्च न्यायालयातील याचीकेचीसुध्दा माहिती आहे असे दिसून येते. व त्यामुळे दि. 17.10.2007 चा जो अर्ज आहे त्या अर्जाच्या संदर्भात झालेली कार्यवाही एवढेच उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. व ती त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणामध्ये गुणवत्तेच्याबाबत निर्णय प्रक्रिया करणे अनेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 25.10.2007 च्या अर्जात त्यांच्या दि. 17.10.2007 च्या मुळ अर्जा वर केलेल्या कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी

व्यक्तीशः हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधुन सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.539–542

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 81/2008.**

श्री अशोक बुंदीवाल

द्वारा स्वस्तीक इंजिनिअरींग,

8 इमामवाडा ले आ>ट

आशिर्वाद सिनेमाजवळ, ग्रेट नागरोड,

नागपूर 440003. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री लुंगे

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अधीक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ,

सिव्हील लाईन्स नागपूर

2) श्री सुखदेवे

जन माहिती अधिकारी तथा

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1

सदर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ..200 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे.

उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.7.2007 रोजी (दि. 2.7.2007 प्राप्त) जन माहिती अधिकारी सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. 1 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. What is the status and progress for the work: Providing & Applying Thermoplastic Marking and Fixing Sign & Caution Boards in the premises of High Court Nagpur Agreement No. B1/ 144/DL/2005-06

2. How much payment has been made for the above work

3. How much payment is still to be made.

4. I would like to have copy of measurement book and Bill prepared for the above work. I am ready to pay the requisite amount for the same. So kindly intimate me amount to be deposited for the same.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 17.7.2007 रोजी अपीलकर्ता यांना उच्च न्यायालय इमारतीचे बांधकाम सा. बां. उपविभाग क्र. 2 तर्फे करण्यात आलेले होते. बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सा. बां. उपविभाग क्र. 2 नागपूर यांनी सदर इमारतीचे कोणतीही कागदपत्रे अथवा दस्ताऐवज या कार्यालयास न दिल्यामुळे विषयांकित माहिती पुरविणे या कार्यालयास शक्य होणार नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 31.8.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम मंडळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलास कोणत्याही प्रकारचा कोर्ट फी स्टॅम्प लावलेला नसल्यामुळे दि. 14.9.2007 रोजी मुद्रांक

जोडून अपील दाखल करता येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 12.10.2007 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 21.11.2007 रोजी माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी असा निर्णय देवून अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर सुध्दा दि. 26.12.2007 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार केलेला दिसून येतो. त्यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 1.7.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की त्यांचेकडे माहिती उपलब्ध नव्हती व त्याकरीता संबंधित उपविभागीय अभियंता यांना माहिती उपलब्ध करुन दयावी अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येते. परंतु उपविभागीय अभियंता यांनी माहिती दि. 31.8.2008 पर्यंतसुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही असे दिसून येते. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

4. अपीलकर्ता यांच्या दि. 1.7.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता वर नमुद केल्याप्रमाणे उपविभागीय अभियंता यांना वेळोवेळी आदेश दिलेले दिसून येतात परंतु तरीसुध्दा माहिती विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता ज्या कनिष्ठ अधिकारी किंवा कर्मचारी यांचे सहाय्य घेतलेले असेल अशा अधिकारी किंवा कर्मचारी यांना सुध्दा अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते व अशा अधिकारी किंवा कर्मचा–यानी माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला असेल तर ते अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक ठरते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दि. 1.7.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत मागितलेली माहिती रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 1.7.2007 च्या (दि. 2.7.2007) अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे व जन माहिती अधिकारी यांनी कनिष्ठ अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता वेळोवेळी आदेश दिलेले असले तरी सदरची माहिती ही द्वितीय अपील दाखल होईपर्यंत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे संबंधित कनिष्ठ अधिकारी यांना सुध्दा अधिनियमाच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येत आहे व त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **मुख्य अभियंता नागपूर** यांनी करावयाची असून त्यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.543–546

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे‍त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 88/2008.**

श्री रामसागर पुंडलीक पिलेवान
83 हिंदुस्थान कॉलनी वर्धा रोड
नागपूर 440015. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी भंडारा
2) श्री आर. आर. कुंभारे
जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.9.2007 रोजी शासकीय जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी महसूल भंडारा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा पवनी जिल्हा भंडारा येथील न.भू.क्र.2382 क्षेत्र 285.1 चौ.मि. पैकी अर्जदाराचे वडिलोपार्जित असलेल्या जागेवरील मिळकतीची (घराची) गैरअर्जदार 1. भाउराव देवाजी गजभिये 2. दिनेश भाउराव गजभिये यांनी घरफोडी करुन तसेच दिपकभाई माईलालभाई पटेल व दमयंतीबाई धर्मदास तागडे हयांनी अर्जदारची जागा हडप करुन व बळजबरीने कबज्यात घेवून त्यावर अवैध बांधकाम केल्याबद्यल.

2) मा. जिल्हाधिकारी भंडारा यांचे स्वाक्षरीचे कार्यालयीन पत्र क्र. कार्या 12/अका/नपा प्र/कावि/505/2006 दि. 14 जुलै 2006 अन्वये उपरोक्त प्रकरणी उपविभागीय भंडारा यांना लिहीलेल्या पत्रानूसार उपविभागीय अधिकारी भंडारा यांनी केलेल्या चौकशी अहवाल व त्या अनुषंगाने मा. जिल्हाधिकारी भंडारा यांना सादर केलेला चौकशी अहवालासहीत केलेल्या कार्यवाहीची सांक्षांकित प्रत पुरविण्यात यावी. माहितीचा कालावधी 2.2.2006 व 14.7.2006 असा आहे.

सदरची माहिती साध्या टपालाद्वारे अथवा व्यक्तिशः पत्राने कळविल्यास असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.9.2007 रोजी उपविभागीय अधिकारी भंडारा यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 12.10.2007 रोजी प्रथम प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलामध्ये कारवाई केलेली नाही अशा प्रकारची प्रथम अपीलाची कारणे दिलेली आहेत. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते. द्वितीय

अपील मेमोमध्ये सुध्दा अवैध बांधकाम केल्याबद्यल तसेच अपीलार्थीने मागितलेली माहिती न पुरविल्याने व्यथीत होवून द्वितीय अपील दाखल केले आहे.

3. अपीलकर्ता यांना दि. 28.9.2007 च्या पत्रामध्येच अहवालाची प्रत सुध्दा देण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता हेच विशिष्ट कार्यवाही करुन मिळावी याकरीता आयोगाचीसुध्दा दिशाभूल करीत आहे असे दिसते. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांनी दि. 11.9.2007 रोजी मागितलेली माहिती ही दि. 28.9.2007 रोजी विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.548–550

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 86/2008.**

श्री सुंदरलाल बालकिसनदासजी कलंत्री
बालाजी वार्ड विठठल मंदिराजवळ बाजार रोड
ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर 441206 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त
नगर पालिका प्रशासन नागपूर
2) श्रीमती सिमा वंजारी
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी
न्गार परिषद ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.9.2007 रोजी शासकीय/जन माहिती अधिकारी तथा यांचेकडे 1 ते 9 पर्यंत मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.10.2007 रोजी माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने सदरहू माहिती उपलब्ध होताच आपणास माहिती देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यावर दि. 13.11.2007 रोजी अर्ज प्राप्त झाल्यावर 24 तासाच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक 11.12.2007 रोजी अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे दि. 3.1.2007 रोजी अपीलकर्ता यांना मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावर पुन्हा दि. 4.1.2008 रोजी अपीलकर्ता यांनी आक्षेप घेतलेले दिसून येते. परंतु आक्षेपामध्ये अपीलकर्ता यांनी आरोप केलेले दिसून येते. जे माहितीच्या अधिकारामध्ये अपेक्षित नाही. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 8.1.2008 रोजी देण्यात आलेला असून मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये दि. 29.8.2007 चे पत्रान्वये जी आकारणी केलेली आहे त्या आकारणीच्या संदर्भात आकारलेले शुल्क वाजवी व नियमानुसार आकारलेले निदर्शनास येते असा निर्णय दिलेला आहे. तसेच इतर मुद्याच्या संदर्भामध्ये माहितीचे स्वरुप तक्रारवजा असल्यामुळे त्यांना नेमकी कुठली कागदपत्रे हवी आहेत याचे आकलन प्रतिवादींना झाले नाही तरीही त्यांनी अपीलार्थीनी कार्यालयीन अभिलेखाचे निरीक्षण करुन आवश्यक दस्तऐवजांची मागणी करावी असे सुचविलेले दिसून येते. मात्र अपीलार्थी यांनी ज्या दस्तऐवजाचा उल्लेख केलेला आहे ते दस्तऐवज मात्र उपलब्ध करुन देण्यात यावे तसेच अतिरिक्त माहिती हवी असल्यास त्यांनी संबंधित अभिलेखाचे निरीक्षण करुन त्यांना आवश्यक त्या दस्तऐवजाच्या प्रती साठी अधिनियमांतर्गत अर्ज करावा व विहित शुल्काचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. यावरुन प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे काढण्यास पात्र आहे. अपीलकर्ता यांनी दि.

29.8.2007 च्या पत्राप्रमाणे खर्चाच्या संदर्भात जी हरकत घेतली आहे त्या संदर्भात अपील क्र. 85/2008 मध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खर्चाची तपासणी करावी असा निर्णय दिलेला असल्यामुळे पुन्हा त्याबाबत निर्णय देण्याची आवश्यकता नाही.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना अपील क्र. 86/2008 मध्ये माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.551–553

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती / नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 90 / 2008.**

श्री राजु किसन वानखेडे
श्रीराम वार्ड, बल्लारपुर
ता. बल्लारपुर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) श्री एस. जी. डेकाटे
जन माहिती अधिकारी तथा
प्राथमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.8.2007 रोजी जन माहिती अधिकारी प्राथमिक शिक्षण

विभाग जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे त्यांचे कार्यालयास श्री एस. एफ. निमगडे स. शि. यांचे वेतनाच्या संदर्भात दि. 18.7.2007 रोजी तक्रार अर्ज दाखल केलेला होता. व त्या तक्रार अर्जावर कार्यवाही काय झाली अशाप्रकारची माहिती सर्वसाधारण टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 8.10.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राथमिक शिक्षणाधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर दि. 3.12.2007 रोजी स्मरणपत्र सुध्दा दिलेले दिसून येते. व स्मरणपत्रानंतर सुध्दा माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 25.1.2008 रोजी द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की आयोगाने श्री एस. एफ. निमगडे यांचे वेतनाच्या संदर्भात तक्रार करुन न्याय मिळवून घ्यावा असा आदेश दिलेला होता व त्याप्रमाणे त्यांनी दि. 18.7.2007 रोजी स्वतंत्रपणे तक्रार अर्ज दाखल केला होता. परंतु विहित मुदतीतच माहिती मिळालेली नसल्यामुळे त्यांना प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल करावे लागले. द्वितीय अपील दाखल केल्यानंतर मात्र आदेश काढुन श्रीयुत निमगडे यांचे वेतन त्यांना उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती जरी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) शिक्षण विभाग यांचेकडे मागितलेली असली तरी सहा. शिक्षकांचे वेतन हे संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांनी काढावयाचे आहे व त्याप्रमाणे मुख्याध्यापकाना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 14.1.2008 रोजी पत्र दिलेले दिसून येते. व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी प्रयत्न केलेले दिसून येते. त्यानंतर पुन्हा दि. 16.1.2008 रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी मुख्याध्यापकाना स्मरणपत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी माहिती उपलब्ध झाली असे सांगितले. माहिती विलंबाने उपलब्ध झालेली असली तरी ती वेतन

काढण्याच्या संदर्भात होती व ती शाळेच्या मुख्याध्यापकाने काढावयाची होती परंतु सदरच्या अपीलामध्ये शाळेचे मुख्याध्यापक हे पक्षकार नसल्यामुळे त्यांचे विरुध्द कोणत्याही प्रकारची कारवाई ही करता येवू शकत नाही व जन माहिती अधिकारी यांचे अधिकार कक्षेमध्ये वेतन देयक दाखल करण्याचे नसल्यामुळे त्यांचे विरुध्दही कारवाई करता येणार नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे व तसेच श्रीयुत निमगडे यांनी अपीलकर्ता यांनासुध्दा दुरध्वनीवरुन कळविले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 28.8.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर<br>
**दि. 3.3.2009**

**( विलास पाटील )**<br>
**राज्य माहिती आयुक्त,**<br>
**राज्य माहिती आयोग,**<br>
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.554–556

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 89/2008.**

श्री राहूल नगरकर
प्लॉट नं. 7, कन्नमवार नगर, कर्वे नगर,
वर्धा रोड नागपूर. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी जिल्हा परिषद नागपूर
2) श्री संजय इंदूरकर
जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता
जिल्हा परिषद (बांधकाम विभाग)
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.12.2007 रोजी उप अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम विभाग) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. As per Executive Engineer letter vide No. 6453/07 Dt. 10.12.07
2. Information regarding permission granted by you vide no. ZP/ President/21071 dt. 6.7.07 (Copy enclosed) to the secretary, VCA Nagpur.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 26.11.2007 रोजी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून प्रधान सचिव ग्रामीण विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना दि. 11.12.2007 रोजी कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी आपणास हवी असलेली माहिती जिल्हा परिषद यांचेशी संबंधित आहे. तेव्हा आपला अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी नागपूर यांचेकडे पाठवून आपल्या अर्जात नमुद केलेली माहिती आपणास तात्काळ देण्याबाबत त्यांना सूचना देण्यात येत आहे. आपण कृपया त्यांचेशी संपर्क करावा असे कळविलेले दिसून येते. व पत्राची प्रतिलिपी मुख्य कार्यकारी अधिकारी व कार्यकारी अभियंता जि. प. यांना अग्रेषित केलेली दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता आज गैरहजर आहे. तसेच त्यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासाही आयोगाकडे दाखल केलेला नाही. माहिती ज्या स्तरावर उपलब्ध असेल त्या स्तरावरुन जन माहिती अधिकारी यांना माहिती मागणे अपेक्षित असते परंतु अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारे कायद्याच्या तरतुदींचे पालन केलेले नसुन त्यांचे मनाप्रमाणे

माहिती मागितलेली दिसून येते. त्यातही माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे माहिती तयार करुन ठेवली असली तरी ते आलेले नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची सुनावणी घेवून निर्णय दिला नाही. कदाचित निर्णय दिला असता तर अपीलकर्ता हे हजर राहिले असते व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली असती त्यामुळे प्रथम अपीलाच्या तरतुदीचे योग्य रित्या पालन झालेले नाही असे दिसते. असे असले तरी अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती मागितलेली असल्यामुळे विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांनी स्वतः व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन घेण्यास उपस्थित राहणे आवश्यक असते तसे ते माहिती उपलब्ध करुन घेण्यास गेले होते याबद्यलचा कोणताही पुरावा त्यांनी आयोगाकडे दाखल केला नाही तसेच द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा कोणत्याही प्रकारे त्यांनी खुलासा केला नाही व आजही अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे त्यांना माहितीचा आवश्यकता आहे असे दिसून येत नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना व्यक्तीशः माहिती उपलब्ध हवी असल्यामुळे व माहिती घेण्यास उपस्थित झालेले नसल्यामुळे व द्वितीय अपीलाच्या सुनावणीस सुध्दा उपस्थित नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.557–559

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 97/2008.**

श्री ज्ञानेश्वर तुळशीराम वानखेडे
42, प्रतिक्षा मिलींद नगर
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त 2
महानगर पालिका नागपूर
2) श्री अशोक पाटील
जन माहिती अधिकारी तथा
प्रवर्तन अधिक्षक
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.12.2007 (12.3.2007) रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.8.2007 रोजी प्रवर्तन अधिक्षक तथा माहिती अधिकारी महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. कार्यालय नागपूर महानगर पालिका नागपूर प्रवर्तन विभाग यांचे प्राप्त पत्र क्र. जा./168/प्रवि दि. 16.2.2006 मध्ये सदर प्रकरण न्यायालयात दाखल झाल्याचे ॲड. चौरसिया यांचे पत्र प्राप्त झाल्यामुळे दि. 24.1.2006 रोजी आसीनगरकडे नस्ती पाठविली झोन च्या अभिप्रायासह नस्ती या विभागाला परत प्राप्त होताच पुढील कारवाई करण्यात येईल असे लेखी कळविले आहे काय?

2. मा. अति. आयुक्त 2 तथा माहिती अधिकारी यांचे प्राप्त पत्र क्र. 231/उपायुक्त कार्यालय दि. 8 मार्च 2006 रोजी विवके झोडापे यांचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. न्यायालयीन निकालानंतर निकालानुसार कारवाई करण्यात येईल असे म्हटले आहे हे खरे आहे काय?

3. महाराष्ट्र राज्य शासनाचा निर्णय काय? व तो केव्हा केला? छायांकित प्रत मिळावी.

4. कोर्टाच्या आदेशाला महाराष्ट्र राज्य शासनाचा निर्णय बंधनकारक असतो काय? माहिती मिळावी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 29.9.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 28.3.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता 29.1.2008, 14.2.2008 व 25.3.2008 ला गैरहजर राहिलेत करीता प्रकरण आदेशाकरीता बंद करण्यात येते. व या प्रकरणी माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीना या संबंधात माहिती दिलेली आहे व माहिती अधिकारी यांनी दुरध्वनीवर या प्रकरणी कारवाई झाल्याचे सुचविले आहे असा निर्णय देवून सदरचे प्रकरण खारीज करण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की आतापर्यंत त्यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झालेली नाही. ते माहिती घेण्यासाठी व्यक्तीशः ब–याच वेळा गेले परंतु लिपीकास भेटून त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. वास्तविक व्यक्तीशः माहिती घेणार असे नमुद केल्यावर व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांना भेटून माहिती उपलब्ध करुन घेणे आवश्यक असते व उपलब्ध करुन न दिल्यास तसा आक्षेप घेणारा अर्ज त्यांचेकडे द्यावयाचा असतो. लिपिक किंवा शिपाई यांनी माहिती दिली नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांना जबाबदार धरता येत नाही. प्रथम अपीलाच्या संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते ब–याच वेळा कार्यालयात गेले परंतु माहिती उपलब्ध झालेली नाही.

4. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांचे अनेक अर्ज आहेत व त्या प्रत्येक अर्जाच्या संदर्भात त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यांना कारवाई करण्याची अपेक्षा आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे अपेक्षित नसल्यामुळे त्यांना दि. 28.9.2007 रोजी चारही मुद्याच्या बाबत माहिती तयार करुन ठेवण्यात आली होती परंतु अपीलकर्ता हे माहिती घेण्याकरीता आले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांना दि. 13.8.2007 रोजीसुध्दा प्रवर्तन अधिक्षक यांनी पत्र दिलेले दिसून येते. व त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचे निर्णयानुसार पावसाळयात 30 सप्टेंबरपर्यंत निवासी अनधिकृत बांधकाम तोडता येत नसल्यामुळे श्री विवके झोडापे यांचे बांधकामावर 30 सप्टेंबर नंतर कार्यवाही करण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना कार्यवाही अपेक्षित आहे असे दिसते. मात्र त्यांच्या मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की 4 मुद्यांमध्ये 2 मुद्ये हे अभिप्रायात्मक आहे व 2 मुद्याच्या संदर्भामध्ये पुढील कार्यवाही करण्यात येईल असे लेखी कळविलेले असल्यास त्याबाबतचे कागदपत्र व महाराष्ट्र राज्य शासनाच्या निर्णयाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 24.8.2007 च्या अर्जातील मुद्या क्र. 1 व मुद्या क्र. 3 च्या संदर्भामध्ये कागदपत्र उपलब्ध असल्यास हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधुन व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.560–563

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 95/2008.**

श्री प्रकाश मुकुंदराव पंत
डी 1, संजय अपार्टमेंट 274 धरमपेठ विस्तार
शिवाजी नगर नागपूर 440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहा. संचालक (मुख्यालय) दक्षता,
सुरक्षा संचालनालय, म.रा.विद्युत वितरण कं. मर्या.
3रा मजला हॉगकॉग बॅक इमारत, महात्मा गांधी मार्ग
फोर्ट मुंबई 400 001.
2) श्री बी. एल. राठोड
जन माहिती अधिकारी तथा
संचालक ( दक्षता, सुरक्षा व अंमलबजावणी)
म.रा.विद्युत वितरण कं. मर्या. प्रकाश भवन लिंक रोड
गडडीगोदाम सदन नागपूर 440001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन

माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 13.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप संचालक ( दक्षता, सुरक्षा ) म.रा.विद्युत वितरण कं. मर्या. यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मुख्यालय चौकशी क्र. दअ/चौ./सखोल/नाग/10–05/2752 दि. 21.7.2005 अन्वये श्री डी.के.कडु कनिष्ठ दक्षता अधिकारी नागपूर यांनी श्री एस.डी.पिल्ले कनिष्ठ अभियंता (स्था) यांच्या वरील जॉब कार्डचा वापर न करता परस्पर बिले बनवितात या आरोपाची चौकषी करुन अहवाला सोबत तक्रार शाबीत होण्यास आवश्यक कामे न झालेले व त्यामुळे गाळेधारकांनी र्जाब कार्डवरील कामे न झाल्यामुळे प्रमाणित सहया न केलेले ठेकेदारी जॉब कार्डसच्या सांक्षांकित प्रति पुरावा म्हणून अहवालासोबत पेज क्र. 55 ते 60 सादर केल्या आहेत. आरोप शाबीत होण्यायकरीता अहवालासोबत सज्जड पुरावे उपलब्ध असतांनी आपल्या कार्यालयाने कोणत्या निष्कर्षाच्या आधारे शाबीत आरोप नाशाबीत केला त्याबद्यल माहिती व पुरावा प्रति साक्षांकित करुन पुरवाव्या.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी अर्जावर 13.10.2007 ही तारीख दिलेली आहे परंतु प्रत्यक्षात अर्ज हा पोष्टाने 15.10.2007 रोजी पाठविण्यात आलेला आहे.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 14.11.2007 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 27.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 14.12.2007 रोजी देण्यात आलेला असून श्री कडू कनिष्ठ दक्षता अधिकारी यांचा चौकशी अहवाल वस्तुस्थितीदर्शक असल्याने त्यांचेवर काहीही कार्यवाही केलेली नाही तसेच आपल्या दि. 14.7.2007 च्या अर्जाबाबत या कार्यालयातील अधिका–याचे अभिप्राय व शेरे असलेली कार्यालयीन टिपणी सोबत

आपणास पाठविण्यात येत आहे. उपरोक्त माहिती पुरविण्याकरीता आलेल्या खर्चाचा पोस्टेजसह रक्कम रु. 25 ची पे ऑर्डर एम.एस.ई.डि.सी.एल. यांच्या नावे पाठवावी असे कळविलेले दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की श्री कडू यांचे विरुध्द पुरावा उपलब्ध असतांना कारवाई का करण्यात आली नाही. वास्तविक अपीलकर्ता यांचे जवळ श्री पिले कनिष्ठ अभियंता (स्था) यांचा चौकशी अहवाल संबंधित कागदपत्रासह अपीलकर्ता यांचे जवळ उपलब्ध आहे व कोणत्याही चौकशी अहवालात त्याबाबतचा कारणमिमांसा दिलेला असतो व त्यामुळे पुन्हा पुन्हा त्याबाबत माहिती मागणे हा सर्वांचा कालोपव्यय आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध होते. कोणत्याही निर्णयाच्या प्रक्रियेच्या संदर्भात कारणमिमांसा मिळत नाही व चौकशी अहवालात सर्व प्रकारची कारणमिमांसा दिलेली असते. त्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 14.11.2007 रोजी जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे तसेच प्रथम अपीलाच्या संदर्भातसुध्दा जो निर्णय दिलेला आहे तो योग्य आहे त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 13.10.2007 च्या अर्जाप्रमाणे पूर्वीच माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे त्याबाबत जे उत्तर दिलेले आहे ते विहित मुदतीत असुन योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.564–566

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 134/2008.**

श्री अ. समद शेख हबीब
रा. अकोला बेस, बार्शिटाकळी
जि. अकोला ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी
पंचायत समिती बार्शिटाकळी
जि. अकोला
2) जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी
ग्राम पंचायत बार्शिटाकळी
ता. बार्शिटाकळी जि. अकोला ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 3.3.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी दिनांक 19.7.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 कलम 18 (1) नुसार तक्रार दाखल केलेली आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. तत्कालीन माहिती अधिकारी व विद्यामान माहिती अधिकारी दोघेही हजर आहेत.

2. तक्रारदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील क्र. 1323/2007 दाखल केलेली होती. अपीलाचा निर्णय दिनांक 27.3.2008 रोजी देण्यात आला असुन ''1. तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत बार्शिटाकळी श्री आर.आर. देशमुख यांचेविरुध्द अधिनियमाचे कलम 20 प्रमाणे शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत आयोगास करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती कायम करण्याचा निर्णय घेण्यात येईल. सदरची जबाबदारी ग्राम विकास अधिकारी पंचायत समिती बार्शिटाकळी यांची राहील. 2. अपीलकर्ता यांनी त्यांना मागितलेली माहिती ही हा हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत त्यांना रजिस्टर पोस्टाने विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.'' अपील निर्णयामधील वरील आदेश क्र. 1 प्रमाणे तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे. गट विकास अधिकारी पंचायत समिती बार्शिटाकळी यांनी तत्कालीन संबंधित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसचिव यांना खुलासा दाखल करावा म्हणून पत्र दिले होते परंतु तरीही खुलासा दाखल केला नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती ही कायम करणे संयुक्तिक राहिल. तसेच अपीलकर्ता यांनी त्यांनी मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून याचा अर्थ दि. 27.3.2008 रोजी जे माहिती अधिकारी असतील त्यांनी ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होते परंतु दि. 27.3.2008 रोजी असलेल्या माहिती अधिका–यानीसुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत व त्यांनी असे सांगितले की त्यांचेकडे त्यांचे अगोदरच्या ग्रामसेवकाने कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे दिली नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आली नाही परंतु कागदपत्रे उपलब्ध करुन दिल्यास ती माहिती उपलब्ध करुन देता येईल असे त्यांचे म्हणणे आहे. व त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांना गट विकास अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या अर्जाच्या प्रमाणे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

3. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी श्री आर.आर. देशमुख यांनी खुलासा दाखल केला नाही व माहिती दिली नव्हती व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता तक्रार अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही अंशतः मंजुर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव यांचे विरुध्द चौकशी करण्यात येवून प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

2) विद्यमान माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी दि. 24.7.2006 रोजी मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता तक्रारदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांचेशी संपर्क साधुन व्यक्तीशः माहिती उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 3.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.567–569

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 108/2008.**

श्री राजेश इमानुएल कुजुर
प्लॉट क्र. 282 कस्तुरबानगर
जरीपटका नागपूर 440014 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त 1
महानगर पालिका नागपूर
2) श्री राहुल वाहने
जन माहिती अधिकारी तथा
विकास यंत्री
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 6.9.2007 रोजी प्लॉट क्र. 283 कस्तुरबानगर जरीपटका नागपूर 14 मे किये गये अनधिकृत निर्माण कार्य के संबंध में जानकारी पाने हेतु महानगर पालिका नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती विहित मुदतीत मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 24.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.11.2007 रोजी देण्यात आलेला असून दि. 14.11.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे निकाली काढण्यात आलेले दिसून येते. परंतु माहिती विहित मुदतीत दिलेली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे प्रत्यक्ष माहिती घेण्यास 30 दिवसाच्या आंत गेले नाही असे दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.570–571

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 99/2008 व 100/2008.**

श्री वसंत प्रभाकरराव मुदलीयार
289 नाना सोनी लाईन
सिताबर्डी नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय सचिव
म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ
नागपूर विभागीय मंडळ नागपूर
2) श्री अल्ताफ उर रहमान
जन माहिती अधिकारी तथा
विभागीय सहा. सचिव
म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ
नागपूर विभागीय मंडळ नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.2.2008 रोजी (20.2.2008 प्राप्त) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपील क्र. 99/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 3.11.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ यांचेकडे कु. शोभा नेवारे/सौ. शोभा अंकुश बाणासूरे यांच्या नियुक्ती बद्यलची माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 28.11.2007 रोजी या कार्यालयातील बडतर्फ कर्मचारी कु. शोभा नेवारे ( सौ. शोभा अंकुश बाणासूरे ) यांच्या विषयी आपण माहिती मागितली आहे. उपरोक्त माहिती त्रयस्थ पक्षाची असून अशा त्रयस्थ पक्षाची माहिती देण्याचे संदर्भात माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 11 (1) नुसार त्रयस्थाची परवानगी घेणे अनिवार्य आहे. संबंधित व्यक्तीची परवानगी मिळाल्यास आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 30.11.2007 रोजी त्रयस्थ पक्षानी माहिती उपलब्ध करुन देण्यास नकार दिलेला आहे असे कळविण्यात आलेले दिसते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 2.2.2008 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय कायम केलेला दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता आज गैरहजर असुन त्यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती अर्ज सादर करतो की मी सोबत जोडलेल्या अर्जाप्रमाणे म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ नागपूर यांना माहिती अधिकारी श्री व्ही.जी.पांडे व त्यानंतर श्री डी.ई.दळवी सचिव यांना नियमांच्या अधिन राहून माहितीची मागणी केली होती. परंतू राज्य जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती खाजगी आहे असे कळवून माहिती देण्यास नकार दिला आहे.

सदर बाबी संबंधी मला खालील प्रमाणे खुलासा व उपरोक्त अधिका–याच्या विरुध्द तक्रार करावयाची आहे. मी मागितलेली माहिती कु. शोभा नेवारे/सौ. शोभा अंकुश बाणासूरे कनिष्ठ लिपीक यांना अचानकपणे शासकीय सेवेतून कमी करण्यात आल्याच्या कारण मिमांसा तसेच सदर लिपीकाद्वारे नियुक्ती करीता सादर करण्यात आलेल्या खोटया कागदपत्रांची मागणी केली होती.

उपरोक्त अधिका–यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 11 (1) नुसार खाजगी माहिती आहे असे पत्र दिले व त्यांनी कु. शोभा नेवारे हिला सुध्दा सदर बाब पत्राद्वारे कळविली आहे. परंतु कु. शोभा नेवारे ही एक शासकीय कनिष्ठ लिपीक होती. आम्ही मागितलेली माहिती पुर्णतः कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात होती.

आम्हाला कागदपत्र न देता कु. शोभा नेवारे हिला तुमच्या संदर्भात विचारपुस सुरु आहे व कागदपत्रांची माहिती मागविण्यात येत आहे असा संदेश दिला. उपरोक्त दोन्ही अधिका–यांच्या सदर कार्यवाहीमुळे माझ्या व माझ्या कुटूंबियांच्या जिविताला हानी पोहचण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कु. शोभा नेवारे हिचे पती श्री अंकुश बानासूरे हे विभागीय मंडळ येथे कनिष्ठ लिपीक पदावर कार्यरत आहे. व ते संघटनेचे पदाधिकारी सुध्दा होते. त्यामुळे मी मागितलेली माहिती त्यांना नकळविण्याची शक्यता नाही.

सदर माहिती खाजगी नाही कारण कोणताही शासकीय कर्मचारी दोहरी जिवन जगत असतो. एक शासना करीता दुसरी स्वतःच्या कौटुंबीक म्हणजेच खाजगी जिवनात ज्या नावाने कर्मचारी ओळखला जातो. त्याच नावाने तो शासकीय कर्मचारी असतो. त्यामुळे त्यांच्या नावाचा उल्लेख होणे हे आवश्यक होते. व त्याच नावाने आम्ही माहिती मागितली होती माझा उद्येश कोणाच्या खाजगी जिवनात फेरफार करणे हा नाही. तेव्हा कलम 11 (1) अन्वये सदर माहिती खाजगी आहे. असे होत नाही असा आमचा समज

आहे. तेव्हा आपणास विनंती आहे की आपण शासकीय कर्मचा–याची माहिती त्यांच्या जिवनाशी निगडीत नसल्यामुळे व सदर माहिती शासकीय कामकाजासंबंधी आहे.

उपरोक्त अधिका–यांनी खाजगी माहिती असल्याचा आव आणुन आरोपित कर्मचा–याचे संरक्षण केले आहे. ज्यामुळे आमचे खाजगी जीवन धोक्यात येण्याची शक्यता आहे. तेव्हा आपणास विनंती आहे की संबंधीत अधिका–यांच्या विरुध्द माहितीच्या अधिकारात मागितलेल्या माहितीची गोपनियता मला हानी पोहचण्याच्या दृष्टीने गोपनियता भंग करण्यात आली आहे तेव्हा त्यांच्या विरुध्द त्वरीत कार्यवाही करण्यात येईल असे अपेक्षित आहे.

वरील खुलाशावरुन कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असे दिसून येते तसेच प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा योग्य आहे असे दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क. 100/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 22.11.2007 रोजी श्री प्रज्वल महात्मे यांचे मार्च 2000 मध्ये प्राविण्य सुचित झालेल्या चुकीबाबत व त्यानंतर झालेल्या कार्यवाहीबाबत माहिती ही म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ नागपूर यांना मागितलेली दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 4.12.2007 रोजी मार्च 2000 च्या परीक्षेत श्री प्रज्वल महात्मे हा विद्यार्थी प्राविण्य सुचिमध्ये नव्हता असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यानंतर दि. 20.12.2007 रोजी अपीलकर्ता यांनी अर्जात दिलेली माहिती चुकीची असुन त्याऐवजी मार्च 2002 अशी चुकीची दुरुस्ती व्हावी अशी विनंती केलेली दिसून येते. व त्यानंतर दि. 8.1.2008 रोजी सदर प्रकरणी राज्य मंडळ पुणे व शासन स्तरावरुन कार्यवाही केलेली असल्यामुळे त्याबाबतची माहिती आपण राज्य मंडळाकडून मागवावी. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र मार्च 2002 च्या निकालाच्या वेळेस

विभागीय मंडळास विभागीय सचिव या पदावर श्री एच. रहमान व विभागीय अध्यक्ष या पदावर श्री पी.आर.धारकर हे कार्यरत होते. श्री एच. रहमान विभागीय सचिव यांची संचालक राज्य विज्ञान शिक्षण संस्था नागपूर येथे बदली झाल्याने त्यांना मंडळ कार्यालयातून दि. 10.2.2003 रोजी कार्यमुक्त करण्यात आले. तसेच श्री पी.आर.धारकर विभागीय अध्यक्ष यांची म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ अमरावती विभागीय मंडळ अमरावती येथे विभागीय अध्यक्ष या पदावर बदली झाल्यामुळे त्यांना या विभागीय मंडळ कार्यालयातून दि. 1.8.2002 रोजी कार्यमुक्त करण्यात आले असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 14.1.2008 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ नागपूर विभागीय मंडळ यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 13.2.2008 रोजी सदर प्रकरणी राज्य मंडळ स्तरावरुन कार्यवाही केलेली असल्यामुळे त्रीसदस्य समितीच्या अहवालाची प्रत राज्य मंडळाकडून मागविण्यात येईल. सदर अहवालाची प्रत राज्य मंडळाकडून प्राप्त होताच आपणास कळविण्यात येईल. त्याप्रमाणे दि. 27.2.2008 रोजी सचिव राज्य मंडळ पुणे यांनी विभागीय सचिव यांना त्रिसदस्य समितीचा परीक्षा विषयक गोपनिय बाबींच्या संदर्भातील गोपनिय अहवाल असल्याने तो श्री मुदलीयार यांना देता येणार नाही असे कळविण्यात यावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 19.3.2008 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सचिव यांनी श्री प्रज्वल महात्मे प्रकरणी प्राविण्य सुचिमध्ये झालेल्या चुकीनंतर नेमण्यात आलेल्या त्रिसदस्य समितीच्या अहवालानुसार हे प्रकरण परीक्षा विषय गोपनीय बाबींच्या संदर्भातील असल्याने सदरहू गोपनीय दस्ताऐवज देता येणार नाही असे या कार्यालयास कळविण्यात आले आहे. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 मधील कलम 8 (जी) नुसार आपणास त्रिसदस्य समितीचा अहवाल देता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

5. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ यांनी श्री प्रज्वल महात्मे प्रकरणी प्राविण्य सुचित झालेलया चुकीबाबत व त्यानंतर केलेल्या कार्यवाहीबाबत तसेच नियुक्त केलेल्या त्रिसदस्य समितीच्या अहवालाची प्रत मागितलेली दिसून येते. प्राविण्य सुचि तयार करणे ही प्रशासकीय कामकाजाची कार्यपध्दती आहे व प्रशासकीय कामकाजामध्ये चुक झाली असल्यास व त्यामध्ये चौकशी झाली असल्यास व ती चौकशी पूर्ण झाली असल्यास त्याबाबतचा अहवाल हा गोपनिय आहे असे अधिनियमाच्या कलम 8 (1) (जी) प्रमाणे म्हणता येणार नाही. अधिनियमाच्या कलम 8 (1) (जी) (छ) खालीलप्रमाणे आहे. ''जी प्रकट केल्याने कोणत्याही व्यक्तीच्या जिवितास किंवा शारीरिक सुरक्षिततेस धोका निर्माण होईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षा प्रयोजनासाठी विश्वासपूर्वक दिलेल्या माहितीचा स्त्रोत किंवा केलेले सहाय अशी माहिती'' प्रकट करण्यास अपवाद करण्यात आलेला आहे. त्यावर नमुद केल्याप्रमाणे झालेल्या चुकाबद्यल कार्यवाही ही प्रशासकीय कार्यवाही असल्यामुळे त्याबाबतचा अहवाल हा वरील (जी) प्रमाणे गोपनीय होत नाही व त्यामुळे सदरचा अहवाल प्रकट करण्यास कोणत्याही प्रकारचा अपवाद करता येणार नाही व तो उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा म. रा. माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ शिवाजीनगर पुणे यांचेकडून अहवाल प्राप्त करुन घेवून तो अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपील क्र. 99/2008 हे खारीज करण्यात येते.

2) अपील क्र. 100/2008 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 22.11.2007 च्या अर्जातील माहिती दि. 20.12.2007 च्या अर्जाप्रमाणे दुरुस्त केल्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 4.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.572–578

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 85/2008.**

श्री सुंदरलाल बालकिसनदासजी कलंत्री
बालाजी वार्ड विठठल मंदिराजवळ बाजार रोड
ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर 441206 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपआयुक्त
नगर पालिका प्रशासन नागपूर
2) श्रीमती सिमा वंजारी
जन माहिती अधिकारी तथा
मुख्याधिकारी
नगर परिषद ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 2.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद ब्रम्हपुरी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

नगर परिषद ब्रम्हपुरीच्या हद्यीत नगर परिषद ब्रम्हपुरी अनधिकृत बांधकाम किंवा परवानगीचे उल्लंघन केलेल्या बांधकामावर काय कार्यवाही करण्यात आली. कोणकोणत्या नागरीकांचे अवैध बांधकाम आपल्या कार्यकाळात आजपावेतो आढावा आले किंवा अनधिकृत बांधकामाचे नियम 143 द्वारे दंडचे स्वरुपात वसुली करुन रेग्युलर करण्यात येवून बांधकाम झाले याची संपूर्ण तपशिल. दि. 27.6.2006 ते 24.5.2007पर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दयावे.

सदरची माहिती व्यक्तिशः घेण्यास तयार असून अर्जदार नियमानुसार फी भरण्यास तयार आहे असे नमूद केलेले आहे.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 22.6.2007 रोजी जन माहिती अधिकारी यांनी नगर परीषद कार्यालयात प्रत्यक्ष संपर्क साधावा आवश्यक शुल्काचा भरणा केल्यानुसार आपणास माहितीच्या सत्यप्रती तयार करुन देण्यात येतील तसेच सदरहु माहिती संबंधाने नगर परीषद कार्यालयात संपर्क साधावा आवश्यक माहिती तयार करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 2.7.2007 रोजी अपीलकर्ता यांनी आपणाकडून संदर्भांकित अर्जान्वये मागणी केलेले कागदपत्रे रु. 7225/– चा भरणा नगर परीषद कार्यालयात करावा. आपणाकडून मागणी करण्यात आलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने शुल्क भरल्यानंतर 10 ते 15 दिवसानंतर कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्याबाबतचे विवरणसुध्दा दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला असून त्यांना दि. 25.7.2007 रोजी मागणी करण्यात आलेले कागदपत्रे तयार झालेले असून आपण स्वतः घेवून जावे तसेच दि. 26.7.2007 रोजी अपीलकर्ता यांनी माहिती प्राप्त करुन घेतली परंतु गठठेची सविस्तर माहिती घ्यावी व कोणते दस्तऐवज वा किती पैसे आकारावे त्याप्रमाणे रशीद घ्यावी असे नमुद केलेले

दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 3.8.2007 रोजी पावती देण्यात आलेली आहे असे कळविले आहे. तसेच अनधिकृत बांधकाम पाडण्यात आलेले आहे त्याचप्रमाणे जे अनधिकृत बांधकाम नियमानुकुल होवू शकतात व ज्या बांधकामाच्या बाबत तक्रार नाही अशा अनधिकृत बांधकामाची तडजोड करुन नियमानुसार शुल्क वसुल करुन नियमानुकुल केलेले आहे. ते आपणास यापूर्वी बांधकाम फाईलच्या झेरॉक्स टिपणीसोबत दिलेले आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यानंतर दि. 29.8.2007 रोजी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये खर्चाचे विवरणसुध्दा दिलेले दिसून येते व त्याबद्यल स्पष्टपणे कळविण्यात आलेले असुन आपणास आणखी कोणती माहिती पाहिजे ते आपण प्रत्यक्ष न.प.कार्यालयात येवून घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दि. 28.8.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलात उशीरानी अपूर्ण माहिती पुरविण्यात आली आणि शासकीय नियमानुसार जास्त रक्कम आकारणी करुन अधिक रक्कम घेतल्याबाबत असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 25.9.2007 रोजी देण्यात आलेला असून सुनावणी दरम्यान मुद्या क्र. 2 व 3 ची माहिती पुरविली नसल्याने माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचा आदेश दिलेला दिसून येतो व अपीलकर्ता यांना दि.20.2.07 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. द्वितीय अपील मेमोमध्ये मुद्या क्र. 2 व 3 ची माहिती उपलब्ध करुन देण्याचे मान्य करुन सुध्दा प्रतीवादीची स्वाक्षरी टिपणीवर घेण्यात आली. ब्रम्हपुरीत आल्यानंतर माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. जास्त आकारलेली रकमेची मागणी अपीलार्थीनी आपल्या अपीलामध्ये केली. परंतु मुळ मुद्या अर्जात नसल्यामुळे स्वार्थी भावना असल्यामुळे हेतुपुरस्पर देण्यात आली नाही. तसेच अवाढव्य आकारणी करुन जास्त रक्कम घेवून बिल न देता आणि पूर्वी रक्कमेची आकारण्याची सुचना न देता आणि दोन वेगवेगळया

स्वरुपात रकमेची आकारणी करुन वसुली केलेली रक्कम देवून सुध्दा अपुरी माहिती दिल्याबाबत असे कारण दिलेले आहे.

4. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही दि. 26.3.2006 ते 24.5.2006 या दोन वर्षाच्या कालावधीतील असुन एकुण 166 नस्तीमध्ये ही माहिती आहे व त्या सर्व नस्त्या हया बांधकामाच्या परवान्याच्या संदर्भात असल्यामुळे त्यातून कागदपत्रे उपलब्ध करुन देतांना ती विस्तृत प्रमाणात आहे तसेच सोबत नकाशाची सुध्दा माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व त्याप्रमाणे अतिरिक्त खर्चाची आकारणी करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे. माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे व नकाशे हे अे 4 किंवा अे 3 साईजमध्ये नसल्यामुळे त्याबद्यलची आकारणी ही माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 4 प्रमाणे करण्यात आलेली आहे. नियम 4 मध्ये For providing the information under sub section (1) of Section 7 the fee shall be charged by way of cash against proper receipt or by money order or demand draft or bankers cheque payable to the Drawing and Disbursing Officer at the following rates

a) rupees two for each page (in A-4 or A-3 size paper) created or copied

b) actual charge or cost price of a copy in larger size paper

c) actual cost or price for samples or models and

d) for inspection of records, no fee for the first hour, and a fee of Rupees five for each subsequent hour.

अशाप्रकारची तरतुद आहे व त्या तरतुदीप्रमाणे नकाशाची छायांकित प्रत काढावयाचे झाल्यास अे 4 किंवा अे 3 आकाराच्या 2 पासून तर 4 पर्यंत कागद असल्यामुळे व त्याबाबतची प्रत्यक्ष छायांकित प्रतीचा खर्च अशा पध्दतीनी आकारणी करण्यात आलेली आहे व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना सदरची केलेली आकारणी ही अवाजवी वाटते. परंतु प्रत्यक्ष जो खर्च आलेला आहे त्याच खर्चाची आकारणी केलेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे. अपीलकर्ता यांनी स्वतः येणा—या खर्चाचे विवरण दिलेले आहे परंतु ते त्यांचे स्वतःच्या मतानी ते दिलेले आहे त्यामुळे प्रत्यक्ष जो खर्च आलेला आहे व त्याबाबतचे दि. 29.8.2007 रोजी विवरणसुध्दा दिलेले आहे ते योग्य दिसून येते.

5. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दिलेली माहिती ही अपुर्ण आहे परंतु अपुर्ण माहिती ज्यावेळेस सांगितली जाते त्यावेळेस त्याबद्यलचा पुरावा हे आयोगाचे निदर्शनास आणणे आवश्यक असते. अपीलकर्ता यांची माहिती मुळात विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे व जुनी असल्यामुळे जी उपलब्ध आहे ती दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर अपीलकर्ता यांनी खालीलप्रमाणे खुलासासुध्दा दिला आहे.

मै वृध्द आदमी बी.पी. का हार्ट का पेशंट हू. वय 75 वर्षे आहे. श्री वानखेडे सा. ने हेतुपुरस्सर मेरे को करीब 2 माह के बाद अपूर्ण माहिती दिया व दि. 24.9.2007 की माहिती 3 माह के ही बाद दिया वह भी नियमबाहय माहिती दिया श्री सी.ई.ओ. के मुख्य हेतु था कि यह मेसे से इसप्रकार की माहिती न मांगे. जानबुजकर मुझे परेशान करने हेतू ज्यादा पैसे की आकारणी किया जब की नियमानूसार झेरॉक्स पेपर में अे 3 व अे 4 के पेपर ही काम में लाये गये है. कही 2 झेरॉक्स वाले से अे 3 जोडकर है. जिसमे मैने जोडपेपर को पकड कर आरखडा दिया है बाजार मे आज भी झेरोक्स वाले अे 1 व अे 3 की झेरोक्स बनाकर देते है. सी ई ओ सा. का सोचना था किसी भी तरह

से कलंत्री का मानसिक शारिरिक व आर्थिक नुकसान किया जाय. उन्होने मेरे व मेरे बच्चो को भी बहुन परेशान किया जो कि मैने आपनी अपील में बताया है. श्री चिलमुलवार सा. ने दिलेले नकाशे आणि माझेकडून सादर केलेले पत्राची पाहणी केली नाही. श्री उपायुक्त सा. नी मला जेव्हा बोलाविले तेव्हा मी हाजिर झालो परंतु मला तरीख न देता माहिती न करता न. प चे श्री राउत सा. नी दि. 3.1.2008 ची बाजू पाहून दि. 8.1.2008 ला निकाल दिले या वेळी अर्जदारचे बाजू न पाहता अपीलाचा निकाल लावला. ही बाब नियमा विरुध्द आहे. मला दि. 24.9.2007 चे दिलेले अर्जाचे दि. 3.1.08 अपूर्ण माहिती दिली याचा खुलासा मी माझे दि. 4.2.08 चे कार्यालयात पेशीचे दिविसी पत्र दिले. वरील अर्ज दि. 11.12.2007 चे आमचे अपील दाखल केलेले आहे.

न.प.ब्र.द्वारे झेरोक्सचा टेंडर काढण्यात येते. यावेळी बांगरे झेरौक्स वाला नी संपूर्ण झेरोक्स तयार करुन दिलेली आहे त्याना वेगळे पैसे जोडपत्राचे दिलेले नाही. आपण जर बांगरे झेरॉक्स वालेची बयान घेणे आवश्यक वाटते तर मी त्याना आपले समक्ष दिलेले व काम केलेले झेरॉक्सचे बाबतीत हाजर करु शकतो.

ही मला परेशान व माझा मानसिक, शारिरिक व आर्थिक नुकसान करणे उद्येश आहे व माझेकडे परत न यावे या कारणास्तव असे कृत्य केले आहे. सबब मी प्रतिज्ञा लेखाद्वारे आपले सेवेशी सादर करीत आहे.

सदरच्या खुलाशाप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तपासुन पाहणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या बयानाप्रमाणे छायांकित प्रतीच्या खर्चाच्या संदर्भात तपासणी प्रथम अपील अधिकारी यांनी करुन हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत योग्य तो निर्णय द्यावा व उर्वरीत रक्कम राहिल्यास परत करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 2.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.579–585

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 109/2008.**

श्री नामदेव नागो पेंदोर
गड्डीगोदाम मुक्तेश्वरी माता मंदीरजवळ
मोहन नगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री रामदास आगवणे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक भूमी अभिलेख नागपूर
2) श्री शिवदास गुंड
जन माहिती अधिकारी तथा
नगर भूमापन अधिकारी क. 2 नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.10.2007 रोजी माहिती अधिकारी नगर भूमापन कार्यालय क्र. 1 यांचेकडे आपल्या कार्यालयातर्फे स्थावर मिळकत मौजा वडपाखड शिट नं. 25 न.भु.क्र. 1670 च्या मिळकतीसंबंधात मा. उपसंचालक भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांचे पत्र क्र. महसुली अपील क्र. 41/2005–06/ई–5/2005 च्या संदर्भामध्ये एकुण 13 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. व त्याकरीता नगर भूमापन अधिकारी क्र. 2 नागपूर यांचे नावे असलेला डी.डी. रु. 500/– चा जोडलेला आहे असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 20.11.2006 रोजी अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध आहे ती उपलब्ध करुन दिलेली आहे. व जी उपलब्धच नाही त्याप्रमाणे त्यांना कळविलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 29.1.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक भूमी अभिलेख यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 13.4.2007 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य आहे असा दिलेला दिसून येतो व अपील निकाली काढलेले आहे. अपीलकर्ता यांनी दि.16.6.07 रोजी पुन्हा उपसंचालक भूमी अभिलेख यांचेकडे पुन्हा अपील दाखल केले होते व पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये ज्या मोजणीचा उल्लेख केला आहे ती मोजणी ही महसुल अपीलाच्या संदर्भामध्ये अहवाल मागविलेला असल्यामुळे कार्यालयीन कामकाजाची मोजणी आहे. कार्यालयीन कामकाजाच्या मोजणीमध्ये कोणत्याही प्रकारची मोजमापे दिली जात नाही. अपीलकर्ता यांनी जर मोजणी करीता अपील करुन मोजणीचा खर्च भरल्यास त्यांना मोजणी करुन मिळेल व त्यावर मोजमापे त्यांना उपलब्ध करुन देता येतील. तेही त्यांना मान्य नसेल तर नगर भूमापन अधिकारी

यांचेकडे त्यांना अपील करता येईल व त्यानंतरही वरीष्ठांकडे अपील करता येईल. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध असलेलीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार करता येत नाही. परंतु अपीलकर्ता यांनी अर्जासोबत माहिती करीता डी.डी. रु. 500/– चा जोडलेला दिसून येतो त्या डी.डी. च्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा खुलासा जन माहिती अधिकारी किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेला दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना डी.डी. परत मिळालेला नाही. याबाबतची चौकशी जन माहिती अधिकारी यांनी करणे आवश्यक असून अपीलकर्ता यांना डी.डी. कार्यालयात असेल तर परत करण्यात यावा किंवा डी.डी. ची रक्कम ही खात्यात जमा केली असेल तर अपीलकर्ता यांना परत करणे संयुक्तिक राहिल. मात्र अपीलकर्ता यांना जे उत्तर दिलेले आहे ते योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात डी.डी. रु. 500/– चा जोडलेला दिसून येतो त्याबाबतची चौकशी ही जन माहिती अधिकारी यांनी करुन डी.डी. किंवा रु. 500/– हे अपीलकर्ता अर्जदार यांना परत करण्यात यावे.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.584–586

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 18 (1) प्रमाणे तक्रार कमांक 139/2008.**

श्री बंडुभा> देवाजी चौरागडे
मु. पो. खापरखेडा
ता. सावनेर जि. नागपूर ..... **तक्रारकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहायक अभियंता (श्रेणी 1)
सार्वजनिक बांधकाम उपविभाग
सावनेर जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी
सार्वजनिक बांधकाम मंडळ
ता. सावनेर जि. नागपूर ..... **गैरतक्रारदार**

**( आदेश पारित दिनांक 5.3.2009 )**

**नि र्ण य**

तक्रारदार यांनी तारीख निरंक कार्यालयात प्राप्त दि. 20.11.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे तक्रारवजा अर्ज दाखल केलेला आहे. सदरच्या तक्रारीची सुनावणी आज रोजी घेण्यात आली. तक्रारदार हजर आहेत. परंतु तक्रारदार यांनी माहिती अधिकारी व अपीलीय अधिकारी यांना माहितीचा अर्ज व अपील केलेले नसल्यामुळे

त्यांना नोटिसेस काढता आल्या नाहीत. तक्रारदार यांनी उपविभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम मंडळ ता. सावनेर यांना माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून सहायक अभियंता (श्रेणी 1) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून वर म्हटल्याप्रमाणे तक्रार दाखल केली.

2. दिनांक 12.8.2008 च्या अर्जाप्रमाणे तक्रारदार यांस सहायक अभियंता यांनी दि. 22.8.2008 रोजी मागितलेल्या माहितीचा नेमका बोध होत नसल्यामुळे खुलासा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्याप्रमाणे दि. 3.11.2008 रोजी खुलासा दाखल केलेला दिसून येतो व त्यामुळे माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी दिनांक 24.11.2008 रोजी तक्रारदार यांनी रु. 452 अतिरिक्त खर्चाकरीता भरणा करावा असे कळविलेले दिसून येते. परंतु तक्रारदार यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा न केल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. तक्रारदार यांना खुलासा उपलब्ध करुन देण्यास स्मरणपत्र देण्यात आलेले होते व तरीसुध्दा तक्रारदार यांनी दि.7.10.08 राजी प्रथम अपील दाखल केले. परंतु ते सुध्दा सहायक अभियंता यांचेकडे दाखल केले जे प्रथम अपीलीय अधिकारी नाहीत. याचा अर्थ तक्रारदार यांनी माहितीचा अर्ज हा माहिती अधिका–याकडे दाखल केला नाही. प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल केलेला नाही व तरीसुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध झाली नाही अशी त्यांनी तक्रार केलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 24.11.2008 रोजी माहिती करीता शुल्क रु. 452 कार्यालयाकडे मनीऑर्डरनी किंवा शासकीय कोषागारात चालानद्वारे जमा करावे असे कळविल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.

## आ दे श

1) तक्रारदार यांची तक्रार ही खारीज करण्यात येते.

2) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.3.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.587—589

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 118/2008.**

श्री अमोल देवाजी चहांदे
मु. पो. बोंड (राजोली)
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी ब्रम्हपुरी
ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार नागभीड
ता. नागभीड जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे दोघेही मुंबई येथे लोकसभा सार्वत्रिक निवडणूक 2009 चे कामानिमीत्त जावयाचे असल्याने माझे ऐवजी या कार्यालयातील श्री इ.एस.बघेले अव्वल कारकून यांना प्रकरणात उपस्थित राहण्यास प्राधीकृत करण्यात येत

आहे असे आयोगास कळविले आहे. परंतु जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी आगामी लोकसभा निवडणूक 2009 च्या कामात व्यस्त असल्यामुळे मी सदर तारखेवर आपले कार्यालयात उपस्थित राहू शकत नाही. व कार्यालयाचे वतीने श्री आर.एस. नाकतोडे क.ली. हे उपस्थित राहणार आहेत असे कळविलेले आहे याबाबत जिल्हाधिकारी यांनी चौकशी करुन वस्तुस्थिती आयोगाकडे सादर करावी. कारण दोन्ही लिपीकांना सदरच्या प्रकरणातील काहीही माहिती नाही. व त्यामुळे आयोगाच्या दर्जाचा तहसिलदार यांनी अवमान केला आहे असा निष्कर्ष काढणे भाग आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.9.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा बोंड (राजोली) येथील आबादीची जागा कायम पटटयाने मिळण्याबाबतचा अर्ज.

1. मौजा बोंड प.ह.नं.15 येथील भु.क्र.84/72 चा अध्यावत भु.क्र.कोणता आहे. 2. सदर जमीनीचा पुनर्मोजनीनंतरचे नकाशात सदर जागेला भु.क्र. दिलेला आहे काय 3. वरील भु.क्र.84/72 चा अध्यावत 7/12 उपलब्ध नसल्यास सदर जमीनीचे काय झाले. 4. सदर जमीनीची आपणास मोजनी करुन देता येत नाही काय असल्यास तशा प्रकारे सदर जमीनीची मोजनी करुन घेतले आहे काय असल्यास त्याबाबतची दस्तऐवजाची प्रमाणीत प्रत 5. वरील अर्जाचे संबंधाने काय झाले.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु प्रथम अपीलाच्या माध्यमातून माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे द्वितीय अपील मेमोमध्ये नमूद केलेले आहे. परंतु दाखल झालेल्या कागदपत्रांमधून असे दिसून येते की अपीलकर्ता यांना दि. 4.12.2007 रोजी माहिती उपलब्ध दिलेली दिसून येते. माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली आहे अशा प्रकारे नोंद घेण्यात आलेली

आहे. परंतु अपीलकर्ता यांची सही इंग्रजीमध्ये दाखविण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जावर, प्रथम अपीलावर तसेच राज्य माहिती आयोगाकडील अपील अर्जावर मराठीत सही केलेली आहे. यावरुन दि. 3.12.2007 चे उत्तर दिलेले आहे ते बनावट आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्याबाबतही उपस्थित असलेल्या लिपीकाला काहीही माहिती नाही असे सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही असा निष्कर्ष काढुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहिल. उपविभागीय अधिकारी यांनीसुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे असे दिसून येते. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.9.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावे.
2) अपीलकर्ता यांच्या दि. 17.9.2007 च्या अर्जाप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतलेली नसल्यामुळे व निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात येते.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>जिल्हाधिकारी चंद्रपूर</u>** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.590–593

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 117/2008.**

सौ. बेबीताई रवी पारेकर
दलित वाचनालय, इमामवाडा
पो. अजनी नागपूर ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त – 2
महानगर पालिका नागपूर
2) श्री अशोक पाटील
जन माहिती अधिकारी तथा
अधिक्षक (प्रवर्तन विभाग)
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.5.2007 रोजी अधिक्षक अतिक्रमण विभाग यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मौजा बाबुळखेडा येथील खसरा क्र. 68/1 व 68/2 येथील जागेवर बांधलेले माझे घर कोणताही नोटिस न देता आपल्या अतिक्रमण विभागामार्फत पाडण्यात आले ते कायद्याच्या कोणत्या तरतुदीनुसार पाडण्यात आले व माझे जप्त केलेले सामान कोठे आहे याची अनेकदा विचारणा करुनही माहिती देण्यात आली नाही. तरी या अर्जाद्वारे ती माहिती देण्याची कृपा करावी.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 31.5.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 6.6.2007 रोजी पुन्हा माहितीचा अर्ज केलेला दिसतो. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले होते. व प्रथम अपीलाचा निर्णय माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे निकाली काढण्यात येत आहे असा दिलेला आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. माझ्या मालकी जागेवर माझे राहाते घर का पाडण्यात आले असे कारण दिलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना दिनांक 6.6.2007 रोजी जे उत्तर दिलेले आहे त्या उत्तराच्या वरुन अपीलकर्ता यांच्या मालकीचे राहाते घर का पाडण्यात आले हे कळून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 23.5.2007 तसेच दिनांक 6.6.2007 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.594–596

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 113/2008.**

श्री फैजार अख्तर व अब्दुल खालीक
हन्डी ओली, गुजरी बाजार, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष, राष्ट्रीय उर्दु प्रायमरी शाळा
शिवपंचायत नगर कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका राष्ट्रीय उर्दु प्रायमरी शाळा
शिवपंचायत नगर कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 6.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

राष्ट्रीय उर्दु उच्च प्राथमीक शाळा कामठीमे जो शिक्षक कार्यरत है उनका एस एस सी, एच एस सी, बी.एस.सी., डी.एड, बी.एड की सर्टिफाई कॉपी तथा संबंधित बोर्ड द्वारा कराया गया व्हेरीफिकेशन की सर्टिफाई कॉपी.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.12.2007 रोजी आपण मागितलेली माहिती तयार आहे तरी नियमाप्रमाणे योग्य ती फी भरुन मागितलेली माहिती घेवून जाण्याची कृपा करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना दि. 13.12.2007 रोजी त्यांना माहिती करीता निश्चित रक्कम कळविलेली नाही पण अपीलकर्ता यांनी रु. 90 ची मनीऑर्डर करीत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 14.1.2008 रोजी प्रथम अपील केले होते परंतु ते स्विकृत झालेले नाही व परत आलेले आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलाच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

श्री फैजार अख्तर व अब्दुल खालीक रा. कामठी अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांच्याकडे माहिती मिळण्यासाठी दि. 17.11.2007 ला अर्ज केला होता. याबाबत अपीलकर्ता यांना दि. 10.12.2007 ला पत्राद्वारे माहिती नियमाप्रमाणे योग्य ती फी भरुन घेवून जाण्यासाठी कळविण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता हे माहीती घेवून जाण्यासाठी शाळेच्या कार्यालयात उपस्थित झाले नाही.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2007 ला केलेल्या अर्जामध्ये मागितलेली माहिती शिक्षकांची वैयक्तिक माहिती असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणे शक्य नाही. अशा

प्रकारचा निर्णय मा. राज्य माहिती आयुक्त यांनी अपीलकर्ता यांचे द्वितीय अपीलाचा निर्णय दि. 7.2.2009 रोजी दिलेला आहे.

3. अपीलकर्ता यांनी हीच माहिती दि. 14.8.2007 रोजी केलेल्या अर्जामध्ये पण मागितलेली होती. यात मा. राज्य माहिती आयुक्त यांनी ही माहिती शिक्षकांची वैयक्तिक माहिती असल्यामुळे ती उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दि. 7.2.2009 ला दिलेला आहे. अपीलकर्ता हे एकच माहिती वेगवेगळया अर्जातुन मागत आहेत व त्यासाठी ते वारंवार आपल्याकडे अपील पण करत आहेत. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांचे उद्दिष्ट फक्त त्रास देणे असे आहे. सबब हे प्रकरण खारीज करण्याची कृपा करावी ही विनंती.

खुलाशामध्ये एकच मुद्दा अनेक अर्जाच्या माध्यमातून मागत आहे असे म्हटलेले आहे त्याकरीता अपील क्र. 2635/2007 आदेश दि. 7.2.2009 ची प्रत दाखल केलेले आहे व त्यामध्ये मुद्दा क्र. 3 मध्ये तीच माहिती मागितलेली दिसून येते. सदरचा अर्ज दिनांक 14.8.2007 रोजीचा आहे व त्यावरुन अपीलकर्ता एकच माहिती वेगवेगळया अर्जातून मागत आहे असेही सिध्द होते. व त्यावरुन कदाचित अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांना त्रास देण्याचा उद्येश असावा असे दिसून येते. परंतु तरीसुध्दा प्रत्येक अर्ज हा स्वतंत्र अर्ज असतो व त्या अर्जाची कार्यवाही ही स्वतंत्रपणे करणे आवश्यक असते व त्यामुळे दि. 17.11.2007 रोजी दिलेल्या अर्जाच्या संदर्भामध्ये आयोगानी दिनांक 7.2.2009 रोजी दिलेला निर्णय हा उदाहरण होवू शकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जी माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही असा निर्णय दिलेला असला तरी दि. 17.11.2007 च्या अर्जाप्रमाणे योग्य ते उत्तर दिलेले नसल्यामुळे व माहिती दिलेली नसल्यामुळे सदरची माहिती अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या 17.11.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 5.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.597–600

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2364/2007.**

श्री चंद्रशेखर शांताराम बडवाईक
फॅलट क्र. जी 2, प्लॉट नं. 5, आनंदविहार
हिलटॉप, रामनगर नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
नागपूर शहर
2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त (प्रशासन)
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 6.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 24.4.2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

आरोपी भालचंद्रवर चोरीचा गुन्हा दाखल करुन त्याअनुषंगाने कार्यवाही करणेबाबत फोनद्वारा दिलेली आदेशाची अंमलबजावणी आजपर्यंत का झालेली नाही. गुन्हयाबाबत साक्षंकीत माहिती करीता त्या अनुषंगाने रिडर नाईक यांना सी पी नी डायरेक्ट केलेले पत्र का लिहीण्यात आले नाही.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या सोबत दि. 8.10.06 अशी तारीख असलेले परंतु दि. 1.11.2006 अशी स्विकृती तारीख असलेले अर्ज जोडण्यात आलेला आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 21.5.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या आधारे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 31.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय हा दि. 18.6.2007 रोजी देण्यात आलेला असून दिलेली माहिती योग्य आहे व त्यामुळे अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते व त्या निर्णया विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी त्यांचे युक्तीवादात असे सांगितले की त्यांनी मागितलेली माहिती न देता ते आरोपी आहेत अशा प्रकारची माहिती जन माहिती अधिकारी यांनी दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी पोलीस आयुक्त यांचेमध्ये झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी कारवाई का करण्यात आली नाही अशा प्रकारचे कारण विचारलेले आहे. तसेच दि. 1.11.2006 च्या अर्जातील संदर्भाचा विचार केल्यास त्यात त्यांनी त्यांचे विरुध्द दि. 2.6.2006 रोजी दिलेल्या तक्रारीचा संदर्भ दिलेला आहे. याचा अर्थ दोन भावाच्या मधील वाद असुन एकमेकाच्या विरुध्द दिलेल्या तक्रारी आहेत व त्यामुळे तसा संदर्भ दिलेला दिसून येतो. त्यात गैर असे काहीही नाही. त्याकरीता प्रथम

अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे खुलासा सुध्दा केलेला आहे. मुळात अपीलकर्ता यांनी माहिती मागतांनाच तोंडी आदेशाच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली आहे व तसेही उत्तर त्यांना दिलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 6.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.601–603

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 132/2008.**

श्रीमती हिरणबाई नामदेव गेचोड
रा. परसोडी पो. खैरी बिजेवाडा
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मंडळ अधिकारी मौदा
साझा क. 67 मौजा शिवनी (खात)
ता. मौजा जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
तलाठी ह. नं. 67
मौजा शिवनी ता. मौजा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 21.8.2008 रोजी ॲड. श्री वा. सी. गायकवाड यांचे मार्फत राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.11.2007 रोजी श्री ए. एस. सहारे तलाठी तलाठी ह. नं. 67 मौजा शिवनी शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

स.नं. 90 आ. 0.82 हे व स.नं. 91 आ. 0.87 मौजा शिवनी तह. मैादा येथील अर्जदाराच्या नावाच्या फेरफारासंबंधी.

सदरची माहिती विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे दि. 21.9.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 26.11.2007 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी श्री ए. एस. सहारे हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक ठरते. दि. 17.3.2007 रोजी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्यांचे वकील श्री वा. सी. गायकवाड यांनी स्वीकृत केलेली असून त्यांनी पोच पावतीसुध्दा दिलेली दिसून येते. असे असले तरी ती विलंबानीच माहिती उपलब्ध झालेली आहे. अपीलकर्ता यांचे वकील श्री वा. सी. गायकवाड बार असोसिऐशन जिल्हा नागपूर यांनी दि. 17.3.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन घेतली आहे ती त्यांनी श्रीमती हिरणबाई नामदेव गेचोड यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते व आजही ते या कार्यालयास सुनावणीस हजर नाहीत व त्यामुळे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

3. अपीलकर्ता यांची मुळ तक्रार अशी दिसून येते की अपीलकर्ता यांनी सर्वे नं. 90 व 91 मौजा शिवनी ता. मौजा येथील सर्व्हे नं. हे सौ. पार्वताबाई सोमाजी चव्हाण

यांचेकडून 1989–90–91 खदेरी केलेली दिसून येते. परंतु सरर्हु रेकॉर्ड हा कोतवाल डुंगी असल्यामुळे फेरफार दुरुस्त करता येत नाही अशी त्यांचे तक्रार आहे. मुळात सौ. पार्वताबाई सोमाजी चव्हाण हया कोतवाल डुंगी खातेदार आहेत काय असे विचारले असता त्या कोतवाल डुंगी हया खातेदार नसुन त्यांनी दुस–या कडून खरेदी केली तेही कोतवाल डुंगी खातेदार नाहीत व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी ही शेतजमीन सौ. पार्वताबाई सोमाजी चव्हाण यांचेकडून खरेदी केलेली होती व त्यामुळे आज त्यांच्या नावाची फेरफार करणे हे आवश्यक आहे असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु राज्य माहिती आयोगास असा अधिकार नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी महा. जमीन महसुल संहिता 1966 च्या तरतुदीप्रमाणे किंवा मा. न्यायालयात जावून सदरच्या फेरफाराची नोंद करुन घेणे संयुक्तिक राहिल. परंतु अपीलकर्ता यांना पुन्हा मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करीता सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या दि. 26.11.2006 च्या अर्जाप्रमाणे मुद्येनिहाय माहिती त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विद्यमान तलाठी तथा माहिती अधिकारी यांनी विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तलाठी श्री अे. एस. सहारे यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या करीता एक प्रत **<u>तहसिलदार रामटेक</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.604–607

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 129/2007.**

श्री सतिश रामकृष्णराव धाबेकर
क्वा. नं. 5/84, छोटा ताजबाग जवळ
रघुजी नगर नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीश जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी
महा. राज्य गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा)
नागपूर
2) श्रीमती प्रभा कंगाले
जन माहिती अधिकारी तथा
मिळकत व्यवस्थापक
गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा)
नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 18.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा महा. राज्य गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 30.10.2007 रोजी अपीलकर्ता यांना तत्कालीन माहिती अधिकारी मिळकत व्यवस्थापक यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांनी दि. 21.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 28.11.2007 रोजी अपीलकर्ता यांन दिनांक 11.12.2007 रोजी सुनावणीस उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले दिसून येते. दि. 5.3.2009 रोजी अपील अधिकारी यांनी संबंधित माहिती अधिकारी यांना सुनावणीच्या वेळेस अर्जदारास गृहनिर्माण विभागाचे मागणी केलेली परिपत्रक देण्याचे आवश्यक होते असे कळविलेले दिसून येते. सांबत नोटशिटची छायांकित प्रत दाखल केलेली आहे व त्यावर अपीलकर्ता यांची स्वाक्षरी असुन परिपत्रक दिल्याचे मात्र दिसून येत नाही मात्र त्याच वेळेस दिले होते असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगास सांगितले व तशी नोंद दिसून येते. असे असले तरी अपीलकर्ता यांना जी परिशिष्ट क मधील माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य नाही असे त्यांचे म्हणणे आहे. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा करतांना असे सांगितले की गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यामध्ये सदनिका हस्तांतर करण्याचे संदर्भातील प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे त्यापेक्षा वेगळी कोणत्याही प्रकारची कार्यपध्दती पचलीत नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे हा निष्कर्ष काढावा लागतो.

3. अपीलकर्ता यांना जी कार्यपध्दतीच्या शासन निर्णयाच्या परिपत्रकाची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे त्याप्रमाणे कार्यपध्दती मान्य नसल्यास व त्याप्रमाणे नामांतर झालेले

नसल्यास त्यांनी स्वतंत्रपणे अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे स्वतंत्रपणे अपील करणे हा मार्ग असल्यामुळे त्याप्रमाणे अर्ज करुन न्याय मिळवून घेणे संयुक्तिक राहिल. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.608–610

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 133/2008.**

श्री प्रशांत प्रभाकरराव देशमुख
राजाबाक्षा मेडीकल क्वार्टर क. 1/11
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. एन. सोळंकी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसिलदार चांदूर रेल्वे जि. अमरावती
2) श्री डी. एन. उडाखे
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार कार्यालय चांदूर रेल्वे
जि. अमरावती ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.12.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार तहसिल कार्यालय ता. चांदूर रेल्वे यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. माझे आजोबा काशिराव त्र्ंबकराव देशमुख हे सहा महिन्याचे असतांना त्र्ंबकराव मयत बा. देशमुख त्यांचे वडील मरण पावल्या कारणाने संपूर्ण शेत जमीन शासनाने आपल्या अधिपत्याखाली ठेवून 3 गार्ड ने होते तरी काशिराव त्र्ंबकराव देशमुख रा. येरड बाजार त्र्ंबकराव देशमुख 1880 काशिनाथ देशमुख 1900 समोर यांच्या हीशावर आलेल्या संपुर्ण शेतीची मजाबंदी देण्यास सहकार्य करावे. माहीत असलेले खसरा सर्वे नं. 35, 74/1 82/2, 27

2. काशिराव त्र्ंबकराव देशमुख यांचा शेतीविषयी खरेदीविक्री व्यवहार चांदुररेल्वे तहसिल कार्यालयातून झालेला आहे. तसी फेरफार नकल मला मिळाली आहे तरी ती ख.नं. 35 व 74/1 याची फेरफार नोंदणी ज्या अभिलेखाच्या आधारावर करण्यात आली तो अभिलेख मला पुरविण्यास सहकार्य करावे.

3. अर्जासोबत मिळालेल्या फेरफारीची नक्कल जोडत आहे. नोंदणी दि. 29.5.35 पान नं. 21 नं. 32 नं. 30 पान 27 फेरफार तारीख 1.3.52 सदरहु माहितीसह सत्यप्रत झेरॉक्स माहिती करीता जोडत आहे.

4. या नोंदीमध्ये फेरफार तारीख 1.3.1952 आणि नोंदणी ता. 29.5.35 असा उल्लेख दिसुन येतो तरी या विषयी मला माहिती पुरविण्यात यावी. व ज्या अभिलेखाच्या आधारावर ही नोंद करण्यात आली तो अभिलेख मला माहितीचा अधिकार अधिनियम 2005 नुसार देण्यात यावा ही विनंती करुन अर्ज सादर.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 3.1.2007 रोजी नायब तहसिलदार यांनी तलाठी येरड बाजार यांना संपूर्ण शेतीची जमाबंदी देण्यास सहकार्य करण्याच्या प्रकरणाबाबत आदेश दिलेले दिसून येतात. दि. 21.2.2007 रोजी अपीलकर्ता

यांना माहिती उपलब्ध आहे आपण कार्यालयातून घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. तत्पूर्वी दि. 5.1.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. सदरची माहिती मिळाली परंतु विलंब झालेला आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

अपीलकर्ता अर्जदाराने मागितलेली माहिती ही 1980 व 1900 या कालावधीतील असल्यामुळे व सदरची माहिती जुनी असल्यामुळे ती शोधुन व त्यातील उपलब्ध असलेली माहिती नक्कल नविस विभागामधुन घेवून जाण्यासंबंधी माहिती अधिकारी चांदूर रेल्वे यांनी दि. 21.2.2007 चे पत्रान्वये अपीलकर्त्यास कळविले आहे. याशिवाय उर्वरीत माहितीचा शोध घेवून उपलब्ध असलेली माहिती खालील दर्शविल्या असून ती यासोबत जोडली आहे. व याशिवाय अपीलकर्त्याने शेती विषयक खरेदी विक्री व्यवहारा संबंधी माहिती मागितलेली असून सदरची माहिती या कार्यालयासंबंधीची नसल्यामुळे दुयम निबंधक चांदुर रेल्वे या कार्यालयाचे पत्र दि. 25.2.2009 ला पत्र देवून माहिती पुरविण्यासंबंधी विनंती केली आहे. यावरुन अपीलकर्ता यांची माहितीच मुळात अतिशय जुनी असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यास विलंब होणारच हे निश्चित. परंतु अपीलकर्ता यांनीसुध्दा सुरुवातीला माहिती उपलब्ध झाली आहे व त्यांचे काहीही म्हणणे नाही असे सांगितले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेल्या माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारची मदत आवश्यक असल्यास प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांनी त्यांना वेळोवेळी मतद करणे योग्य राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी आयोगास सांगितले आहे. सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.3.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.611–614

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 134/2008, 135/2008 व 136/2008.**

श्री बी. टी. उराडे

कार्यालय पिठासीन अधिकारी शाळा न्यायाधिकरण

प्रशासकीय इमारत 2 रा माळा सिव्हील लाईन नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जिल्हा परिषद नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

अधिक्षक (माध्यमिक)

जिल्हा परिषद शिक्षण विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक अपीलकर्ता यांनी दिनांक 31.1.2008, 22.2.2008 व 30.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या तीनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. व उत्तरवादी सुध्दा गैरहजर आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांनी 16.2.2009 रोजी 7.3.2009 च्या

सुनावणीस हजर राहण्यास आयोगाकडून नोटिस काढण्यात आली होती. परंतु आज दोनही पक्षकार हे गैरहजर आहे व मुदत मागण्याचा अर्ज सुध्दा दिलेला नाही. मा. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी 12 वीची परिक्षा असल्यामुळे उपस्थित राहू शकत नाही असे कळविलेले आहे.

2. अपील क्र. 135/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 25.9.2007 रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. राष्ट्रीय आदर्श विद्यालय रामटेक 2. राष्ट्रीय आदर्श विद्यालय मनसर 3. राष्ट्रीय आदर्श विद्यालय नंदेगाव खैरी येथील सध्या कार्यरत असलेल्या तीन्ही मुख्याध्यापकाचे पदोन्नतीचे पदाला दिलेल्या अप्रुंव्हलची प्रत ब. पदोन्नती आरक्षणाच्या कोणत्या जातीच्या आधारावर देण्यात आली रोस्टरची प्रत. क. पदोन्नती देताना जातीचे वैधता प्रमाणपत्र मागविण्यात आले होते काय जातीचे वैधता प्रमाणपत्राची प्रत ड. वैधता प्रमाणपत्र मागविले नसल्यास त्याशिवाय पदोन्नती कोणत्या नियमाचे आधारे देण्यात आले त्या नियमाची शासन निर्णयाची प्रत देण्यात यावी. वरीलप्रमाणे अ ब क ड मध्ये नमुद केलेली माहिती तीन्ही शाळेच्या मुख्याध्यापकाचे संबंधात देण्यात यावी ही विनंती.

सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 8.10.2007 रोजी माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आपण मुद्या क्र. 1 ते 3 मध्ये मागितलेली माहिती ही शाळेशी संबंधित असल्यामुळे आपण या प्रकरणी जन माहिती अधिकारी राष्ट्रीय आदर्श विद्यालय मनसर यांचेकडे अर्ज सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्यास संस्था सचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल करावे व द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल करावे असे नमूद केलेले आहे. मात्र पत्राची प्रतिलिपी मुख्याध्यापक यांना अग्रेषित केलेली असुन मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन

द्यावी असे कळविलेले दिसून येते. माहिती अधिकारी यांचे उत्तरामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 18.10.2007 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली दिसून येते ती त्यांच्या दि. 6.10.98 च्या वेतन देयकाच्या संदर्भात केलेली कार्यवाही मागितलेली दिसून येते. तसेच वेतनाच्या संदर्भात इतर माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांच्या इतरही अर्जाच्या संदर्भामध्ये शिक्षणाधिकारी यांनी माहिती उपलब्ध आहे घेवून जावी असे दि. 26.12.2007 रोजी कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांना वेतन अपेक्षित आहे असे दिसून येते. व त्याकरीता अपीलकर्ता यांनी अशा प्रकारचे अनेक अर्ज दाखल केलेले दिसून येते. तशाच प्रकारचे अर्ज त्यांनी अपील क्र. 137/2008 मध्ये संचालक सचिव न्यु ग्रॅन्ड एज्युकेशन सोसायटी नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 134/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 25.9.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे राष्ट्रीय आदर्श विद्यालय शिक्षण मंडळ रामटेक द्वारा संचालित खालील विद्यालयात सद्या कार्यरत मुख्याध्यापक संबंधाची माहिती देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती प्रत्यक्ष घेणार असे नमूद केलेले आहे. त्या संदर्भात सुध्दा दि. 8.10.2007 रोजी कळविण्यात आलेले दिसून येते. प्रथम अपील दि. 18.10.2007 रोजी दाखल केलेले आहे. तसेच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे सादर केलेले आहे. व त्यामुळे कदाचित त्याबाबतचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यावरुन अपीलकर्ता यांनी माहिती ही शाळेत उपलब्ध आहे ती शाळेतून मागणे ही अपेक्षित होते कारण शाळा हेसुध्दा प्राधिकरण असते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

5. अपील क्र. 136/2008 मध्ये जन माहिती अधिकारी म्हणून शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे जिजामाता विद्यालय बुटीबोरी येथील शाळेत प्रयोगशाळा परीचर हया पदाकरीता एकुण पाच मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 7.1.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांनी आपण दि. 5.11.2007 च्या अर्जात मागितलेल्या माहितीसाठी या कार्यालयाचे पत्र दि. 6.11.2007 अन्वये रु. 45 चालानद्वारे बॅकेत जमा करुन चालानाची प्रत या कार्यालयास सादर केल्यास आपणास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले आहे. परंतु आपण चालानाची प्रत सादर न करता अपील सादर केले आहे. आपण रु. 45 च्या चालानाची प्रत सादर केल्यास आपणास माहिती देता येईल असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता अतिरिक्त खर्चाकरीता रु. 45 हे दि. 6.11.2007 च्या पत्राप्रमाणे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता हे स्वतः अप्रामाणिक आहे असे दिसून येते. आयोगाकडे कागदपत्रे दाखल करतांना सर्व प्रकारची कागदपत्रे व पत्रव्यवहार अपीलकर्ता यांनीसुध्दा दाखल करावयाचे असते परंतु अपीलकर्ता यांनी दि. 6.11.2007 चे पत्र हे आयोगापासून लवविलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी रु. 45 च्या चालानाचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

6. अपीलकर्ता यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे वरीलप्रमाणे जे अपील दाखल केलेले आहे ते त्यांच्या संस्थेकडून वेतन उपलब्ध न झाल्यामुळे त्यांना वेठीस धरण्याकरीता ते माहिती मागत आहे. वास्तविक अपीलकर्ता हे शाळा न्यायाधिकरण कार्यालयास नोकरीस आहे असे दिसून येते. असे असुन सुध्दा अपीलकर्ता हे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीचा गैरवापर करीत आहे ही बाब शाळा न्यायाधिकरणाच्या नजरेस आणणे आवश्यक आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 134/2008, 135/2008 व 136/2008 हे खारीज करण्यात येतात.

2) सदरच्या निर्णयाची एक प्रत अध्यक्ष शाळा न्यायाधिकरण प्रशासकीय इमारत 2 रा माळा सिव्हील लाईन नागपूर यांचेकडे माहितीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 7.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.615–619

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2652/2007.**

श्री राजेन्द्र तानबाजी सतई
साई प्रसाद प्लॉट नं. 69
महालक्ष्मी नगर, गल्ली नं. इ,
मानेवाडा रोड नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अध्यक्ष, नागपूर जिल्हा परिषद प्रथममिक
शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. नागपूर जिल्हा
C/o कामगार भवन, बैद्यनाथ चौक नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा
सर व्यवस्थापक, नागपूर जिल्हा परिषद प्रथममिक
शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. नागपूर जिल्हा
C/o कामगार भवन, बैद्यनाथ चौक नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.2.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.12.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या वतीने ॲड. एस. ए. अंसारी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.10.2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा सर व्यवस्थापक, नागपूर जिल्हा परिषद प्रथममिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. नागपूर जिल्हा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1 एप्रिल 2002 ते 31 मार्च 2006 पर्यंत संचालकांनी तसेच अधिकारी वर्गांनी उचलेले प्रवास भत्ता देयकाच्या सत्यप्रती.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 17.11.2007 रोजी अध्यक्ष, नागपूर जिल्हा परिषद प्रथममिक शिक्षक सहकारी पत संस्था मर्या. यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारची सुनावणी घेतलेली दिसून येत नाही व निर्णयही दिलेला नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सदरच्या अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 12.2.2009 रोजी उत्तरवादी यांचे वकील यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 हा डॉ. पंजाबराव देशमुख नागरी सहकारी बॅंक यांनी दाखल केलेल्या याचिका क्र. 5666/2007 मध्ये मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे सहकारी संस्थाना लागू होत नसल्याचा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या नियमाप्रमाणे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.2.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.621–623

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 149/2008.**

सौ. पुष्पाताई विठ्ठल सोनसरे
मु. पो. सिल्ली ता. कुही जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
उमरेड ता. उमरेड जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन कुही
ता. कुही जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.12.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन कुही यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

अर्जदार महिलेस रात्रीच्या वेळी सहा गाव गुडांनी एकटयात गाठून हात ओढणे साडी फाडणे, छातीवर बसणे केस धरुन ओढणे व मारपीट करणे गुन्हा संदर्भात माहिती देणे विषयी. अर्जदार महिलेनी शेती सौदया प्रकरणी गैरअर्जदार गाव गुडांना दलीली खावू दिली नाही म्हणून दि. 22.10.07 रोजी रात्री 8 वा. गावातील सहा इसमांनी एका एल्लीत गराडा घालून अर्जदार महिलेचे हात ओढुन खाली पाडणे, साडी फाडणे गंभीर मारहाण प्रकरणी आरोपीवर केलेल्या कार्यवाहीची माहिती देणे विषयी.

सदरची माहिती टपालाद्वारे घेणार किंवा नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 31.12.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्याबाबतची पोच सुध्दा दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 23.1.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध दिलेली असल्यामुळे प्रथम अपील खारीज केलेले दिसून येते.

3. उपस्थित असलेले पोलीस उपनिरीक्षक यांनी असे सांगितले की आपसात भांडण असल्यामुळे व दोघांच्या तक्रारी असल्यामुळे त्याप्रमाणे चौकशी करुन प्रतिबंधात्मक कार्यवाही केलेली आहे. अदखलपात्र असल्याने कोणत्याही प्रकारचा गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता नव्हती. परंतु अपीलकर्ता यांना गुन्हा दाखल करावा असे अपेक्षित आहे असे दिसून येते. परंतु अदखलपात्र गुन्हा असल्यामुळे त्याबाबत गन्हा दाखल केलेला नाही व विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 27.12.2007 च्या अर्जाप्रमाणे दि. 31.12.2007 रोजी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.625–627

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 146/2007.**

डॉ. सिमा वामनराव गेडाम
एच/नं. 433, गौतम नगर, गड्डीगोदाम
नगपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त – 1
महानगर पालिका नागपूर
2) श्री जी. डी. जांभूळकर
जन माहिती अधिकारी तथा
प्रकल्प संचालक (स्लम)
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 7.12.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून प्रकल्प संचालक (स्लम) महानगर पालिका यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती स्पेशल मॅसेंजरच्या माध्यमातून घेणार असे नमूद केलेले आहे. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अर्जदारास दि. 11.12.2007 रोजी विभागाकडे सुरु असलेले प्रकरण अर्जदार श्री कामराज जांभुळकर यांनी मा. विभागीय आयुक्त कार्यालयात अपील दाखल केलेली असल्यामुळे या प्रकरणा संबंधी सर्व नस्त्या दि. 17.11.2007 रोजी त्यांचे कार्यालयात पाठविण्यात आले त्यामुळे माहिती विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घ्यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 10.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. सदरच्या प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 17.1.2008 रोजी मा. विभागीय आयुक्त कार्यालयास कळवून नस्तीची मागणी करुन घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिल्यामुळे अपीलकर्ता यांना दि. 4.2.2008 रोजी त्याप्रमाणे कळविण्यात येवून दि. 13.2.2008 रोजी प्रत उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये सदर प्रकरणातील निर्णय प्रक्रियेच्या गुणवत्तेच्या संदर्भामध्ये असे कारण दिलेले आहे. मात्र माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये कोणत्या प्रकरणाची माहिती उपलब्ध झाली नाही असे नमुद केलेले नाही. अर्थात अपीलकर्ता यांचे अपील हे दि. 8.2.2008 रोजी दाखल झालेले आहे. व माहिती त्यांना दि. 13.2.2008 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते.

3. असे असले तरी अपीलकर्ता यांचे तर्फे श्री एस.के.बॅनर्जी पॉवर ऑफ अटर्नी म्हणून युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांना अपीलाची प्रत मिळाली परंतु परिच्छेदनिहाय अभिप्रायाची प्रत उपलब्ध झालेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी

यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणले की अपीलकर्ता यांना दि. 13.2.2008 रोजी संपुर्ण नस्ती ही दाखविण्यात आली होती व त्याप्रमाणे त्यांना खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपील प्रकरणामध्ये परिच्छेदनिहाय अभिप्रायाची प्रत हवी आहे अशी मागणी त्यांचे मुळ दि. 7.12.2007 चे अर्जात नसल्यामुळे तशी ती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर अपीलकर्ता यांना अपेक्षित अभिप्रायाच्या प्रतीची आवश्यकता आहे असे त्यांचे म्हणणे आहे. ही त्यांची नवीन मागणी असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असली तरी त्याकरीता अपीलकर्ता यांनी खर्चाचा भरणा करणे आवश्यक राहिल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी व्यक्तीशः संपर्क साधुन संबंधित नस्तीचे अवलोकन करुन त्यातील परिच्छेदनिहाय अभिप्रायाची प्रत आवश्यक तो खर्चाचा भरणा करुन हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत अपीलकर्ता कार्यालयीन वेळेत हजर झाल्यावर नस्ती अवलोकनास द्यावी व खर्चाचा भरणा कळवावा व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा केल्यावर माहिती उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.628–630

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 150/2008.**

श्री गोपाल चिंधुजी घाटे
कॉलरी वार्ड, वरोरा
मु. पो. ता. वरोरा जि. चंद्रपूर 442907 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मनोजकुमार शहा
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी नगर परिषद वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर
2) श्री सुभाष दे. तोडकर
जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद वरोरा
ता. वरोरा जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 21.9.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेकडे सन 1964–68 1972 ते 76 या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. असेसमेंट नमुना दत्त मंदिर वार्ड क्र. 64 ते 68 न.प.वरोरा फेरफार किंवा दुरुस्ती केल्या प्रकरणाचे दस्तऐवज मिळण्याबाबत.

2. मालमत्ता क्र. 76 अंबादेवी वार्ड 1972 ते 76 चे न.प.वरोरा असेसमेंट नमुना फेरफार दि. 27.6.76 ला दुरुस्ती केल्या प्रकरणाचे दस्तऐवज मिळण्याबाबत.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. त्याप्रमाणे दि. 20.12.2007 रोजी संबंधित विभागाकडून माहिती प्राप्त झाली व ती अपीलकर्ता यांना दि. 21.12.2007 रोजी उपलब्ध करुन देण्यात आली. तत्पुर्वी दि. 29.9.2007 ला माहिती स्वयंस्पष्ट नसल्यामुळे बोध होत नाही असे सुध्दा कळविण्यात आलेले दिसून येते. व त्याकरीता प्रत्यक्ष संपर्क साधण्याबाबत कळविण्यात आलेले होते परंतु तसे न करता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर दि. 16.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतर दि. 7.1.2008 रोजी पुन्हा अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पुन्हा कागदरत्रे उपलब्ध करुन दिलेली होती. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे अधिका–याने माहिती न दिल्यामुळे अपील करण्यात आहे असे अपीलाचे कारण दिलेले आहे.

3. वास्तविक अपीलकर्ता यांना वर नमुद केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असली तरी त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही त्यामुळे त्यांना कोणती माहिती अपेक्षित आहे असे विचारले असता उपलब्ध करुन दिलेली माहिती ही चुकीची आहे. सदरच्या मालमत्तेस त्यांच्या वडीलांचे नाव नसुन भोगवटदार म्हणून नाव आहे व ही नोंद चुकीची आहे असे त्यांचे म्हणणे आहे.

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की भोगवटदार नोंद करण्याच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कागदपत्राची आवश्यकता नसते. कर निर्धारण अधिकारी यांनी चौकशी करुन न. प. चा अधिकारी हा प्रत्यक्ष चौकशी करुन भोगवटदार कोण आहे याची नोंद करुन संबंधित मालमत्तेचा मालक हे अपीलकर्ता यांचे वडील असल्यास तशा प्रकारची नगर भूमापन कार्यालयाकडे नोंदी करुन घेणे आवश्यक होते व तसे केलेले नसल्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे किंवा नगर परिषदेने जो ठराव केलेला आहे त्या ठरावाची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांना सदरच्या मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत चुकीची नोंद झाली आहे असे वाटत असल्यास त्यांनी महाराष्ट्र नगर परिषद अधिनियम 1965 च्या प्रमाणे सक्षम अधिका–याकडे तक्रार करुन व योग्य ते पुरावे सादर करुन त्यांना अपेक्षित असलेले फेरफार किंवा नोंद ही करुन घेता येईल. सदरच्या प्रकरणी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 21.9.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 12.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.631–633

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 158/2008.**

श्री राधेशाम सदाशिव पटिये
343 नवि शुक्रवारी, सिमेंट रोड,
जानकीबाई धर्मशाळेजवळ, महाल नागपूर 32. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. एम. कडू
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
2) श्री डी. एम. सोनावणे
जन माहिती अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता (दक्षिण)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.5.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी एन.आय.टी नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

रिकामे प्लॉटवर बांधकामाचे प्लॅन मंजुर करण्यास सादर केलेल्या प्लॅन व सोबत सादर केलेल्या दस्तऐवजांच्या झेरॉक्स प्रति मिळणेबाबत.

माहितीचा कालावधी सन 2006 ते 2007

श्री गणेश बिल्डर्स मिश्रा कॉम्प्लेक्स सावरकर नगर बस स्टॉप खामला रोड नागपूर यांनी आदिवासी समाज उन्नती गृहनिर्माण सहकारी संस्था मर्या. नागपूरचे लेआउट मधील मौजा मानेवाडा येथील सर्वे नंबर 18/1,2,3 व 19 अंतर्गत प्लॉट रु. 119 क्षेत्रफळ 4280चौ.फुट वर बांधकाम करण्यास नविन प्लॅन आपले कार्यालयास सादर केले आहे. सदर प्लॉट त्यांनी श्री लिलाधर भाउ भाष्कर भाउ वल्द भिमराव हारोडे रा. गडेगाव ता. लाखनी जि. भंडारा यांचेकडून सन 2006–2007 मध्ये खरेदी केले आहे. प्लॅन मंजुरी करीता आवश्यक ते दस्तऐवज सोबअत जोडले आहे त्यापैकी खालील दस्तऐवजांच्या झेरॉक्स सत्य प्रती मिळाव्यात हि विनंती

1. खरेदी खताची झेरॉक्स सत्यप्रत
2. गैरकृषिकर अद्ययावत भरल्याची पवतीची झेरॉक्स सत्यप्रत
3. कार्पोरेशन नागपूरचे सन 2006–07 चे टॅक्स भरल्याचे झेरॉक्स प्रत
4. खरेदीखत नुसार खरेदिदाराचे नाव रेकॉर्डवर दर्ज झाले असल्यास फेरफार होवून दर्ज झाल्याचे दस्तऐवजाची झेरॉक्स प्रत
5. सिटि सर्वे क. 2 मध्ये खरेदीदाराचे नांव दर्ज झाल्याची दस्तऐवज प्रत
6. प्लॉट नं. 119 वर प्रस्तावित बांधकामाकरीता सादर केलेला प्लॅन

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 16.8.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरच्या उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 24.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल

केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 7.11.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थी यांना दस्तऐवजाबाबत आकारण्यात आलेली रक्कम अर्जदारास वेगवेगळया पत्राद्वारे कळविण्यात यावी तसेच अपीलार्थी यांचे रु. 404 एवढी रक्कम परत देण्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला असून अपील अमान्य करण्यात आलेले आहे. व त्या निर्णया विरुध्द राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 23.5.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.6.2007 रोजी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती करीता अतिरिक्त खर्चासाठी रु. 460/—जमा करावे. व माहिती घेवून जावी असे कळविण्यात आलेले दिसते. अपीलकर्ता यांनी दिनांक 16.8.2007 रोजी खर्चाचा भरणा केलेला दिसून येतो व त्याप्रमाणे दि. 21.8.2006 रोजी त्यांना विक्रीपत्र व मंजुर नकाशाच्या झेरॉक्स प्रती पुरविण्यात आलेल्या आहेत. व त्या करणास्तव एकुण पानांची संख्या व घेतलेली रक्कम यात बरीच तफावत असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले मात्र प्रथम अपीलामध्ये एकुण पुर्ण पेज कागदाच्या झेरॉक्स प्रती रु. 2/— प्रतिपेजप्रमाणे 18 पेजेस x 2 = 36.00, नकाशाची प्रत रु. 30/— प्रति वर्गफुट प्रमाणे (3.50 फूट x 2.50 फूट) 7.50 x 30 = 250.00 तसेच नकाशा प्रमाणित करण्याची फी रु. 200.00 असे एकुण रु. 461/— ची आकारणी योग्य आहे असा निर्णय दिलेला आहे. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की इतर माहिती त्यांना मिळालेली आहे परंतु नकाशाची जी छायांकित प्रत दिली आहे ती प्रमाणित केलेली नाही त्यामुळे प्रमाणित करण्याचे रु. 200 आकारण्याची आवश्यकता नाही व छायांकित प्रत सुध्दा वेगवेगळया शिट हे जोडून देण्यात आलेली आहे व त्यामुळे ती अमोनिया प्रिंट नाही तसेच ट्रेस करुनसुध्दा प्रमाणित प्रत करुन दिलेली नसल्यामुळे छायांकीत प्रत रु. 2 प्रमाणे जेवढे शिट त्या नकाशाला जोडून तयार केले असतील त्याप्रमाणे आकारणी करणे आवश्यक होते. महाराष्ट्र माहितीचा

अधिकार अधिनियम 2005 च्या नियम 4 (अ) (ब) प्रमाणे अपीलकर्ता यांचे म्हणणे बरोबर आहे असे दिसून येते. व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की अनेक शिट मिळून प्रत तयार केली असली तरी प्रत्येक शिट हे अे–4 च्या साईझचे नाही व त्यास झेरॉक्सचा जास्त खर्च येतो त्यामुळे झेरॉक्स प्रतीचा रु. 75/– खर्च आकारने योग्य ठरेल त्यामुळे अपीलकर्ता यांचेकडून प्रमाणित प्रती करीता जी आकारणी केलेली आहे ती अवाजवी असल्यामुळे नकाशाच्या एकुण छायांकित प्रतीचा खर्च रु. 75/– प्रमाणे घेवून उर्वरीत रक्कम ही अपीलकर्ता यांना परत करणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून नकाशाच्या उपलब्ध करुन दिलेल्या छायांकित प्रतीच्या संदर्भामध्ये प्रती रु. 75/– खर्चाची आकारणी करुन + 36 रु. असा एकुण रु. 111 ची आकारणी करुन (रु. 460–111) रु. 249 हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत परत करण्यात यावे.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.634–637

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 156/2008 व अपील कमांक 157/2008 .**

श्री राधेशाम सदाशिव पटिये
343 नवि शुक्रवारी, सिमेंट रोड,
जानकीबाई धर्मशाळेजवळ, महाल नागपूर 32. ..... **अपिलकर्ता**

**अपील कमांक 156/2008**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त – 2
महानगर पालिका नागपूर

2) श्री अशोक पाटील
जन माहिती अधिकारी तथा
प्रवर्तन अधिकारी
प्रवर्तन विभाग महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**अपील कमांक 157/2008**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त उपायुक्त – 1
महानगर पालिका नागपूर

2) श्री महेश गुप्ता
जन माहिती अधिकारी तथा
स्थावर अधिकारी
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

## ( आदेश पारित दिनांक 13.3.2009 )

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 156/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 29.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्रवर्तक अधिक्षक प्रवर्तन विभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

श्री धनराज हेमराज करमकर रा. 341 नवि शुक्रवारी, सिमेंट रोड, महाल नागपूर 32 याचें मंजुरी विरुध्दचे घराच्या बांधकामाबाबत योग्य ती कार्यवाही करण्याबाबतची नस्ती दि. 31.3.2004 रोजी व झोन क्र. 6 गांधीबाग तर्फे दि. 7.4.2004 रोजी आपले कार्यालयास अनधिकृत बांधकामाबाबत योग्य ती कार्यवाही करण्यास पत्र देण्यात आले होते. आपले कार्यालयाकडून त्यावर योग्य ती कार्यवाही झालेली नाही त्यामुळे खालील माहिती मिळावी.

अ. नगर रचनाकार मनपा नागपूर यांचेकडून प्राप्त झालेली आदेशाची टिपणीची प्रमाणित झेरॉक्स प्रत

ब. गांधीबाग झोन क्र. 6 कडून प्राप्त झालेल्या आदेशाची/टिपणीची प्रमाणित झेरॉक्स प्रत

क. उपरोक्त आदेशानुसार श्री करमकर यांचे अनधिकृत बांधकाम स्पॉटला पुढिल कार्यवाही करण्याकरीता भेट दिल्याची तारीख, भेट दिली असल्यास कार्यवाही न करताच परत जावून वरिष्ठ अधिका–यांचे आदेशाची अवहेलना करण्याची कारणे काय होती?

ड. अनधिकृत बांधकामाबाबात उचित कार्यवाही करण्यास कोर्टातर्फे मनाई हुकुम असल्यास त्याची प्रमाणित झेरॉक्स प्रत

ई. श्री करमकर यांचे मंजुरी विरुध्दचे बांधकामबाबत आवश्यक ती कार्यवाही न झाल्याने त्याची जबाबदारी कुणावर कशी केली गेली आहे.

अर्जाच्या अनुषंगाने दि. 11.6.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यास झोन क्र. 6 कडे संपर्क साधुन माहिती घ्यावी असे कळविलेले आहे. व तसेच अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 1.9.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नसून दि. 26.11.2007 रोजी प्रवर्तन अधिक्षक यांनी अपीलकर्ता यांना माहितीच्या संदर्भामध्ये प्रमाणित झेरॉक्स प्रती करीता आवश्यक शुल्काचा भरणा केल्यास देता येईल असे कळविलेले दिसून येते. तसेच इतर माहितीच्या संदर्भात सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भात असे सांगितले की जन माहिती अधिकारी म्हणून प्रवर्तन अधिक्षक यांचेकडे माहिती उपलब्ध असल्यामुळे व ते माहिती अधिकारी असल्यामुळे त्यांचेकडे माहिती मागितली होती व त्यांनी ती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. झोन क्र. 6 कडे स्वतंत्रपणे माहिती अधिकारी नाही व त्यामुळेच त्यांना दि. 26.11.2006 रोजी जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे ती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे व त्यातही प्रमाणित झेरॉक्स प्रत करीता आवश्यक शुल्काचा भरणा केल्यास देता येईल असे मोघम कळविलेले असल्यामुळे सदरचे पत्र स्विकारलेले नाही व उपलब्ध करुन दिलेली माहितीसुध्दा उडवाउडवीची उत्तरे देण्यात आलेली असल्यामुळे स्विकारलेली नाही. त्यावर प्रवर्तन अधिक्षक यांनी असे सांगितले की अतिक्रमणाच्या विरुध्द कारवाई करावयाची असल्यास सदरची नस्ती ही वेगवेगळया विभागाकडे जावून

मगच कारवाई केल्या जाते व त्यामुळे सदरची नस्ती ही झोन क्र. 6 कडे असल्यामुळे त्यांना तसे कळविण्यात आलेले होते. त्यावर सुध्दा अपीलकर्ता यांनी हरकत घेतली व माहिती ही प्रवर्तन विभागाने उपलब्ध करुन दिली पाहिजे असा युक्तीवाद केला. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी ती संकलित करुन अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते असे दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 29.5.2007 रोजीच्या अर्जात मागितलेली माहिती ही जन माहिती अधिकारी प्रवर्तन अधिक्षक यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

3. अपील क्र. 157/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 3.6.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

अे. नवि शुक्रवारी येथून पश्चिम पूर्व उत्तर दक्षिण वाहण्याच्या नाल्याचे दोन्ही बाजुस मोकळी असलेल्या नझुल कार्पोरेशनचे अधिकारात असलेल्या जागेवर अतिक्रमण करुन बिना परवानगीने व बिना मंजुरीने घरे झोपडया बांधकाम करण्यात आलेली आहेत काय? केली असल्यास बांधकाम करणा–यांची नावे घर क्र. व वार्षिक टॅक्स बाबत माहिती मिळावी.

ब. उपरोक्त बांधकामाबाबत प्रॉपर्टी वाचविण्याचे दृष्टीने काय कार्यवाही करण्यात आली

क. कार्यवाही केली नसल्यास कार्पोरेशनला झालेल्या नुकसानीस जबाबदार कोण व झालेले नुकसानीची किंमत किती होती किंवा आहे

बी. अ. गांधीबाग झोन क्र. 6 मनपा नागपूर स्वास्थ अधिकारी यांचेकडे दि. 9.5.07 व 19. 5.07 रोजी उपरोक्त नाल्याचे पूर्वेकडील काठाचे जवळील नझुल मनपा चे मालकीचे जागेवर झोपडी बांधली जात असल्याची तक्रार देण्यात आली आहे ती झोपडी बांधण्याचे काम आजही सुरु असुन या आठवडयात बांधकाम पूर्ण होईल

ब. पावसाळयात अतिवृष्टी झाल्यास अती पुरावमुळे सदर झोपडयांना क्षती पोहचून

आर्थीक नुकसान होण्याची दाट शक्यता आहे त्यामुळे उपरोक्त बांधकामास मनाई कां करण्यात आलेली नाही व यास जबाबदार कोण

क. मनपाचे जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे आर्थिक नुकसान किती होईल

ड. मुंबई येथे मागील वर्षी झालेल्या मिठी नदी सारखे प्रकरण झाल्यास नाल्याकडील वसलेल्या नागरीकांचे जिव व आर्थीक नुकसानीची भरपाई कोण देईल. नागपूरचे अधिकारी कर्मचारी यांचे दुर्लक्षामुळे उपरोक्त नुकसानीची भरपाई शासनातर्फे म्हणजेच सर्वसाधारण नागरीकांनी दिलेल्या कर मधील रकमेमधुन भरपाई का देण्यात यावी. उलट सदर नुकसानीस नपनाचे अधिकारी कर्मचारी यांचे दुर्लक्षच जबाबदार असल्याने ती रक्कम त्यांचेकउून वसुल का केली जावू नये

क. गांधीबाग झोन क्र. 6 येथे दि. 3.5.07 व 19.5.07 रोजी तक्रार दिल्यानंतर प्रत्येकी दोन कर्मचारी मोका पाहणी करुन गेलेत त्यांची नावे मिळावी तसेच त्यांनी मोका पाहणीची माहिती सादर केली असेल ती माहिती मिळावी सदर बाबतीत कार्यालयीन टिपणीची माहिती मिळावी

ड. आता तरी उपरोक्त सुरु असलेल्या झोपडीचे बांधकाम बंद करुन व ती पूर्णपणे तोडुन जागा मोकळी करण्यात यईल काय. व नाला साफसफाई केल्यावर नाल्याचे पात्रा तून निघणारे कचरा गाळ ठेवण्यास आता जागाच नसल्याने ती मोकळी जागा उपलब्ध होईल काय

डी. अ. नाल्याचे पात्रावर अनधिकृतपणे दोन ठिकाणी पक्के टाके बांधण्यात आले आहेत त्यामुळे नाल्याचे पुराचे वेळी पाणी वाहून जाण्यास अटकाव होवून आजुबाजुचे घरात पाणी शिरुन नुकसान होण्याची दाट शक्यता आहे. तरी उपरोक्त नियमबाहय बिनामंजुरीने नागरीकांनी स्वतः बांधलेले टाक्याचे बांधकाम काढून टाकण्यात येईल काय व संबंधीतावर कर्यवाही करण्यात येईल काय?

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 19.6.2007 रोजी सदरची माहिती ही मनपाच्या विभागीय कार्यालय गांधीबाग यांचेशी संबंधित असल्यामुळे अर्जदाराला सदरची माहिती परस्पर उपलब्ध करुन देण्यात यावी असे सुचविण्यात आले होते व तसे अपीलकर्ता यांनी सुध्दा लेखी माहिती देण्यात आले व तसा अर्ज विभागीय कार्यालय गांधीबाग यांचेकडून पाठविण्यात आला होता. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 1.9.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 24.9.2007 रोजी देण्यात आलेला असून गांधीबाग झोन तर्फे प्राप्त माहिती स्थावर विभागाने अपीलार्थीस द्यावी व त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे माहिती अधिकारी कोण आहे याबद्यल कळवावे असे आदेश दिलेले दिसून येते. व यावरुन सुध्दा अपीलकर्ता यांचे म्हणणे बरोबर आहे असे दिसून येते. त्यानंतर दिनांक 17.10.2007 रोजी अपीलकर्ता यांना एका पत्राने मागितलेल्या माहितीबद्यल कळविण्यात आले व त्यानुसार पत्रासोबत माहिती सलग्न करुन पाठविण्यात येत आहे असे कळविण्यात आले. तसेच आपण एकाच पत्रात जसे बांधकाम विभाग, आरोग्य विभाग इमारत विभाग इत्यादी विभागाची मागितलेली आहे. सदर विभागाचे माहिती अधिकारी हे एकच नसुन वेगवेगळे आहे. तरी याबाबत चौकशी करुन ज्या विभागाची माहिती आपणास पाहिजे त्या विभागाचे माहिती अधिकारी यांचेकडे स्वतंत्ररित्या अर्ज करुन माहिती घेण्यात यावी असे कळविण्यात आलेले दिसते. प्रत मिळाली परंतु माहिती अपुर्ण आहे अशी स्विकृती अपीलकर्ता यांनी दिलेली आहे. अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये जी माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलबध असेल त्याच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे आवश्यक राहिल व त्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय मागितलेले असतील त्याबाबत अभिप्राय देण्याची आवश्यकता नाही. तसेच इतर विभागाची माहिती मागितली असेल तर त्या विभागाकडे अपीलकर्ता यांचा माहितीचा

अर्ज हा हस्तांतर करणे आवश्यक राहिल व अशा प्रकारे अर्ज हस्तांतरीत केल्यानंतर त्या त्या विभागाने कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध असल्यास अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 156/2008 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून त्यांच्या दि. 29.5.2007 च्या अर्जाप्रमाणे छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती ही प्रवर्तन अधिक्षक यांनी संकलीत करुन हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा प्रवर्तन अधिक्षक यांचेशी संपर्क साधून विनामुल्य माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन घ्यावी. व तशी पोच द्यावी.

2) अपील क्र. 157/2008 हे अंशतः मंजुर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 24.9.2007 रोजी दिलेला निर्णय योगय असल्यामुळे त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 3.6. 2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध असल्यास विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

3) अपीलकर्ता यांच्या अर्जातील इतर विभागातील माहितीच्या करीता स्थावर अधिकारी यांनी माहितीचा अर्ज हा त्या त्या विभागाकडे हस्तांतरी करावा व सदरची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. अशा प्रकारचे

आदेश हे त्या त्या विभागाच्या माहिती अधिकारी यांना द्यावी व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांनी द्यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.638–645

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 162/2008.**

श्री किसन शामराव डंभारे
नेहरु वार्ड क्र. 3
मु. पो. रोहणा ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री वि. गो. पांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद वर्धा
2) श्री एम. के. तेलतुंबडे
जन माहिती अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.10.2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे शिक्षक प्रवर्गातील सहा. शिक्षक पदविधर अध्यापक, केंन्द्र प्रमुख, वि.अ.वि.कनिष्ठ वि.अ.वि.वरीष्ठ इत्यादी प्रवर्गाची सन 1995 ते 1007पर्यंतची बिन्दु नामावलीची सत्यप्रत. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जासोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 29.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 12.10.2007 च्या अर्जाप्रमाणे दि. 17.11.2007 रोजी माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी यांनी मागितलेल्या माहितीच्या करीता तसेच टपाल खर्च मिळून रु. 112/– रोखपालाकडे जमा करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरचे अतिरिक्त खर्चाची रक्कम जमा न करता अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. त्यात पुन्हा माहिती दिली नाही असे कारण दिले परंतु दि. 17.11.2007 च्या माहिती अधिकारी यांच्या पत्राचा उल्लेख केलेला नाही. त्यानंतर दि. 5.12.2007 रोजी अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र धारक असल्यामुळे मागितलेली माहिती रजिस्टर पोष्टाने अपीलकर्ता यांनी दिलेल्या पत्त्यावर पाठविण्यात आलेली दिसून येते. परंतु चौकशीअंती सदर नावाची व्यक्ती रोहणा या गावात राहात नाही असा शेरा पोष्टमन यांनी दिलेला दिसून येतो. परंतु राज्य माहिती आयोगाकडून त्रुटीपूर्ती करीता पत्र गेल्यावर त्या पत्राच्या संदर्भात दि. 17.11.2007 रोजी अपीलकर्ता यांनी त्याच पत्त्यावरुन त्रुटीपूर्ती केली असे दिसते. तसेच अपील क्र. 163/2008 मध्ये सुध्दा देविदस विठोबा निनावे या नावाने तशा प्रकारे माहिती मागितली जात आहे असे दिसते. यावरुन ही व्यक्ती एकच पण तिसरीच व्यक्ती दिसून येते. असे असले तरी जन माहिती

अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.646–648

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 163/2008.**

श्री देविदास विठोबाजी निनावे
मु. पो. पिपरी ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राम पवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.)
जिल्हा परिषद वर्धा
1) जन माहिती अधिकारी तथा
माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.2.2008 रोजी (दि.6.2.2008) राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.10.2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद वर्धा यांचेकडे आपल्या अधिकार कक्षेतील

खाजगी शाळेतील कार्यरत शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा–याची माहिती पुरविण्याबाबत. सन 2007पर्यंत नियुक्त व सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले असून अर्जदाराने दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 29.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे युक्तीवाद करतांना असे सांगितले की अपीलकर्ता स्वतः त्यांचे माहिती प्रमाणे शिक्षक आहे व शिक्षक असुनसुध्दा दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. तसेच माहिती ही जन माहिती अधिकारी यांनी तयार करुन पाठविण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः माहिती मागितलेली असल्यामुळे व ते माहिती घेण्यास आलेले नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तसेच आयोगाचे निदर्शनास असेही आपले आहे की अपीलकर्ता यांनी आयोगापुढे अपील दाखल करतांना त्यात प्रपत्र अ व ब च्या छायांकित प्रती दाखल केलेल्या नाहीत व त्यामुळे आयोगाकडून सदरची त्रुटीपुर्ती करावी याकरीता दि. 21.2.2008 रोजी मु. पो. पिपरी ता. आर्वी या पत्यावर पत्र दिलेले होते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दि. 27.3.2008 रोजी त्रुटीपुर्ती केलेली आहे परंतु त्याबाबत वापरलेला कागद यावर क्लासमेट डेट पेज अशा प्रकारचे छापलेले दिसून येते. व संपूर्ण हस्ताक्षर हे काळया शाईत आहे. हीच बाब आयोगास अपील क्र. 162/2008 मध्ये श्री किसन शामराव डंभारे यांच्याबाबत आढळुन आलेले आहे ते रोहणा गावचे आहे व त्यांनासुध्दा आयोगाचे कार्यालयातील त्रुटीपुर्ती करीता दि. 21.2.2008 रोजी पत्र पाठविण्यात आलेले होते व त्याप्रमाणे त्यांनी त्रुटीपुर्ती करीत वरील प्रमाणे क्लासमेट डेट पेज अशा प्रकारचे छापलेल्या कागदावर दि. 27.3.2008 रोजी आयोगाकडे त्रुटीपुर्ती केलेली आहे. यावरुन श्री किसन शामराव डंभारे व देविदास विठोबाजी निनावे

ही दोन्ही अर्जदार हे खरे अर्जदार नसुन तिसरीच व्यक्ती ही माहिती मागत असते असे दिसून येते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता हे दि. 20.10.2007 च्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे व्यक्तीशः माहिती घेण्यास आलेले नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.649–651

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 164/2008.**

श्री दिगंबर श्रीरामजी माथने
दे. गो. तुकुम वार्ड नं. 1, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) जन माहिती अधिकारी तथा
सचिव ग्राम पंचायत सिरसो
ता. मुर्तिजापूर जि. अकोला ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 13.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी तथा ग्राम सचिव गैरहजर आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल न करता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे तक्रार दाखल केलेली दिसून येते.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.12.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद कार्यालय अकोला यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

''विवाह नोंदीसाठी वापरलेले कागदपत्र,अर्ज,साक्ष स्वाक्ष–या याची नकल प्रत मिळणेबाबत ग्रामपंचायत सिरसो मुर्तिजापूर येथे विवाह नोंद करणा–या कागदपत्र आधारे केली याची माहिती मिळण्याबाबत. सन 2001. विवाह नोंद करण्यासाठी अर्ज लग्नपत्रिका साक्ष दिल्याबाबत कागदपत्र याचा नकल प्रत मिळण्याबाबत.''

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. तसेच दि. 20.12.2007 रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांचेकडे विनंती अर्ज सादर केलेला आहे. अपीलकर्ता यांच्या दि. 20.12.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती अधिकारी तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. 3.1.2008 रोजी सचिव ग्राम पंचायत सिरसो तथा शासकीय माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्राने आदेश दिलेले दिसून येते व त्या पत्राची प्रतिलिपी ही अपीलकर्ता यांना दिलेली आहे. त्यानंतर गट विकास अधिकारी मुर्तिजापूर यांचेकडे अर्ज केलेला दिसून येतो. परंतु खंड विकास अधिकारी यांनी दि. 6.12.2005 रोजी सचिव ग्राम पंचायत यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. दिनांक 13.10.2005 रोजी अपीलकर्ता अर्जदार यांनी सचिव ग्राम पंचायत यांचेकडे आपण माझ्या लग्नाचे खोटे सर्टिफिकेट दिले आपल्या अर्जामध्ये कागदपत्राची मागणी केलेली दिसून येते परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नाही.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्याचा विविह झालेला आहे अशी खोटीच नोंद करुन त्यांचेकडून संबंधित स्त्रिने रु. 15000/– ही खावटी वसुल केलेली आहे. ते विधुर असुन त्यांना तीन अपत्ये आहेत व त्यांनी पुर्नविवाह केलेला नाही व त्यामुळेच त्यांनी सदरची माहिती ही सचिव ग्राम पंचायत यांना मागितलेली होती. परंतु त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही व आजही माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा खुलासा न करता आयोगाची नोटिस दि. 18.2.2009 रोजी पाठविल्यानंतर दि. 4.3.2009 रोजी रजेचा अर्ज देवून रजा मंजुर करुन घेतली आहे.

वास्तविक नोटिस उपलब्ध झाल्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात त्यांना खुलासा पाठविला आला असता परंतु तसाही खुलासा त्यांनी पाठविलेला नाही व त्यावरुन जन माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जन माहिती अधिकारी तथा सचिव यांना मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच गट विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी याबद्यलचे आदेश दिलेले होते व त्याही आदेशाच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा खुलासा हा ग्रामसचिव यांनी केलेला नाही किंवा उपस्थित असलेल्या लिपीकाबरोबर पाठविण्यात आलेला नाही व त्यामुळे संबंधित ग्रामसचिव हे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व ते अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे दोषी आढळुन येतात. त्यामुळे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. वास्तविक मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा गट विकास अधिकारी यांनी त्यांचे आदेश पाळलेले नसल्यामुळे ग्रामसचिवा विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक होते. तसेच या संपुर्ण प्रकरणामध्ये अशा प्रकारे खोटया विवाह नोंदी होत असतील तर त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करणे जिल्हा परिषदेचे कर्तव्य आहे त्याकरीता सुध्दा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अकोला यांनी अशा प्रकारची चौकशी त्यांच्या अधिकार कक्षातील ग्राम पंचायतीमध्ये झालेल्या नोंदीच्या संदर्भात करणे आवश्यक आहे. सदरच्या प्रकरणात उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांचे माध्यमातून चौकशी करणे संयुक्तिक राहिल. व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या दि. 20.12.2007 च्या अर्जाप्रमाणे तसेच दि. 13.10.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक

यांनी छायांकित प्रती प्रमाणित करुन विनामुल्य त्यांच्या खोटया विवाहाच्या नोंदीबद्यल माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांचे म्हणण्याप्रमाणे जर खोटी विवाह नोंदणी झालेली असेल तर त्याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपमुख्यकार्यकारी अधिकारी यांचे करवी सदरच्या प्रकरणात चौकशी करावी व तशी चौकशी करुन संपुर्ण संबंधिताचे त्या गावातील बयाण घेवून अहवाल आयोगाकडे पाठविण्यात यावा व संबंधिताविरुध्द योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करावी.

3) ग्रामसचिव तथा जन माहिती अधिकारी यांनी त्यांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेश देवून सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद अकोला** व **खंड विकास अधिकारी पंचायत समिती मुर्तिजापूर** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढिल कार्यवाहीसाठी पोष्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 13.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.652—655

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 170/2008.**

श्री वामन काशिनाथजी हेंडवे
मु. पो. रसुलाबाद ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
जिल्हाधिकारी कार्यालय वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 9.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. माहितीच्या विषयातील लोकशाहि दिनाचे टोकन क्र. 1062 च्या विषयाप्रमाणे पोलीस

कार्यालयाकडून गैरअर्जदारावर गुन्हयाची नोंद होवून कारवाई केली असल्यास तशी माहिती किंवा कारवाई केली नाही तर का? ही माहिती हवी आहे.

2. माहितीच्या विषयातील लोकशाहि दिनाचे महाराष्ट्र शासन प्रपत्र 'ब' मिळण्याबाबत दि. 4.8.2007 आणि 24.9.2007 ला स्मरणपत्र देवूनही ते महाराष्ट्र शासन प्रपत्र 'ब' मला आतापर्यंत मिळाले नाही ते प्रपत्र 'ब' मला मिळावे.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 15.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलात त्यांनी निर्णय प्रक्रियेच्या संदर्भामध्ये प्रश्न उपस्थित केलेले दिसून येतात. परंतु प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला दिसून येत नाही. मात्र दि. 15.2.2008 रोजी अपीलकर्ता यांना लोकशाही दिनामाध्ये केलेल्या तक्रारीच्या संदर्भामध्ये व माहितीच्या अधिकारामध्ये मागितलेल्या प्रमाणे चौकशी अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे. सदरच्या चौकशी अहवालामध्ये तक्रारीबाबत चौकशी करण्यात येवून तीन चार वेळेला चौकशी करुन तसा अहवाल सादर केलेला आहे असे म्हटलेले आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांना पुर्वीच मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे ही कागदपत्रे दाखल केलेली आहेत त्यावरुन सुध्दा असे दिसून येते की त्यांना पुर्वीसुध्दा माहितीच्या अधिकारात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तीच तीच माहिती वेगवेगळया माध्यमातून मागत असल्यामुळे प्रत्येक वेळेस चौकशी झालेली आहे. व प्रत्येक चौकशीचा निष्कर्ष हा एकच दिसून येतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे व त्या माहिती मधून त्यांना विसंगती आढळुन येत असेल तर त्यांनी योग्य त्या सक्षम अधिका–याकडे योग्य त्या अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे अर्ज करुन न्याय मिळवून घेणे हा मार्ग आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे झालेल्या निर्णय

प्रक्रियेच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कारवाई ही अपेक्षित नसल्यामुळे अपीलकर्ता यांना विलंबाने माहिती उपलब्ध झाली असली तरी माहिती त्यांना पुर्वीच सुध्दा वारंवार उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.656–658

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 167/2008.**

श्री साहेबराव सुर्यभान सुपारे
गिताईनगर, तिवारी ले आउट
गोपूरी रोड वर्धा ता. जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री जी. बी. पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक
राज्य मार्ग परिवहन महामंडळ वर्धा
ता. जि. वर्धा
2) श्री अशाक परशुरामे
जन माहिती अधिकारी तथा
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी
राज्य मार्ग परिवहन महामंडळ वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.2.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभाग नियंत्रक राज्य मार्ग परिवहन महामंडळ वर्धा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. सन 2005 ची वार्षिक वेतन वाढ (सहा.वाहतूक निरीक्षक व वाहतूक निरीक्षक ता) पदाची न दिल्याबाबत

2. विभागामध्ये फक्त मला व इतर 3 लोकांना पदावनत केल्याबाबत व इतरांना न केल्याबाबत.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 30.3.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 7.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील हे विलंबाने दाखल केलेले असल्यामुळे फेटाळण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांना दि. 30.3.2007 रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याकरीता त्यांना दि. 23.3.2007 रोजी अतिरिक्त खचाच्या करीता पत्र देण्यात आलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की उपलब्ध करुन दिलेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे. त्यांनी वेतनवाढ मागितलेली होती व त्याबाबत कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता हे त्यांचेकडे सहा. वाहतुक अधिक्षक होते व त्यावेळेस पी डी सी 33/03 या परिपत्रकाप्रमाणे जी कारवाई करण्यात आलेली आहे ती त्यांच्या एकटयावर केलेली नसुन 34 कर्मचा–यांच्या संदर्भात करण्यात आलेली होती. मात्र त्यानंतर पुन्हा त्यांना पदोन्नती दिलेली असून ती पी डी सी प्रमाणे करता येत नाही. तरी सामान्य स्थायी आदेश क्र. 909 नुसार वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांच्या वेतननिश्चितीच्या संदर्भामध्ये जी कार्यवाही करण्यात आलेली

आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अर्थात अपीलकर्ता यांचे म्हणण्यानुसार सदरची कार्यवाही ही योग्य नाही परंतु त्याकरीता अपीलकर्ता यांनी सक्षम न्यायाधिकरणाकडे किंवा सक्षम अधिका–याकडे तक्रार करुन न्याय मिळवून घेता येईल त्यामुळे अपीलकर्ता यांना विहित मुदतीत झालेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 28.2.2007 च्या अर्जाप्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.659–661

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 172/2008.**

श्री राजू किसन वानखेडे
श्रीराम वार्ड, बल्लारपूर
ता. बल्लारपूर जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
निवासी उप जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 16.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 28.10.2007 रोजी जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मी दिनांक 28.5.2007 रोजी मा. जिल्हाधिकारी साहेब अध्यक्ष जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती जि. चंद्रपूर यांचेसमक्ष सर्व शिक्षा अभियान अंतर्गत योणा–या शैक्षणिक साहित्य निर्मिती मधील येणा–या भ्रष्टाचाराची चौकशी करुन तक्रारपत्र दाखल केले होते. त्या तक्रारपत्रावर आजपावेतो कोणताच कार्यवाही न करता दप्तर दिरंगाई कायदा 2006 चे उल्लंघन सुध्दा झालेले आहे. करीता दि. 28.5.2007 च्या तक्रारपत्रावर आपल्या समिती तर्फे काय कार्यवाही करण्यात आली याबाबत सविस्तर अहवाल देण्यात यावा.
सदरची माहिती ही नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.10.2007 रोजी अपीलकर्ता यांनी दिलेला तक्रार अर्ज दि. 28.5.2007 रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे चौकशी करीता पाठविण्यात आलेला आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु मागितलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.12.2007 रोजी जिल्हाधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. अपीलाचा निर्णय हा दि. 4.1.2008 रोजी देण्यात आलेला असून माहिती अधिकारी निवासी उपजिल्हाधिकारी यांना असे आदेश देण्यात येते की भ्रष्टाचार निर्मुलन समितीत दिलेल्या तक्रारी संबंधाने आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती अर्जदारास देण्यात यावी व या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीबाबत कळवावे असे कळविलेले दिसून येते. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 14.1.2008 रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना जिल्हाधिकारी चंद्रपूर यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे पत्र दिलेले दिसून येते. पुन्हा दि. 17.1.2008 रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद चंद्रपूर यांनी सर्व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास आदेश दिलेले दिसून येतात. पुन्हा दि. 24.1.2008 रोजी अशाच प्रकारचे पत्र दिलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की राज्य माहिती आयोगाकडून दि.18.2.09 रोजी दि. 16.2.2009 रोजीच्या सुनावणीची नोटिस उपलब्ध झाल्यानंतर पुन्हा माहिती उपलब्ध करुन देण्यास वेग आला असे दिसून येते. व त्याप्रमाणे दि. 28.11.2007 रोजी एकुण 15 पंचायत समितीमधून माहिती उपलब्ध झालेली दिसून येते. व त्याबद्यलची त्यांनी पोच पावती दिलेली आहे. तसेच अजुनही 6 पंचायत समिती क्षेत्रामधून माहिती त्यांना उपलब्ध व्हावयाची आहे परंतु त्याकरीता जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदरची माहिती ही त्यांना उपलब्ध करुन देण्यात येईल व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भात उर्वरीत 6 पंचायत समितीच्या क्षेत्रातील माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 20 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी व पोच घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 16.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.662—664

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 147/2008.**

श्री महेश चैतराम पाली

धरमपेठ टांगा स्टॅन्ड, प्लॉट क्र. 366

नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अतिरिक्त जिल्हाधिकारी नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

प्रभारी अधिकारी

एक खिडकी योजना जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. सदर प्रकरणी दि. 16.1.2009 रोजी अपील क्र. 2411/2007 मध्ये निर्णय झालेला असल्यामुळे त्याच प्रकरणात पुन्हा निर्णय देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 12.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.665

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 148/2008.**

श्री महेश चैतराम पाली
धरमपेठ टांगा स्टॅन्ड, प्लॉट क्र. 366
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र. 1
सिताबर्डी नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त सिताबर्डी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 12.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत. सदर प्रकरणी दि. 15.1.2009 रोजी अपील क्र. 2391/2007 मध्ये निर्णय झालेला असल्यामुळे त्याच प्रकरणात पुन्हा निर्णय देण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 12.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.666

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2351/2007.**

श्री जमाल सिद्दीकी
14 सिध्देश्वरी अपार्टमेंट
न्यु सुभेदार लेआउट नागपूर 24 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री चं. क. कानडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उप आयुक्त
परिमंडळ क. 2 सदर नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त
सदर विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.9.2007 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 16.10.2006 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

दि. 13.6.05 को स्पीड पोस्ट से भेजे तक्रार कि दि. 25.7.05 को दोपहर 3 बजे नागपुर सुधार प्रत्यास कार्यालय का गेट बंद कर परिसर में डेपोटिसन देने जा रहे सपा नेताओ से मार पीट कर घायल करने वाले पुलिस कर्मीयो पर क्या कार्यवाही की गयी इसकी जानकारी मिलने बाबत.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 16.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. आज अपीलकर्ता गैरहजर आहेत. कोणत्याही प्रकारचा लेखी खुलासा दाखल केलेला नाही. जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 11.11.2006 रोजी माहिती घेवून जावी असे सांगितले होते कारण त्यांनी माहिती व्यक्तीशः मागितलेली होती. परंतु माहिती ते घेवून गेले नाही. त्यानंतर प्रथम अपील दाखल केल्या नंतर दि. 4.6.2007 रोजी त्यांना पोलीस उपायुक्त तथा अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व सदरची माहिती ही त्यांना पोष्टाने पाठविण्यात आलेली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे विहित मुदतीत व्यक्तिशः माहिती घेण्यास गेले होते याबाबतचा त्यांनी मात्र पुरावा सादर केलेला नाही. तसेच प्रथम अपील त्यांनी 6 महिने विलंबाने दाखल केलेले आहे. परंतु त्याबाबतही प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती घेवून जाण्यास त्यांना कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 13.9.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच प्रथम अपील विलंबाने दाखल केले होते व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.667–669

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 180/2008.**

श्री सुदाम तुकारामजी चापले
काल्यायणी रुग्णालया मागे, बालाजी वार्ड,
चंद्रपूर ता.जि.चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आर. डी. पेंदराम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय चंद्रपूर
ता.जि.चंद्रपूर
2) श्री बी.एस. भोपे
जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख कार्यालय चंद्रपूर
ता.जि.चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 17.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

बलाजी वार्ड चंद्रपूर येथील सीट नं. 7 ब्लॉक नं. 88 प्लॉट नं. 24 आराजी 3490 चौ. फूट जागेपैकी 1282 चौ.फूट जागेवर स्व. तूकाराम नानाजी चापले यांचे पक्के घर व आवार आहे. परंतु आपले कार्यालयाने त्यांचे नावे खस–यातून गळाळ केले. ते कशाच्या आधारावर?

2. त्याच प्लॉट वर 1282 चौ.फूट जागेवर स्व. काशीनाथ विठ्ठल मेंढी यांचे घर आहे. परंतु आपले कार्यालयाने त्यांचे दत्तक पूत्र श्री सुरेश काशीनाथ मेंढी यांना 2565 व 3900 चौ. फूटाचा खसरा कशाच्या आधारावर लिहुन दिला.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.11.2007 रोजी अपीलकर्ता यांना 2 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 10.12.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलाच्या अनुषंगाने दि. 26.12.2007 रोजी अधिक्षक, भूमी अभिलेख यांनी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना अर्जदार यांना टपालाने माहिती पाठविण्यात यावी तसे या कार्यालयास कळविण्यात यावे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि. 8.1.2008 रोजी तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी आपण मागणी केलेली खसरा बाबत आपण या कार्यालयास फी भरल्यास आपणाला खसरा प्रत पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असली तरी त्यांचे म्हणणे असे आहे की त्यांना माहितीची अपेक्षा नसुन फेरफार केलेले आहे ते फेरफार कशाच्या आधारावर केलेले आहे याबद्यलची माहिती पाहिजे होती. परंतु जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देतांना कागदपत्रे न देता वारस हक्काने नाव दर्ज केले अशा प्रकारे

कळविले. व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलाच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी मागितलेल्या माहितीचे कोणतेही आकलन करुन घेतलेले नाही व त्यामुळे नेहमीप्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे पत्र दिलेले दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मात्र उपलब्ध झालेली नाही. जी बाब माहिती अधिकारी यांना माहित आहे तीच बाब अपीलीय अधिकारी यांनी द्या म्हणून आदेश करणे यावरुन अपीलीय अधिकारी यांना सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे संपुर्ण ज्ञान नाही असे दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर सुध्दा तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांनी खसरा प्रतीच्या संदर्भामध्ये फी भरुन घेवून जावी असे कळविले असुनसुध्दा अपीलकर्ता यांना कोणती माहिती अपेक्षित आहे याबद्यलची काहीही जाणीव दिसत नाही किंवा अर्जाचे वाचन त्यांनी केलेले नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. अपीलकर्ता यांच्या दोन्ही मुद्यातून जी फेरफाराच्या संदर्भात माहिती मागितलेली आहे ती कशाच्या आधारावर करण्यात आलेली आहे म्हणजे त्याबाबत कोणकोणते कागदपत्र दाखल करुन घेतलेले आहे त्या कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन दिल्या असत्या तर माहिती ही उपलब्ध करुन दिली असे झाले असते. अपीलकर्ता यांना सुध्दा त्या फेरफाराच्या संदर्भात तक्रार असल्यास त्यांनी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता 1966 च्या तरतुदीप्रमाणे स्वतंत्रपणे अपील हे सक्षम अधिका–याकडे करणे संयुक्तिक राहिल. व असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना फेरफार कशाच्या आधारावर केलेले आहे त्याबाबतची सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 11.10.2007 च्या अर्जाप्रमाणे मागितलेल्या दोनही माहितीच्या संदर्भामध्ये उपलब्ध असलेली कागदपत्राच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात याव्या.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 17.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.671–674

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 186/2008.**

श्री जयराम किसन चौके
रा. पारशिवनी (विश्वासनगर ले आउट)
पो. ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहा. अभियंता यांचे कार्यालय
महा. राज्य विज वितरण कंपनी लि. पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर
2) श्री जे. सी. पेंडके
जन माहिती अधिकारी तथा
सहा. अभियंता यांचे कार्यालय
महा. राज्य विज वितरण कंपनी लि. पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 18.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 5.11.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता यांचे कार्यालयात 1 जानेवारी 2007 ते 30 ऑक्टोबर 2007 या कालावधीतील खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

वरील कालावधीत विज चोरीची किती प्रकरणे उघडकीस आली. विज चोरी पकडण्यासाठी केव्हा केव्हा कार्यवाही केली व काय कार्यवाही केली? पंचनामे किती व काय केले? पंचनामे केले नाहीत तर त्याची कारणे? काम यादी द्यावी. श्री राजेश शंकरराव कुंभलकर यांचे घरी आपण स्वतः दि. 27.1.2007 रोजी विज चोरी पकडली त्याबाबत केलेल्या संपूर्ण कार्यवाहीचे दस्तऐवजांच्या प्रमाणित प्रती मिळावयात.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 17.11.2007 रोजी अपीलकर्ता यांना सहा. अभियंता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 27.12.2007 रोजी पुन्हा अपीलीय अधिकारी म्हणून सहा. अभियंता यांचे कार्यालयात प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. – जाने. 08 मध्ये पत्र दिलेले दिसून येते. व त्यामुळे अपील निर्णय नाही. त्या उत्तरामुळे सुध्दा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की त्यांनी जी माहिती दिनांक 5.11.2007 रोजी मागितलेली आहे ती पारशिवनी उपविभागातील असुन मागितलेली पूर्ण माहिती त्यांनी दिलेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांचे म्हणणे योग्य आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की त्यावेळसे त्यांचेकडे जी माहिती उपलब्ध होती तीच त्यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र चोरी प्रकरणातील पंचनाम्याची माहिती कनिष्ठ अभियंता यांचेकडे उपलब्ध असते व

त्यातही पोलीस केस झालेली असल्यामुळे सदरची सर्व माहिती ही त्या त्या प्रकरणामध्ये पोलीस स्टेशन नागपूर मध्ये दाखल केलेली आहे व त्यामुळे ती उपलब्ध करुन देता आलेली नाही. परंतु उत्तरात सुध्दा आपण सुध्दा विज चोरी केली असल्यामुळे आपले विज चोरी प्रकरण कनिष्ठ अभियंता पारशिवनी शहर यांनी दाखल केलेली असून त्याचा क्र. 4338 दि. 18.10.2007 आहे म्हणून आपण कार्यालयाला त्रास देण्याच्या हेतुने जास्त विनाकारण माहिती मागितलेली आहे. आपणास स्वतःबद्यलची माहिती पाहिजे असल्यास ती कनिष्ठ अभियंता शाखा शहर यांचेकडे उपलब्ध असल्यास मागून घ्यावी असे कळविलेले दिसून येते. याबाबत सुरुवातीलाच अपीलकर्ता यांना त्यांची विज चोरी पकडली होती असे विचारले असता त्यांनी नाही सांगितले. परंतु जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास विजचोरीच्या संदर्भातील संपुर्ण माहितीचा उल्लेख केलेला आहे व त्यावरुन अपीलकर्ता यांनीसुध्दा विजचोरी केलेली होती व म्हणूनच या संपूर्ण पारशिवनी उप विभागातील 1 जानेवारी 2007 ते 30 ऑक्टोबर 2007 या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते. यात कोणत्याही प्रकारचे व्यापक जनहित नाही. सदरची माहिती स्वहिताच्या करीता मागितलेली दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 18.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.676–678

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 196/2008.**

श्री नथ्थू खेतुलाल पालीवाल

मु. पो. खुबगाव ता. आवी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. गो. पांडे

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (प्राथ.)

जिल्हा परिषद वर्धा

2) श्री आर. एच. बोचरे

जन माहिती अधिकारी तथा

गट विकास अधिकारी

पंचायत समिती आर्वी

ता. आवी जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.12.2006 रोजी शासकीय माहिती अधिकारी गट विकास अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मी दि. 31.8.1991 ला सेवानिवृत्त झालो. त्यावेळी माझे असलेले मूळ वेतन कमी करुन 13402/– उपदानातून वसूल करण्यात आले चुंकीची केलेली वेतन निश्चिती दुरुस्त करुन देय होणारी रक्कम मिळण्याबाबत.

1.4.1966 ते 31.8.1991 पावेतोची फेरवेतन निश्चिती प्रकरण जि.प. वर्धेला पं.स.आर्वीने दोन वेळा फेरवेतन निश्चिती करुन पाठविलेले आहे. फेरवेतन निश्चितीत मूळवेतन वाढून अंतिम मूळ वेतन 2000/– झाले तरीसुध्दा सुधारीत मूळ वेतन व निवृत्ती वेतन बकाया सह कां मिळत नाही याची माहिती मिळण्याबाबत. अर्जासोबत सविस्तर अर्ज व इतर आवश्यक माहिती सोबत जोडलेली आहे असे म्हटलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 27.12.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 9.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपमुख्य कार्यपालन अधिकारी यांचेकडे दाखल केलेले असल्यामुळे त्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा निर्णय झालेला दिसून येत नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. सदरच्या प्रकरणात गुणवत्तेच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली असल्यामुळे त्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खुलासा दाखल केलेला दिसून येतो. व ज्याप्रमाणे अपीलकर्ता यांच्या प्रकरणात कार्यवाही झालेली आहे त्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये चुंकीची केलेली वेतन निश्चिती दुरुस्त करुन देय होणारी रक्कम मिळण्याबाबत तसेच सुधारीत मूळ वेतन व निवृत्ती वेतन बकाया सह कां मिळत नाही

अशा प्रकारची मागणी करण्यात आलेली आहे ती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नाही. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या 2 (च) प्रमाणे ''माहिती'' या संज्ञेप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणात साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्र, अभिलेखे, दस्तऐवजाच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते त्यांच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे हे अपेक्षित आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे वेतननिश्चितीची मागणी मान्य करता येत नाही परंतु त्याबाबत कोणकोणत्या प्रकारची कार्यवाही झालेली आहे ही अपीलकर्ता यांना कळविलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. त्यातही जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की कोणत्याही प्रकारची वेतननिश्चितीच्या संदर्भामध्ये मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी यांचे मत हे अंतिम असते व त्यांनी कळविलेले मत हे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. त्यावरही अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की प्रस्ताव दुरुस्तीस पाठविला तरीही तो दुरुस्त झालेला नाही. व त्यावरुन सदरच्या प्रकरणात निर्णय प्रक्रियेच्या संदर्भात सुध्दा निर्णय झालेला आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.12.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु द्वितीय अपील मेमोमधील ''चुकीने केलेली वसुली करीता, वेतननिश्चिती करणे माझे देय मला पूर्ण परत करणे'' ही मागणी मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.679–681

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 200/2008.**

श्री शामजी शिवराम रा>त

मु. पिंडकेपार पो. पाथरी

ता. गोरेगाव जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पी. के. क्षिरसागर

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

तहसिलदार गोरेगाव जि. गोंदिया

2) श्री पी. एस. नंदनवार

जन माहिती अधिकारी तथा

नायब तहसिलदार गोरेगाव जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 19.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 14.9.2007 रोजी श्री पी. एस. नंदनवार नायब तहसिलदार माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

तलाठी रेकॉर्डच्या नकला मिळण्याबाबत 8 अ व 7 बारा. दि. 22.3.2007 ते आजपर्यंत तलाठी रेकॉर्डच्या नकला 8 अ व 7 बारा मिळण्याबाबत मी दि. 22.3.2007 ला अर्ज केला असुन मिळाली नाही.

सदरची माहिती स्वतः उपस्थित राहून घेणार असे नमूद केलेले आहे. सोबत दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. तसेच रामजी शिवराम रा>त यांचे मृत्यु प्रमाणपत्र जोडलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 19.10.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. व त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की दि. 22.3.2007 रोजी त्यांचा प्रथम अर्ज आला होता व माहिती ही तलाठी यांचे कार्यालया संबंधी असल्यामुळे दि. 23.10.2007 रोजी तलाठी यांना नक्कल देण्यास कळविले पुन्हा दुस–या अर्जानुसार कार्यालयात नक्कल सादर करण्यास कळविले. मौजा पिंडकेपार तलाठी रेकॉर्डच्या नकला मिळण्याबाबत नमुना 8 अ व 7/12 माहिती त्रयस्थ संबंधात असल्यामुळे कार्यालयाचे पत्र क्र. प्रस्तु 1/कावि 1394/07 दि. 24.9.07 नुसार तलाठी यांना कळविले. अर्ज क्र. 1 व 2 नुसार तलाठी यांनी मृतक रामाजी रा>त किंवा त्यांचा वारसानाचे नावाने 7/12, 8 अ रेकॉर्डला उपलब्ध नसल्याचे दि. 30.10.2007 रोजी अर्जदारास कळविले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये संबंधित माहिती तलाठी संबंधी असल्यामुळे व अर्जदाराचे नावाने 7/12, 8 अ नसल्यामुळे दि. 25.10.2007 रोजी अपील खारीज करण्यात आले. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने तलाठी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 19.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.682–684

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 207/2008.**

श्री श्रीहरी सिताराम पेंदाम
अंचलेश्वर वार्ड नं. 1, बालाजी मंदिर समोर,
चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधीक्षक भूमी अभिलेख चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री बी. एस. भोये
जन माहिती अधिकारी तथा
तालुका निरीक्षक
भूमी अभिलेख चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.6.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून उपसंचालक भूमी अभिलेख यांचे कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

मो. मा. क्र. 651/2006 कार्यालय तालुका निरीक्षक भूमी अभिलेख चंद्रपूर दिनांक 5.11.2006 च्या मोजणीचा सविस्तर तपशिल माहिती मिळण्याबाबत.

सदरचा अर्ज हा दि. 27.6.2007 रोजी कार्यालय अधीक्षक उपसंचालक भूमी अभिलेख यांनी माहिती ही जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे सदरचा अर्ज हस्तांतर केलेला दिसून येतो. जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख यांनी सदरचा अर्ज तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांना प्रतिलीपी दिली असल्यामुळे सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 16.7.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांनी यापूर्वी सुध्दा माहितीचा अर्ज दाखल केलेला दिसून येतो व त्याबद्यलची माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी सांगितले की त्यांनी जी दि. 5.11.2006 रोजी मो. मा. क्र. 651/2006 चे मोजणीच्या बाबत सविस्तर तपशिल मागितला होता त्याबद्यलची माहिती त्यांना दिलेली नाही पण त्यांनी स्वतःच्या शेत जमिनीची मोजणी करुन घ्यावी असे उत्तर दिलेले दिसून येते. व त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मो. मा. क्र. 651/2006 मधील मोजणीचा हा अपीलकर्ता यांचा नसुन त्यांच्या लगतच्या शेतमालकाचा अर्ज आहे. माहितीचा अर्ज केल्या तारखेच मो. मा. क्र. 651/2006 मधील 'क' प्रत ही मोजणीदारास दिलेली नसल्यामुळे लगतच्या शेतमालकास तशी फी उपलब्ध करुन देता येत नव्हती व त्यामुळे त्यांनी त्यांच्या माहितीच्या अर्जात जे आक्षेप घेतलेले आहे त्या आक्षेपाच्या संदर्भात त्यांना स्वतःच्या शेत जमिनीची मोजणी करुन घ्यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी जे आक्षेप नोंदविलेले आहे. ते अर्थातच

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे नाही. व त्यामुळे त्यांना कागदपत्राच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देतांनाच अपेक्षित असल्यामुळे आता मो. मा. क्र. 651/2006 मधील 'क' प्रत ही संबंधित अर्जदारास दिली गेलेली नसल्यास आता मो. मा. क्र. 651/2006 मधील सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रती हया अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 1.6.2007 च्या अर्जामध्ये नोटिस क्रमांक मो. मा. क्र. 651/2006 मधील संपुर्ण कागदपत्रे मोजणीदाराच्या अर्जापासून लगतच्या शेतमालकाच्या आक्षेपापर्यंत सर्व कागदपत्राच्या छायांकित प्रती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.685–687

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 214/2008.**

श्री समीर मोहनराव केने
न्यु कॉलनी क्वा. नं. एच/845, बल्लारपूर
जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयातून निवडणूकीचा कालबध्द कार्यक्रम सुरु असल्याने उक्त दिनांकास हजर राहू शकत नाही असे जिल्हाधिकारी चंद्रपूर करीता कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध

करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितलेले असल्यामुळे सदरचे अपील सुनावणीस घेण्यात आले.

2. अपीलकर्ता यांनी दि. 17.5.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

प्रशासकीय भवन चंद्रपूर येथे असलेल्या झेरॉक्स सेंटर कोणला, कसे व कोणत्या कालावधीत देण्यात आले. 2. सदर झेरॉक्स सेंटर नियमान्वये देण्यात आले काय? 3. हया झेरॉक्स सेंटर देण्यासंबंधीचे टेंडर आले होते काय व कसे 4. हया झेरॉक्स सेंटरच्या प्राप्तीसाठी सुशिक्षित बेरोजगार सेवा संस्थांनी अर्ज केला होता काय? 5. शासन जी. आर. प्रमाणे विना निविदा बेरोजगार संस्थांना हे सेंटर देण्यात येवू शकते काय? 6. सध्या चालवित असलेले व्यक्ती (झेरॉक्स सेंटरचे) नाव काय? कोणत्या अवधीपर्यंत त्यांच्याकडे हे सेंटर देण्यात आले आहे. त्यांचे रिनीवल कसे करण्यात आले व केव्हा.

अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 13.5.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे अपीलकर्ता यांनी पुन्हा आयोगास सांगितले. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 17.5.2007 रोजी मागितलेली माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलाची सुध्दा दाखल घेलेली नसल्यामुळे तत्कालीन प्रथम अपीलीय

अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे तसेच शासन निर्णयाचे उल्लंघन केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो व त्यांचे विरुध्दसुध्दा प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरीता सदरचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.5.2007 च्या अर्जात मागितलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 15.5.2007 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे 30 दिवसाचे आंत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे ते दोषी आढळुन येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाही करण्याची शिफारस करण्यात येते.

3) सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हाधिकारी यांनी 3 महिन्याचे आत करावयाची आहे व तसा अहवाल आयोगास सादर करावा.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत पुढील कार्यवाहीसाठी **जिल्हाधिकारी चंद्रपूर** यांचेकडे पोष्टाने पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.688–690

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 209/2008.**

श्री विनोदकुमार इश्वरलाल बोहणे
मु. लोधीटोला प्र.क्र. 17, न.प.तिरोडा 441911
ता. तिरोडा जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री क्रांतीकुमार धोटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक
तंत्र शिक्षण संचालनालय नागपूर
प्रादेशिक कार्यालय, सदर, नागपूर
2) श्री मिलींद जोशी
जन माहिती अधिकारी तथा
सहा. संचालक
तंत्र शिक्षण प्रादेशिक कार्यालय, सदर, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 20.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 17.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 12.12.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी सहसंचालक तंत्र शिक्षण संचालनालय या कार्यालयाला खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. लेखी परीक्षेत उपस्थित राहणा–या विदयार्थ्याना किती दिवसामध्ये घरपोच पत्र मिळणे आवश्यक आहे?
2. सदर पदावर लागलेले सर्व कर्मचा–यांची माहिती त्यांचे गुण त्या पत्राचा जा. क्र.
3. मुलाखतीला पात्र विदयार्थ्याची पूर्ण माहिती अनुभवासहीत
4. पोस्टेज खर्च सर्व परिक्षार्थ्याकडून वसूल केला जातो ते कशासाठी?
5. आपल्या पहिल्या पत्रात पुरावा जोडलेले होते. त्यामध्ये जितके सवाल केले होते त्यांची उत्तरे कां नाही दिले?
6. 5 रु. ची डाक टिकीट च्या पत्राला 140 कि मी पार करायला किती दिवस लागतो
7. कमी केलेली तक्रार का संयुक्तीक वाटत नाही.
8. त्याची पुराव्यासह माहिती पाहिजे
9. आपण 5 रु. ची डक टिकट लावलेला लिफाफा का घेता
10. मी पाठविलेला 200 चा डी डी कुठे गेला.

अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 10.1.2008 रोजी माहिती अधिकारी तथा सहा. संचालक यांनी एकुण 10 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 1.2.2008 प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 10.3.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकाराने विचारलेले प्रश्न व त्यावर माहिती अधिकारी यांनी दिलेले मुद्येनिहाय उत्तर व सादर केलेला तपशिल ग्राहय धरण्यात आला तो योग्य आहे व उपरोक्त निवेदनानुसार प्रस्तूत अपील हे फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील मेमोमध्ये अपीलकर्ता

यांनी प्रवेशपत्र वेळेवर न मिळाल्याची योग्य माहिती न दिल्याबद्यल असे अपीलाचे कारण दिलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचे कागदपत्र किंवा शासन निर्णय उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या 2 (च) प्रमाणे ''माहिती'' या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे कागदपत्राच्या छायांकीत प्रती उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते व त्यामुळे मुद्या क्र. 1 च्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारचा नियम नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा जो निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे तो योग्य आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 12.12.2008 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 20.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.691—693

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 216/2008.**

श्री वि. जे. खोब्रागडे

पि.पि.कॉलेज रोड, नाना चौक,

कुंभारे नगर, गोंदिया ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा

2) श्री विनोद हरकंडे

जन माहिती अधिकारी तथा

जिल्हा पुरवठा अधिकारी भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.1.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली असून निवडणूकीच्या कामकाजामुळे हजर राहता येत नाही असे कळविलेले आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 19.9.2007 रोजी राज्य जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी भंडारा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

जिल्हा मार्केटिंग फेडरेशन भंडारा यांचे प्रतिनिधीने आधारभूत योजने अंतर्गत खरेदी केलेल्या धानामध्ये आलेल्या तुटीबाबद आपण मला गोदाम तुटीचे प्रकरण तयार करण्याकरीता प्रवृत्त केले. त्यानुसार गोदाम तुटीचे प्रकरण तयार करुन तहसीलदार पवनी मार्फत जि.पु.अ. कार्यालयात सादर केले. यात माझा काहीच संबंधत येत नाही. तरी पण आपण माझ्या कडून तुटिची रक्कम वसूल करण्याचे आदेश दिले. ते कोणत्या महितीच्या अधिकारानी वसुल केले ती माहिती देण्यात यावी.

सदरची माहिती टपालाद्वारे देण्यात यावी असेही नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 1.2.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व त्या प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 19.9.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 5.10.2007 रोजी कोणती माहिती अपेक्षित आहे असा खुलासा विचारलेला दिसून येतो. व त्यावरुन अपीलकर्ता यांनी कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नाही व त्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखलच घेतली नाही असे दिसून येते व त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. प्रथम अपीलाचा निर्णय कां देण्यात आलेला नाही याबद्यलचा खुलासा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी केलेला नाही व त्यामुळे त्या बाबीची चौकशी जिल्हाधिकारी यांनी करुन योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक राहिल अन्यथा प्रथम अपीलीय अधिकारी हे केव्हाही प्रथम अपीलाची दखलच घेणार नाही.

4. राज्य माहिती आयोगाकडे आजच्या सुनावणीस माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी सदरच्या प्रकरणातील गुणवत्तेच्या संदर्भात खुलासा केलेला आहे. अपीलकर्ता यांना कोणती माहिती अपेक्षित आहे असाही अर्ज केल्यावर कळविले नाही परंतु अपीलकर्ता यांनी खुलासा केलेला नसतांनासुध्दा आयोगापुढे मात्र त्या प्रकरणाचा खुलासा केलेला आहे. यावरुन अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या प्रकरणात त्यावेळेस कागदपत्रे उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 19.9.2007 च्या अर्जाप्रमाणे कागदपत्राच्या छायांकित प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीच्या अधिकारातील अर्जाची प्रक्रिया ही योग्य रितीने केलेली नसल्यामुळे त्यांना ताकीद देण्यात येत आहे व सदरची ताकीद ही त्यांच्या गोपनिय अहवालामध्ये नोंद घेण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.694—696

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 220/2008.**

श्री गुलाब बन्सोड

सामाजिक कार्यकर्ता तथा अध्यक्ष ट्रेड युनियन 218

विनोबा नगर, तुमसर जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री यशविरसींग

प्रथम अपीलीय अधिकारी तथा

उपवनसंरक्षक

भंडारा वनविभाग भंडारा ता. जि. भंडारा

2) श्री डी. एच. रा>त

जन माहिती अधिकारी तथा

सहा. वनसंरक्षक (तेंदुपाने)

वनविभाग भंडारा ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 2.1.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी वनसंरक्षक (तेंदुपाने) वनविभाग यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. जाने. 05–2006–07पर्यंत बांधण्यात आलेल्या एकूण वनतलावाची संख्या किती?

2. सन 05–2006–07पर्यंत बांधकामात आलेल्या प्रत्येक वनतलावाची एकूण किंमत किती?

3. 05–2006–07 च्या कालावधीत कोणास किती वनतलाव बांधण्यात आलीत याचा तपशिल

4. बांधकामात आलेल्या वनतलावाकरीता कोणसा क्वरीमधून बोल्डर, गिटटी, वापरण्यात आली एकूण पिचिंग करीता वापरात आणलेल्या गिटटी बाल्डरचे प्रमाणे संख्या.

5. वनतलावाचे कामे वनविभागामार्फत किंवा ठेकेदारामार्फत करण्यात आलेत विवरण

6. विभागामार्फत वनतलाव बांधण्यात आलेल्या हजेरीपटावर किती मजूर व किती दिवस कामे करण्यात आली तपशिल.

7. वनतलावाच्या कामावर लावलेल्या मजूरांना तांदूळाचे कुपणाचे वाटप करण्यात आले किंवा नाही कुपनाचे वाटप किती मजूरांना करण्यात आले तपशिल

8. वनतलावाच्या कामावर लावण्यात आलेलया मजूरांना प्रति दिवस किती रुपये मजूरी देण्यात आली.

9. वनतलावाची एकुण लांबी किती किलोमिटर तसेच वनतलावास किती किलामिटर पिचिंग करण्यात आले तपशिल

10. वनतलावाचे कामे कोणत्या तारखेपासून सुरु करण्यात आलीत व कोणत्या तारखेला पूर्णत्वास आले त्यांचा दिनांक

11. वनतलावांना वेस्ट वाटर बांधण्यात आले किंवा नाही तपशिल द्यावा.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. 4.2.2008 रोजी प्रथम अपील

दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलात सुध्दा माहिती मिळाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 2.1.2008 चा अर्ज हा कार्यालयात दि. 5.1.2008 रोजी प्राप्त झाला असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता दि. 11.1.2008 रोजी तुमसर व भंडारा येथील वनपरिक्षेत्र अधिकारी तुमसर यांची 1 ते 11 मुद्याची माहिती पुरविली. दि. 23.6.2008 रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी भंडारा यांची 1 ते 11 मुद्याची माहिती पुरविली असे जन माहिती अधिकारी यांनी खुलासा दिलेला आहे. वनपरिक्षेत्र अधिकारी तुमसर यांचेकडून दि. 14.1.2008 रोजी माहिती सविस्तर असल्यामुळे 3 महिन्यात देता येणार नाही असे त्यांनी कळविलेले दिसून येते. जन माहिती अधिकारी यांचेकडे विभागात माहिती उपलब्ध असते असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे व त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करण्याच्या दृष्टीने त्यांनी वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे माहिती मागितली व त्यामुळे सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिली असली तरी अपुर्ण आहे. अपीलकर्ता यांचेशी वारंवार पत्रव्यवहार केलेला दिसून येतो व माहितीसुध्दा उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलात किंवा द्वितीय अपील मेमोमध्ये किती माहिती उपलब्ध झाली व किती माहिती उपलब्ध झाली नाही याबद्यलचा कोणताही खुलासा केलेला नाही व त्यामुंळे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे प्रमाणे माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुन्हा आयोगापुढे सांगितले व माहिती ही विस्तृत असल्यामुळे तयार करुन उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला आहे. यावरुन माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेला आहे असा निष्कर्ष काढता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीमध्ये अपुर्ण माहिती जरी असली तरी त्याबद्यलचा खुलासा अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे करणे आवश्यक आहे. व त्याप्रमाणे

माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 2.1.2008 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांच्या तोंडी सांगण्याप्रमाणे अपुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांना मुद्येनिहाय कोणती माहिती अपुर्ण आहे याचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत करावा व त्यानंतर 20 दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना उर्वरीत माहिती विनामुल्य छायांकीत प्रतीच्या स्वरुपात व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदारची माहिती ही व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी. व तशी पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.697–700

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 218/2008.**

श्री राधो भाकरुजी तळेकार
मु. पो. चापेगडी ता. कुही जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी (महसूल) उमरेड
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 1.1.2008 रोजी उपविभागीय अधिकारी उपविभाग कार्यालय (महसूल) उमरेड यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

कुही तहसिल अंतर्गत मौजा चापेगडी प.ह.नं. 58 जागेवर भुमापन क्र. 167 मधील भुखंड क्र. 122 माजी सरपंच शंकर कवडू मोहनकर यांना निवासाकरीता देण्यात आले होते सदर व्यक्तीने राजू वैद्य इसमास 1 लाख 3 हजारात भुखंड विक्री करुन भुखंड सरकार जमा करण्यात येवून माहिती दयावी.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे. मागितलेली माहिती ही तहसिल कार्यालय स्तरावर असल्यामुळे सदरचा अहवाल हा उपविभागीय अधिकारी उमरेड यांनी तहसिलदार कुही यांना हस्तांतरीत केलेला दिसून येतो. सदरच्या पत्रामध्ये नियमाप्रमाणे आवश्यक शुल्क भरुन उपलब्ध करुन द्यावी असेही नमुद केलेले आहे. त्यामुळे दि. 18.2.2008 रोजी तहसिलदार कुही यांनी अपीलकर्ता यांना आपला अर्ज हा या कार्यालयात प्राप्त झाला असून सदर प्रकरण या कार्यालयात सुरु होते. सदर प्रकरणात भुखंड शर्त भंग दंड म्हणून रु. 31275/— आकारण्यात येवून प्रकरणात सुधारीत अहवाल तसेच मुळ प्रकरण पुढील आदेशार्थ कार्यवाहीस उपविभागीय अधिकारी उमरेड यांना दि. 12.12.2007 रोजी सादर करण्यात आलेले आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 7.4.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 29.4.2008 रोजी निर्णय दिलेला असून अपीलकर्ता यांना दि. 18.2.2008 रोजी उत्तर दिलेले आहे व त्यातून माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. प्रथम अपीलीय अधिकारी यानी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे.

माजी सरपंच शंकर मोहनकर यांना चुकीने महसूल भुमापन क्र. 167 मधील भुखंड क्र. 122 इंदिरा आवास योजनेअंतर्गत आवंटीत झालेले आवास राजु वैद्य यांना बेकायदेशिर विक्री केली. पटटयातील शर्तीचा भंग केल्यामुळे दोषीवर दंड व भुखंड जमा

करण्याबाबतची माहिती अपीलार्थीने अपीलाद्वारे केली आहे. अपीलार्थीने याअगोदर दिनांक 4.1.2008 रोजी उपविभागीय अधिकारी उमरेड यांचेकडे दाखल केलेल्या माहितीच्या अर्जानुसार उपविभागीय अधिकारी उमरेड यांनी दि. 9.1.2008 रोजी तहसिलदार कुही यांना पत्रव्यवहार करुन माहिती उपलब्ध करुन देण्यास कळवुन माहितीचा अर्ज तहसिलदार कुही यांचेकडे हस्तांतरीत केला. तहसिलदार कुही यांनी दि. 18.2.2008 रोजी अपीलार्थीस माहिती दिल्याचे दिसुन येते. यावर अपीलार्थीनी उपविभागीय अधिकारी यांचेकडे दि. 17.3.2008 रोजी माहितीचा अर्ज दाखल केला. उपविभागीय अधिकारी उमरेड यांनी दि. 19.3.2008 रोजी दिलेल्या निर्णयानुसार मागणी माहितीचे संबंधीत प्रकरण क्रमांक तसेच प्रकरण केव्हा सुरु झाले आहे याबाबत सविस्तर माहिती नसल्यामुळे अर्ज नामंजूर केल्याने व्यथित होवून.

दिनांक 11.4.2009 रोजी प्रथम अपील डाकद्वारा मा. जिल्हाधिकारी यांचे आवक जावक मार्फत प्राप्त झाली. प्राप्त अपीलासोबत प्रथम अपील व्यतिरिक्त कुठलेही इतर कागदपत्रे अपीलार्थीनी जोडलेली नव्हती. प्रकरणात दि. 29.4.2008 रोजी अपीलार्थी व माहिती अधिकारी यांचे उपस्थितीत सुनावणी घेण्यात आली.

सदर प्रकरणात माहिती अधिकारी हे तहसिलदार कुही आहेत. त्यामुळे सदर प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे उपविभागीय अधिकारी उमरेड होतील. त्यामुळे या कार्यालयातील प्राप्त अपील ही द्वितीय अपील असल्याने तसेच द्वितीय अपील चालविण्याचे अधिकार हे मा. माहिती आयुक्त यांना आहेत. त्यामुळे या कार्यालयानी दि. 29.4.2008 रोजी दिलेल्या निर्णयानुसार उपविभागीय अधिकारी उमरेड यांचेकडे याअगोदर दि. 17.3.2008 रोजी दाखल केलेला अर्ज हा प्रथम अपील ग्राहय धरुन नियमानुसार प्रकरणात सुनावणी घेवून अपीलार्थीस माहिती मिळेल यादृष्टीने उपविभागीय अधिकारी उमरेड तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या अधिकारानुसार कार्यवाही करण्याचे आदेश परीत केले.

सदरच्या खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे. मात्र माहितीच्या अधिकारामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मागता येत नाही. तरीही अपीलकर्ता यांना स्वतंत्रपणे सुरु असलेल्या कार्यवाहीची माहिती दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना अपेक्षित असलेल्या कार्यवाहीच्या संदर्भामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.701–704

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 225/2008.**

श्री रुपचंद भगवानजी ढाले
724, आशिर्वाद नगर, हुडकेश्वर रोड,
नगपूर 24. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुभाष एम. पानसे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक वर्धा
2) श्री संजय डहाके
जन माहिती अधिकारी तथा
पोलीस स्टेशन कारंजा (घाडगे)
जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.2.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.4.2006 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस स्टेशन कारंजा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

Copy of spot Panchnama of Babhul tree culters statement given in F.I.R. case no. 33/96 dt. 24.6.96.

सदरच्या माहितीचा कालावधी 1996 आहे व माहिती ही स्पिड पोष्टने घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 22.10.2007 रोजी पोलीस अधीक्षक वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतु पोलीस अधीक्षक हे अपीलीय अधिकारी नसल्यामुळे त्यांनी आर्वी येथील उपविभागीय पोलीस अधिकारी हे अपीलीय अधिकारी म्हणून त्या कार्यालयात हस्तांतर केले. त्यानंतर अर्जदार यांनी दि. 10.7.2006 रोजीचा तारीख असलेला कोणत्याही प्रकारचा तिकिट फी न लावता अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे कार्यालयात दि. 13.9.2006 रोजी सादर केला. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये तत्कालीन ठाणेदार सी.एन.बहादुरे यांनी सदर अर्जाची माहिती पोलीस स्टेशन कारंजा यांचेकडे पाठविली व दि. 26.6.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व त्यात त्यांनी घटनास्थळ पंचनाम्याची प्रत मागितलेली होती ती आतापर्यंत त्यांना प्राप्त झालेली नाही असे अपील करण्याचे कारण दिलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.4.2006 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात व प्रथम अपीलाच्या नंतर सुध्दा दि. 26.6.2006 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दि.

15.4.2006 च्या अर्जाप्रमाणे नाही व यावरुनच अपीलकर्ता यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झालेली नाही हे त्यांचे म्हणणे खरे आहे असे दिसून येते.

4. दि. 24.6.1996 ला पोलीस स्टेशन कारंजा कारंजा येथे अपीलकर्ता यांनी लेखी तक्रार दाखल करुन त्या तक्रारीची चौकशी व्हावी अशी विनंती केली होती त्या चौकशीअंती घटनास्थळ पंचनामा झालेला असेल तर त्याची प्रत उपलब्ध करुन देणे किंवा घटनास्थळ पंचनामा झाला नसेल तर तसे अपीलकर्ता यांना कळविणे अपेक्षित होते परंतु तशा प्रकारचे उत्तर न देता त्यांना काय सुचना दिल्या होत्या अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील गुणवत्तेच्या बाबत हस्तक्षेप करता येत नाही किंवा चौकशी करता येत नाही. मागितलेली माहिती कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे एवढाच मर्यादित उद्येश हा माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चा आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.4.2006 च्या अर्जाप्रमाणे घटनास्थळ पंचनामा असल्यास छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व नसल्यास तशाप्रकारे अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक राहिल. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यास अपीलकर्ता यांनी संबंधित नस्तीचे निरीक्षण करुन त्यातून आवश्यक ती कागदपत्रे त्यांना उपलब्ध करुन घेता येतील त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.4.2006 च्या अर्जाप्रमाणे संबंधित F.I.R. case no. 33/96 dt. 24.6.96 मध्ये घटनास्थळ पंचनाम्याची प्रत असल्यास त्यांची छायांकीत प्रत हा

निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी उपलब्ध करुन देण्यात यावी. किंवा उपलब्ध नसल्यास तशा प्रकारे माहिती ही अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 21.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.706–709

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 229/2008.**

श्री महेश चैतराम पाली
366 टांगा स्टॅन्ड, धरमपेठ
नागपूर. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपपोलीस अधिक्षक वर्धा
2) जन माहिती अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी
वर्धा विभाग वर्धा ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे म्हणणे एकुन घेतलेले आहे.

2. अपीलकर्ता यांनी दि. 20.10.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी वर्धा यांचेकडे खालीलप्रमाणे 6 मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

1. मी अर्जदारानी आपल्या अधिनस्त असलेले पो.स्टे.वर्धा येथे दि. 6.10.07 रोजी गैरअर्जदार उपविभागीय दंडांधिकारी वर्धा कार्यकारी दंडाधिकारी वर्धा विशेष कार्यकारी दंडाधिकारी वर्धा यांनी खोटे जातीचे प्रमाणपत्र निर्गमित करुन दिल्या बाबत त्यांच्या विरुध्द कायदेशिर गुन्हा दाखल करणेबाबत तक्रार दिली होती त्या तक्रार अर्जावर आपल्या कार्यालयामार्फत काय लेखी कारवाई करण्यात आली मला माहिती म्हणून लेखी कळविण्यात यावे.

2. मी दिलेल्या अर्जानूसार कायदेशीररित्या गुन्हा होतो किंवा नाही या बद्यल माहिती म्हणुन लेखी खुलासा द्यावा.

3. पो.स्टे.वर्धा येथील अधिकारी यांनी मी दिलेल्या अर्जावार कारवाई केली नसल्यास त्यांनी गुन्हा केला किंवा नाही या बद्यल माहिती म्हणुन लेखी खुलासा द्यावा.

4. दखल पात्र गुन्हयाची रिपोर्ट दिल्यास त्या रिपोट वर किती दिवसात कारवाई केली जाते

5. अर्जदारानी दिलेली रिपोर्ट दखल पात्र स्वरुपाची आहे किंवा अ दखल पात्र स्वरुपाची आहे कारणासह कळवावे

6. फिर्यादीला आज पावेतो पो.स्टे.ला का बोलविण्यात आले नाही किंवा लेखी सुध्दा कळविण्यात आले नाही कारणासह खुलासा द्यावा.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 26.11.2007 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 11.12.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये निर्णय दिलेला नाही परंतु सदरचा गुन्हा होत नाही असे तोंडी सांगितले. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही किंवा समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना दि. 26.11.2007 रोजी जी माहिती

पोलीस अभियोक्ता यांच्या अहवालानुसार उपलब्ध करुन दिली त्या अहवालाची प्रत मात्र दिलेली नाही. व त्यामुळे उपलब्ध करुन दिलेली माहिती ही अपुर्ण आहे. व त्यावरुन कोणत्याही प्रकारच्या निर्णयाचा अर्थबोध होत नाही. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकुन घेतलेले होते परंतु त्यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली असे त्यांचे म्हणणे होते. तसेच अपीलकर्ता यांच्या मागणीप्रमाणे गुन्हा होत नसल्यामुळे त्याबाबतची पुढील कार्यवाही केलेली नाही. परंतु उपलब्ध करुन दिलेल्या माहितीतच पोलीस अभियोक्ता यांचे अभिप्राय घेतलेले असल्यामुळे त्या अभिप्रायाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिल्यास त्यावरुन त्यांना घेतलेल्या निर्णयाच्या संदर्भामध्ये कार्यकारण समजून येईल व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पोलीस अभियोक्ता यांनी दिलेल्या अभिप्रायाची प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य माहितीच्या अधिकारात दिली असे साक्षांकीत करुन उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.709–711

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 231/2008.**

श्री नवनाथ काशीराम आकरे
मु. सिरसाळा पो. कन्हाळगाव
ता. पवनी जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री डी. एम. वैरागडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती पवनी
ता. पवनी जि. भंडारा
2) श्री आर. टी. गायधने
जन माहिती अधिकारी तथा
सचिव ग्राम पंचायत सिरसाळा
ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.1.2008 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालय पवनी यांचेकडे मौजा सिरसाळा येथील मारबद पांदन रस्त्याच्या कामाकरीता कोणत्या नंबरचे मस्टर व किती मस्टर गेले यांची सत्यमाहिती मिळण्याबाबत. दि. 16.11.2007 पासून सुरु असलेल्या कामाचा तपशिल.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे. अर्जाच्या अनुषंगाने दि. 29.1.2008 रोजी गट कार्यक्रम अधिकारी तथा तहसिलदार पवनी यांनी एकुण 22 हजेरीपट सचिव ग्राम पंचायत सिरसाळा यांना सिरसाळा ते जुनी मार्बत पांधन रस्ता या कामाकरीता देण्यात आलेले आहे असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दि 12.2.2008 रोजी सचिव ग्राम सेवक ग्राम पंचायत सिरसाळा यांनी अपीलकर्ता यांना एकुण 3 मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यानंतर दि 15.2.2008 रोजी सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामध्ये हजेरीपत्रक व अंदाजपत्रक यांना सत्यप्रतीकरीता येणार खर्च ग्राम रोजगार सेवक श्री पदेले कडे देवून झेरॉक्स प्रती घेवून जावे करीता आपणास कळविण्यात येत आहे असे कळविले. त्यानंतर दि 5.3.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती तात्काळ पुरविण्यात यावी असे माहिती अधिकारी तथा अधिक्षक पंचायत समिती भंडारा यांनी आदेश दिलेले दिसून येतात. त्यानंतर दि 15.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. दि 17.3.2008 रोजी उपजिल्हाधिकारी रो ह यो यांनी कोणत्याही प्रकारची चौकशी न करता माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिलेले दिसून येतात. मात्र अपीलकर्ता यांनी नंतर दारिद्रय रेषेखालील प्रमापणत्र जोडलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 24.4.2008 रोजी गट विकास अधिकारी यांनी आपल्या ग्रामपंचायत फंडातून सदर माहितीकरीता लागणारी रक्कम खर्च करुन संबंधितांना त्यांनी मागितलेली माहिती पुरवावी असे कळविलेले आहे. वास्तविक अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा खर्च रु. 560/– असल्याने ग्रा.पं. मासिक सभा दि. 18.3.2008 ठराव क्र. 5 अ अन्वये ग्रा.पं.ची परिस्थिती कमकुवत असल्याने ग्रा.

पं. मधून खर्च न करता प. स. कडुन निधीची मागणी ठरावाच्या प्रतीनीशी या कार्यालयात सादर केलेले आहे. त्या ग्रा.रा.ह.योजने अंतर्गत पंचायत समिती स्तरावर किरकाळ खर्चाकरीता अनुदान प्राप्त होत नसल्याने आपण मागणी केल्यानुसार निधी देता येत नाही. मात्र ग्रा.पं. फंडातून खर्च करावा असे आदेश दिलेले दिसून येतात. अपीलकर्ता यांनी नंतर दारिद्रय रेषेखालील प्रमापणत्र सादर केलेले आहे. दारिद्रय रेषेखालील व्यक्तीची मान्यता ही ग्राम सभेमध्ये दिलेली असल्यामुळे ते खरोखरच दारिद्रय रेषेखालील आहेत असे गृहीत धरावे लागते. व अधिनियमच्या तरतुदीप्रमाणे दारिद्रय रेषेखालील व्यक्तीच्या करीता माहिती ही विनामुल्य देण्याची तरतुद असल्यामुळे ग्रामपंचायतने सदरचा खर्च करणे आवश्यक आहे. व त्यामुळे ग्रा.पं. फंडातून खर्च करुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेल्या अर्जाप्रमाणे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.712–714

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 234/2008.**

श्रीमती विद्या द. नाईक
ळरीकृपा संकुल, प्लॉट नं. 63, शहा ले आउट
सिंडीकेट बॅंकेसमोर अमरावती रोड वाडी
नागपूर 23. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री अजय रामटेके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त – 1
महानगर पालिका नागपूर
2) श्री गणविर
जन माहिती अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी
महानगर पालिका नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.11.2007 रोजी माहिती अधिकारी म्हणून सहा. आयुक्त झोन क्र. 2 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

नागपूर म.न.पा.द्वारे हा रस्ता व नाली पूर्णपणे उपेक्षित आहे. म.न.पा. चा सफाई कामगार गेल्या अडीच ते तीन वर्षात मी येथे रहायला आल्यापासून इकडे कधीही फिरकलासुध्दा नाही. तसेच रस्ता व नालीची हालत पाहण्यासारखी आहे. रस्ता पूर्णपणे उखडल्यामुळे जागोजागी खडडे पडून अपघातप्रवण झालेला असून नाली उघडी असून पूर्णपणे खचलेली आहे व नालीतील घाण पाणी रस्त्यावरुन वाहत असते.

तसेच हया रस्त्यावर व परिसरात लोक उघडयावर शौचास बसतात त्यामुळे वातावणात दुर्गंधी पसरलेली असते. ऑक्ट्रॉय नाका चुकविण्याकरीता जड वाहनांची वाहतूकही बरेचदा याच रस्त्यावरुन करण्यात येते व याच रस्त्यावर जड वाहनेही उभी केल्या जातात.

तेव्हा मला खालील माहिती देण्यात यावी.

1. हरिकृपा संकुल समोरील सार्वजनिक रस्त्याची व नालीची साफसफााई व दुरुस्ती का करण्यात येत नाही?
2. हा रस्ता व परिसर हागणदारीमुक्त का करण्यात येत नाही?
3. वाडी नाका नं. 10 येथून कां हटविण्यात येत नाही? तसेच केव्हा हटविण्यात येणार आहे?

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 31.12.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन आरोग्य अधिकारी तथा माहिती अधिकारी यांनी तीनही मुद्यांची माहिती दि. 25.1.2008 रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 31.1.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलार्थीच्या अर्जानुसार माहिती अद्यावत करुन 8 दिवसात अपीलार्थीस मिळावी अशी व्यवस्था करावी

असे आदेश पारीत केलेले आहेत. परंतु त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलाच्या निर्णयाच्या अनुषंगाने तसेच अपीलकर्ता यांच्या दि.15.11.2007 व 31.12.2007 च्या नुसार पुन्हा विभागीय अधिकारी स्वच्छता यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान झालेले दिसून येत नाही. परंतु द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हया गैरहजर आहेत. व त्यांनी त्याबाबत कोणत्याही प्रकारचा खुलासा दाखल केलेला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान कोणत्या संदर्भात झालेले नाही याबाबतचा निर्णय करणे शक्य होणार नाही. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि.15.11.2007 व 31.12.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.715–717

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 233/2008.**

सौ. आशाताई विठ्ठलराव रागीट
रा. हैद्राबाद स्टेट बॅक जवळ, पंचशील वार्ड
राजुरा जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी चंद्रपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार चंद्रपूर ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.8.2007 रोजी जन माहिती अधिकारी तहसिल कार्यालयात खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

So I request you kindly to issue me follwing documents at early dates.

1. 7/12 Extracts of following Survey Numbers

| S. No. | Area |
|---|---|
| 85/1 | 0.98 Hector |
| 87/1 | 0.92 Hector |
| 118/2 ब | 0.04 Hector |
| 119/1ग | 0.57 Hector |
| 120/1 अ | 1.04 Hector |
| 123/1 | 0.46 Hector |

These entire Survey Numbers are/were in the name of Bhaurao Gosai Bele & others.

2. S.No.120/1 area 0.98 Hector of Mouza Devai Govindpur Railwani was in the name of Shri Bhaurao Gosai Bele & others. 7/12 Extracts of 92.93 is enclosed herewith for ready reference.

3. The above 7/12 Extracts of S.No.120/1 is missing and not traceable in Talathis record so I need following copies.

1. 7/12 Extracts of S.No.120/1 from 1993 to 2005.06

2. Mutation entry if made copy of said required

4. Copy of Mutatation entry No. 8391 dt. 24.4.2003

5. Mutatation entry No. 8391 taken Basic documents i.e. application alongwith other documents.

सदरची माहिती स्पिड पोष्टनी घेणार असे नमूद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती

उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 23.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये अर्जदाराने तहसिलदार चंद्रपूर यांचेकडे मागणी केलेला दस्ताऐवज उधडीने खाल्यामुळे नष्ट झालेले आहे. त्यामुळे सदर दस्तऐवज देता येणार नाही असे दि. 28.11.2007 चे पत्रान्वये अपीलार्थीस कळविले आहे. त्यामुळे अपीलार्थीला माहिती पुरविण्यात आलेली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे उचित वाटत नाही. त्यामुळे अपीलार्थीची अपील मान्य करता येत नाही. करीता अपीलार्थीचा अपील अर्ज नस्ती करण्यात येते असा दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या तर्फे ॲड. श्रीयुत व्ही.एन.रागीट यांनी युक्तीवाद केला. युक्तीवादामध्ये त्यांचे म्हणणे असे आहे की त्यांना आतापर्यंत कोणतीच माहिती मिळाली नाही. तलाठी यांचेकडे शोधण्याचा प्रयत्न केला परंतु तरीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये उधडीने खाल्यामुळे नष्ट झालेले आहे हे त्यांना मान्य नाही.

4. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की सदरची माहिती ही त्यांच्या सेतू कार्यालयात उपलब्ध होवू शकेल. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी सेतू कार्यालयात शोध घेतला परंतु त्यांना माहिती उपलब्ध झालेली नाही. त्याचप्रमाणे दि. 30.11.2007 रोजी तहसिलदार चंद्रपूर यांनी उपविभागीय अधिकारी चंद्रपूर यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये कळविलेल दिसून येते. तलाठी यांचेकडून माहिती मागविण्यात आली असून खालील स्थिती आढळुन आली. मौजा दे.गो. रैय्यतवारी येथील सर्व्हे नं. 85/1, 118/2ब, 119/1ग, 120/1अ, 120/1, 123/1, 87/1 या शेतीचे सातबारावर श्री दिलीप रामचंद्र टिपले यांचे नाव त्यांची आई सखुबाई रामचंद्र टिपले यांचे मृत्युनंतर रेकार्डला वारसान म्हणुन दर्ज करण्यात आलेले आहे. हे

नाव फेरफार क्र. 8691 दि. 24.4.2003 रोजी सातबाराला दर्ज करण्यात आलेले आहे. अर्जदाराने या वारसानाचे प्रकरणात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत मागणी केलेली आहे. मागणी केलेले प्रतिज्ञापत्रासह सादर केलेले कागदात्र उधळीने खाल्यामुळे नष्ट झालेले आहेत. त्यामुळे देता येणार नाही असे तलाठी अहवालामध्ये नमूद केलेले आहे. खालीलप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना दि. 28.11.07 ला कळविलेली आहे. यावरुन संबंधित तलाठी हे दोषी आढळुन येतात व त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक राहिल तसेच माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 4.8.2007 च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी आयोगापुढे उपस्थित असलेल्या नायब तहसिलदार यांनी सांगितल्याप्रमाणे सेतू मधून सदरची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) संबंधित तत्कालीन तलाठी यांनी तहसिलदार यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असून सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यावेळेस जे माहिती अधिकारी असतील त्यांचे विरुध्द सुध्दा शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

4) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही **<u>तहसिलदार चंद्रपूर</u>** यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 3 महिन्याचे आंत करावयाची आहे.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 23.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.718–722

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 244/2008 व अपील कमांक 245/2008.**

श्री देवाभा> भगवान उराडे
विस्तार अधिकारी (पंचायत)
पंचायत समिती सिंदेवाी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद चंद्रपूर
2) श्री सी. व्ही. मुधोळकर
जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 244/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 1.12.2007 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (सा.प्र.वि.) यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. पंचायत समिती ब्रम्हपूरी येथील गट विकास अधिकारीचा कार्यप्रभार श्री खोब्रागडे कृषी अधिकारी यांना देण्यात आला त्या संबंधात टिपणीची सत्यप्रति व आदेशाची सत्यप्रति तसेच श्री वाघाडे ग.वि.अ. यांनी भरुन दिलेली सि.टि.सी.फार्मची सत्यप्रति.

2. पंचायत समिती राजूरा येथील गट विकास अधिकारीचा कार्यप्रभार श्री पवार विस्तार अधिकारी (उ) यांना देण्यात आला त्या संबंधात टिपणीची सत्यप्रति व आदेशाची सत्यप्रति तसेच तत्कालीन ग.वि.अ. यांनी भरुन दिलेली सि.टि.सी.फार्मची सत्यप्रति.

3. पंचायत समिती सिंदेवाही येथील गट विकास अधिकारीचा कार्यप्रभार कुणाकडे देण्यात आला त्या संबंधात टिपणीची सत्यप्रति व आदेशाची सत्यप्रति तसेच तत्कालीन ग.वि.अ. श्री सहारे यांनी भरुन दिलेली सि.टि.सी.फार्मची सत्यप्रति.

4. गट विकास अधिकारी यांचा प्रभारी हस्तांतरण करण्यासंबंधात शासनाकडुन झालेले आतापर्यंतचे निर्णयाच्या प्रति.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 20.12.2007 रोजी माहितीच्या अतिरिक्त खर्चाकरीता रु. 32/— चा भरणा करावा असे कळविण्यात आलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी दि. 14.1.2008 रोजी अतिरिक्त खर्चाचा भरणा केलेला दिसून येतो. व त्यामुळे दि. 18.1.2008 रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.12.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दि. 21.1.2008 च्या पत्राप्रमाणे दि. 29.1.2008 रोजी उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले होते. परंतु अपीलकर्ता हजर

झाले नाहीत म्हणून पुन्हा दि. 8.2.2008 रोजी उपस्थित राहावे असे कळविण्यात आलेले होते. व त्यानंतर दि. 14.2.2008 रोजी सुध्दा उपस्थित न राहिल्यामुळे अपील हे खारीज करण्यात आलेले होते असे दिसून येते. व त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. आजही अपीलकर्ता गैरहजर आहेत. अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील मेमोमध्ये मुद्दा क्र. 4 ची माहिती उपलब्ध झाली नाही असे अपील करण्याचे कारण दिलेले आहे परंतु जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की मुद्दा क्र. 4 मध्ये मागितलेल्या माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे शासन निर्णय नसतात व ज्याप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रमुखाला योग्य वाटेल त्याप्रमाणे प्रभारी पदभार दिला जातो व त्यामुळे कोणत्याही प्रकारचे तसे नियम नाहीत असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले होते. तसेच अपीलकर्ता हे स्वतः विस्तार अधिकारी आहेत व अशा प्रकारे अनेक अर्जाच्या माध्यमातून अनेक अर्जाची माहिती ही त्यांना संपूर्ण माहिती असूनसुध्दा मागत असतात. पुर्वी त्यांचे निलंबन पण झालेले होते. परंतु तरीही माहितीच्या अधिकारात अशा प्रकारचे अर्ज ते करीत असतात. यावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता हे कोणत्याही सार्वजनिक व्यापक हिताच्या दृष्टीने माहिती मागत नसुन एकुण अधिका–यांच्या कामकाजात अडचण निर्माण होईल अशा प्रकारची माहिती मागत असतात असे दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

4. अपील क्र. 245/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 25.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी (सा.प्र.वि.) आयुक्त कार्यालय कोकण विभाग मुंबई 32 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

शासनाकडुन आपले आयुक्त कार्यालयात जिल्हा परीषद कर्मचारी वर्ग 3 व 4 तसेच

राजपत्रित अधिकारी वर्ग 1 व 2 च्या बाबती सेवा विषयक आस्थापना विषयक योजना विषयक सन 2000 ते 2007 या वर्षापर्यंत प्राप्त झालेले शासन निर्णय, पत्रे, परीपत्रके ची माहिती पुढिल तक्त्यात हवी आहे तसेच प्राप्त परीपत्रके, निर्णय, पत्रे ची छायांकित प्रतीची आवश्यकता आहे. कृप्या विहीत मुदतीत पुरविण्याची कृपा करावी.

| अ. क्र. | कर्मचारी / अधिका–यांच्या सेवा विषयक (ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, गट विकास अधिकारी, उप मुकाअ) च्या बाबतीत शाासन पत्राचा / निर्णयाचा विषय | मंत्रालयातील विभागाचा क्रमांक दिनांक | पृष्ठ संख्या | इंग्रजी / मराठी प्रत |
|---|---|---|---|---|
| | | | | |

सदरच्या माहितीचा कालावधी सन 2002–2007 आहे व माहिती सर्वसाधारण टपालाने घेणार असे नमूद केलेले आहे. अपीलकर्ता यांनी माहिती जरी कोकण विभाग मुंबई यांचेकडे मागितलेली असली तरी सदरचा अर्ज हा दि. 12.11.2007 रोजी आयुक्त कोकण विभाग या कार्यालयात प्राप्त झाला. त्यानंतर अपीलकर्ता हे स्वतः विस्तार अधिकारी पंचायत समिती सिंदेवाही असल्यामुळे सदरचा अर्ज हा 10.1.2008 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे प्राप्त झाला. व त्यानंतर दि. 29.1.08 रोजी अपीलकर्ता यांना आपण मागितलेली माहिती 5 कॉलम मध्ये असल्यामुळे व तसे या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही असे कळविण्यात आलेले दिसून येते. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 20.12.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता हे 29.1.2008, 8.2.2008 ला गैरहजर असल्याने सदरचे अपील दि. 14.2.2008 रोजी खारीज

करण्यात आलेले आहे. त्या निर्णया विरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

5. अपीलकर्ता हजर नसले तरी त्यांनी दि. 16.3.2009 रोजी खुलासा दाखल केलेला आहे. खुलाशामध्ये कोणत्याही प्रकारचा नवीन मुद्या त्यांनी दिलेला नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती स्वतः प्रपत्र तयार करुन त्या प्रपत्राात मोघम स्वरुपाची
माहिती मागितल्याने तसे प्रपत्राात माहिती या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्याने ती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मुळातच अतिव्यापक आहे व त्यात कोणत्याही प्रकारचे निश्चित असे माहितीचे वर्णन नसल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य आहे असे दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना तक्रार असल्यास त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे उपस्थि होवून त्यांची बाजू मांडणे आवश्यक असते. अन्यथा जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील क्र. 244/2008 व अपील क्र. 245/2008 हे खारीज करण्यात येतात.

2) अपीलकर्ता हा विस्तार अधिकारी असल्याने सदरच्या निर्णयाची एक प्रत **मुख्य कार्यपालन अधिकारी जिल्हा परिषद चंद्रपूर** यांच्या माहितीकरीता स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.723–728

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 2472/2008.**

श्री वसंत गोविंदराव बोंदरे
टाईप–8/18/09
मु. पो. विद्युत विहार कोराडी कॉलनी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त
झोन क. 1, नागपूर शहर
2) श्री एम. एम. वाढवे
जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त
सिताबर्डी विभाग नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.6.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 25.10.2007 रोजी सहा. पोलीस आयुक्त तथा माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. एफ आय आर (विरुध्द पक्षानी सादर केलेला एप्रिल 1979 मध्ये)

2. पंचनामा 3. जबाब (साक्षदारांचे)

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 12.11.2007 रोजी अपीलकर्ता यांना सहा. पोलीस आयुक्त तथा माहिती अधिकारी पोलीस स्टेशन सिताबर्डी येथून दि. 27.10.2007 रोजी माहिती प्राप्त झाली असता त्यात नमूद प्रमाणे माहे एप्रिल 1979 ला आपले विरुध्द कोणत्याही दाखल गुन्हयाची नोंद मिळून आली. असे प्राप्त झाले आहे असे लेखी दिलेले आहे. परंतु त्याबाबत कागदपत्र उपलब्ध करुन दिले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 5.12.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 15.12.2007 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी सन 1979 माहे एप्रिल ला पो.स्टे.सिताबर्डी येथे अर्जदार यांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाची फिर्याद, पंचनामा, साक्षीदाराचे बयानाचे छायांकित प्रती मिळण्याबाबत अर्ज दिलेला होता. त्याबाबत पो.स्टे. सिताबर्डी येथे अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा/तक्रार दाखल असल्याची नोंद मिळुन आली नाही म्हणून अपील निकाली काढण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारी तथा अधिक्षक मध्यवर्ती कारागृह नागपूर यांचेकडे सुध्दा दि. 13.12.2007 रोजी माहिती मागितलेली दिसून येते. त्यावर माहिती अधिकारी तथा अधिक्षक मध्यवर्ती कारागृह नागपूर यांनी दि. 16.2.2008 रोजी आपणास पोलीस स्टेशन सिताबर्डी येथील नोंदणीकृत अपराध आणि सन्मा. जिल्हा सत्र न्यायाल कोर्ट क्र. 2 नागपूर यांचेकडील सेशन केस अंतर्गत या कारागृहात पाच ते सात दिवस बंदीस्त ठेवल्याबाबतची आवश्यक असणारी माहिती शोधण्याचे काम सुरु आहे. याबाबत आपणास या कार्यालयास आलेल्या दोन वेळच्या भेटीमध्ये कळविण्यात आले आहे. तसेच आपणास

सर्व अभिलेख कक्ष सुध्दा दाखविण्यात आलेले आहे. तरी अभिलेख उपलब्ध होताच सदर माहिती आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. यावरुन अपीलकर्ता यांचेविरुध्द गुन्हा दाखल झालेला होता असे दिसून येत नाही व त्यामुळेच माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा पण आयोगाकडे केलेला आहे.

अपीलकर्ता श्री वसंत गोविंदराव बोंदरे टाईप–8/18/09 मु. पो. विद्युत विहार कोराडी कॉलनी ता. कामठी जि. नागपूर यांनी राज्य जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त सिताबर्डी विभाग नागपूर शहर यांचेकडे दि. 25.10.2007 रोजी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये दिलेल्या अर्जाप्रमाणे त्यांनी पोलीस स्टेशन सिताबर्डी नागपूर शहर अंतर्गत दाखल झालेले सन एप्रिल 1979 ला रात्रीचे वेळी गोकुलपेठ मार्केटचे दिवशी वेस्ट हायकोर्ट रोड धरमपेठ नागपूर देना बॅंक समोर श्री लक्ष्मण कृष्णराव जोशी व श्री रामचंद्र केशवराव साल्फेकर यांनी काही कारण नसतांना सदर प्रकरण सुनियोजीत षडयंत्र हेतुपुरस्सर निर्माण केले होते. अपीलकर्ता यांची सायकल चोरीला गेली होती त्यांनीच एक चमत्कारीक आवाज निर्माण केले. उपरोक्त दोन व्यक्तींनी लाठीकाठीने मला मारहाण केली होती. पोलीस व्हॅन बोलावून मला रात्रभर सिताबर्डी पोलीस कस्टडीत बंद ठेवले होते. दुसरे दिवशी जिल्हा सत्र न्यायालय नागपूर कोर्ट नं. 2 मध्ये नेल्यानंतर अजनी सेंट्रल जेल मध्ये 5 ते 7 दिवस ठेवण्यात आले होते. उपरोक्त व संबंधित व्यक्तीनी खोटी तक्रार करुन पोलीसांची दिशाभूल केली होती. याबाबतची अर्जदाराविरुध्द दाखल असलेल्या एफ आय आर, पंचनामा, साक्षीदाराचे जबाब चे छायांकित प्रतीची मागणी केलेली होती. माहिती अधिकारी यांनी याबाबत पो.स्टे.सिताबर्डी यांना पत्र देवून माहिती मागितली असता त्यांनी दि.27.10.07 रोजी माहिती दिलेली असून त्यांनी अपीलकर्ता यांचे विरुध्द पो.स्टे.चे अभिलेखावर

कोणत्याही प्रकारचे गुन्हे/तक्रार नाही अशी माहिती सादर केलेली असून ती माहिती माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यास दि. 12.11.07 रोजी दिलेली आहे. परंतु माहिती अधिकारी यांनी सिताबर्डी विभाग नागपूर यांनी पुरविलेल्या माहितीवर अर्जदाराचे समाधान न झाल्याने दि. 5.12.07 रोजी प्रथम अपील दाखल केले. उपरोक्त अपीलाचे संदर्भाने माहिती अधिकारी तथा सपोअ सिताबर्डी विभाग यांना विचारणा केली असता त्यांनी सन एप्रिल 1979 ला पो.स्टे. सिताबर्डी येथे अर्जदाराविरुध्द कोणताही गुन्हा दाखल असल्याची नोंद मिळुन आली नाही. अशी माहिती प्राप्त झाली याबाबत अर्जदार यांनी अर्जात नमुद केलेल्या मोबाईल क्र. 9923131227 वर माहिती देण्यात आली असता अर्जदार यांनी कार्यालयात येवून पत्र घेवून जातो असे सांगीतले परंतु ते कार्यालयात हजर आले नाही. म्हणुन कार्यालयीन जावक क्र. 4965/2007 दि. 12.11.07 रोजी अर्जदार यांना पत्र तामील होण्यास पो.स्टे. सिताबर्डी येथे पाठविण्यात आले असे अहवालात नमुद केले असल्याने अपीलकर्ता यास त्याबाबत दि. 15.12.2007 रोजी अपीलकर्ता विरुध्द सन 1979 माहे एप्रिल ला पो.स्टे. सिताबर्डी येथे अपीलकर्ता यांचे विरुध्द दाखल असलेल्या गुन्हयाची एफ आय आर, पंचनामा, साक्षिदाराचे जबाबाचे छायांकीत प्रती मिळण्याबाबत अर्ज दिला होता. त्याबाबत पो.स्टे. सिताबर्डी येथे अपीलकर्ता विरुध्द कोणताही गुन्हा/तक्रार दाखल असल्याची नोंद मिळून आली नाही. असे अपीलकर्ता यास लेखी कळवून अपीलकर्ता यांची अपील निकाली काढण्यात आली.

व त्यावरुन सुध्दा अपीलकर्ता यांचे विरुध्द तक्रार झाली नाही किंवा त्यांचे विरुध्द कोणताही गुन्हा दाखल झालेला नाही याची नोंद मिळून आली नाही त्यामुळे एफ आय आर, पंचनामा, साक्षिदाराचे जबाबाचे छायांकीत प्रती उपलब्ध करुन देता आली नाही असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. परंतु अपीलकर्ता यांचे बाबत घडलेल्या वस्तुस्थिती बाबत त्यांनी सिताबर्डी पो.स्टे. येथील संबंधीत अभिलेखाचे निरीक्षण करुन त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या दि. 25.10.2007 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी संबंधित अभिलेखे उपलब्ध करुन देवून अपीलकर्ता यांनी निरीक्षण करुन त्यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध असल्यास छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्याकरीता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांना कार्यालयीन वेळेतील तारीख व वेळ कळवून त्यावेळेस उपस्थित होवून जन माहिती अधिकारी यांनी अभिलेखे उपलब्ध करुन द्यावे व माहिती उपलब्ध झाल्यास ती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 24.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.729–733

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 249/2008.**

श्री इस्पत जानबाजी शिवनकर
रा. धर्मापूरी पो. कुंभली
ता. साकाली जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचायत समिती साकोली
ता. साकाली जि. भंडारा

2) श्री आर. आर. डोंगरवार
जन माहिती अधिकारी तथा
सचिव शिक्षण समिती प्राथमिक शाळा सोनपूरी
ता. साकाली जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी

हजर आहेत. अपीलकर्ता यांनी माहिती प्राप्त झाली त्यामुळे अपील मागे घेत असल्याचे तोंडी निवेदन प्रत्यक्ष केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

नागपूर
**दि. 24.3.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.734–735

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 253/2008.**

श्रीमती सिंधुताई उत्तमराव पाटील
651, नेहरु नगर महानगर पालिका नागपूर
पाणी कर कार्यालय झोन 5 जवळ,
सक्करदरा नागपूर 9. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक/जिल्हा शल्य चिमित्सक
सर्वोपचार रुग्णालय नागपूर
(मेयो जनरल हॉस्पीटल) सी.ए.रोड नागपूर
2) श्री एस. एम. खान
जन माहिती अधिकारी तथा
निवासी वैद्यकीय अधिकारी/सा./उपअधिक्षक
जिल्हा शल्य चिमित्सक
सर्वोपचार रुग्णालय नागपूर
(मेयो जनरल हॉस्पीटल) सी.ए.रोड नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहेत.

परंतु त्यांचे तर्फे त्यांचे पती हजर आहेत. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.1.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा निवासी वैद्यकीय अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

रुग्ण शेखलाल शेख हयात कुरेशी वय 50 वर्षे रा. 311/1 भीम लांजेवार चाळ गडडीगोदाम सदर नागपूरचा निदान झालेल्या रोगावर करण्यात आलेल्या औषधोपचार माहितीचा कागदपत्रदस्त चा नक्कल माहिती प्रमाणित करुन मिळणेबाबत.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 12.2.2008 रोजी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 25.2.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या दि. 19.3.2008 रोजी निर्णय दिलेला असून शासन निर्णयाच्या प्रतीकरीता शुल्क रु. 12 चा भरणा करण्यात यावा तसेच एकुण 3 मुद्येनिहाय उत्तर दिलेले दिसून येते व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. त्यानंतर मात्र दि. 14.7.2008 रोजी अपीलकर्ता यांना उपलब्ध असलेल्या नियमाच्या छायांकीत प्रती सोबत जोडलेल्या पत्रासोबत पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की प्रामुख्याने अपीलकर्ता यांनी दाखल झालेल्या रुग्णाच्या औषधोपचार रेकॉर्ड व मृत्यु संबंधी माहिती विचारलेली आहे व त्यामुळेच अपीलकर्ता यांना जे उत्तर दिलेले आहे ते योग्य आहे. परंतु अपीलकर्ता यांनी आयोगापुढे तोंडी युक्तीवाद करतांना त्यांना माहिती का हवी होती याचे विवरण केल्यानंतर अपीलकर्ता यांना रुग्ण शेखलाल शेख यास रुग्णलयात केव्हा दाखल केले केव्हा मृत्यु पावला याबद्यलची माहिती तसेच रुग्णलयात दाखल असतांना रुग्णलया बाहेर जाण्याची परवानगी दिली हाती काय अशी माहिती

त्यांना उपलब्ध करुन दिल्यास त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध होईल असे त्यांनी मान्य केले व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना रुग्ण शेखलाल शेख यास रुग्णलयात कोणत्या तारखेस दाखल केले व मृत्यु पावले असल्यास कोणत्या तारखेस मृत्यु पावले व रुग्णलयात दाखल असतांना रुग्णलया बाहेर जाण्याची परवानगी दिली हाती काय अशी माहिती छायांकीत प्रतीच्या स्वरुपात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.736–738

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 257/2008.**

श्री संजय विठ्ठलरावजी सत्येकार
जे.एन.रोड आंबेडकर चौक कन्हान
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मीक आदिवासी विकास
गिरीपेठ नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
साईबाबा अनुदानित आदीवासी आश्रमशाळा टेकाडी
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 4.1.2008 रोजी माहिती अधिकारी साईबाबा अनुदानित आदीवासी आश्रमशाळा टेकाडी यांचेकडे आश्रमशाळेतील संपुर्ण विद्यार्थ्यांची वर्गवारीनुसार संख्या,नावे व त्यांची निवासी पत्ते दयावीत. चालू सत्रात (2007–08) दरम्यान आजारी विद्यार्थ्यांची यादी व त्यांना झालेला प्रकार.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 7.2.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 19.3.2008 रोजी देण्यात आलेला असून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक साईबाबा अनुदानित आदीवासी आश्रमशाळा टेकाडी यांना दि. 18.2.2008 च्या पत्रानुसार माहिती उपलब्ध करुन देण्या बाबत कळविले असता त्यांनी अपीलकर्ता हे माहितीच्या अधिकारात माहिती मागवून शाळेबाबत खोटया बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द करुन ब्लॅकमेलींग करीत असल्याचे माझे निदर्शनास आणून दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी माहिती न पुरविण्याबाबतची नमुद केलेली कारणे संयुक्तिक वाटते. यास्तव आपण माहितीचा उपयोग जनहितासाठी करीत नसल्याने आपण मागणी केलेली माहिती आपणास पुरविता येत नाही यास्तव आपला अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भामध्ये जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की माहिती त्यांचेकडे तयार आहे परंतु अपीलकर्ता हे व्यक्तिशः माहिती घेणार असे नमूद केलेले असल्यामुळे व माहिती घेण्यास आलेले नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ते माहिती घेण्यास गेले होते परंतु त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. मात्र याबाबत दोघांकडे कोणताही लेखी

पुरावा नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे हे मान्य करावे लागते. मात्र ''मुख्याध्यापक तथा जन माहिती अधिकारी यांनी दि. 20.2.2008 रोजी प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडे माहितीच्या अधिकारामध्ये माहिती मागणे व वृत्तपत्रात खोटया बातम्या प्रकाशित केल्याबाबत व सुटीच्या दिवशी विदयार्थ्यांना जवळ बोलावून मुला मुलींना चॉकलेट वगैरे देवून खोटी माहिती देण्यास बाध्या करणे माहितीच्या अधिकाराच्या नावाने पत्र देवून माहिती मागणे तसेच मोबाईलद्वारा शाळेमधील विदयार्थ्यांचे फोटो काढणे स्वयंपाक घरामध्ये जावून फोटो काढणे व त्याचा पूर्ण दुरुपयोग करुन वृत्तपत्रामध्ये खोटया बातम्या प्रसिध्द करणे तसेच विदयार्थी आजारी असेल तर त्या विदयार्थ्यांना आमचे कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्रात नेतात तेव्हा त्यांच्या पाठोपाठ दवाख्यान्यात हजर होणे व विदयार्थी कुपोषित आहे हे वृत्तपत्रात खोटी बातमी देणे हे सर्व मी करणार नाही त्यासाठी पैशाची मागणी करणे म्हणजे हा सर्व ब्लॅकमेलिंगचा प्रकार आहे. श्री संजय सत्येकार हा जय महाराष्ट्र संघटनेचा आधार घेवून शाळेमध्ये येतो. आम्ही अशा ब्लॅकमेल करणा–या व्यक्तीला कशी काय माहितीच्या अधिकारामध्ये माहिती पुरवावी याबाबत आपण आम्हाला सुचना द्याल अशी आग्रहाची विनंती. सोबत योग्य पुराव्याचे कागदपत्र जोडले आहेत'' असे पत्र दिलेले दिसून येते. त्यावर प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प नागपूर यांनी मा. अपर आयुक्त आदिवासी विकास यांना दि. 1.3.2008 रोजी मुख्याध्यापकाच्या पत्राच्या संदर्भामध्ये संघटनेच्या नावाखाली एखादी व्यक्ती माहिती मागवून दुरुपयोग करण्यासाठी वारंवार माहिती अधिकारा अंतर्गत माहिती मागवित असल्यास त्यांना माहिती पुरविण्याबाबत योग्य ते मार्गदर्शनपर निर्देश देण्यात यावे व सदरच्या पत्राची प्रतिलिपी राज्य माहिती आयोग व आयुक्त आदिवासी विकास नाशिक यांना दिलेली दिसून येते. व त्यावरुन प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. आयोगाकडे सुध्दा खुलासा करतांना खालीलप्रमाणे खुलासा केलेला दिसून येतो. तो खालीलप्रमाणे.

1. अर्जदाराने जोडपत्र क्र ओ या पत्रानुसार माहिती अधिकार कायदा पत्रानुसार मुख्याध्यापकाकडे माहितीच्या तपशिल प्रमाणे माहिती मागितली परंतु प्रत्यक्ष अर्जामध्ये व्यक्तीशः असे नमुद केले आहे तरीपण विचारलेली माहिती आम्ही संपूर्ण तयार करुन ठेवलेली होती परंतु त्यांचे प्रत्यक्ष भेट झाली असता त्यांनी ती माहिती मागीतली नाही किंवा माहिती घेण्यास आले नाही करीता विहित मुदतेच्या आतमध्ये माहिती देता आली नाही.

2. जोडपत्र अ मध्ये अर्जदाराने माहिती व्यक्तीशः मागीतलेली होती त्यामध्ये विचारलेली माहिती आम्ही संपूर्ण तयार केलेली होती करीता विहित मुदतेच्या आतमध्ये माहिती देता आली नाही.

3. जोडपत्र अ माहिती अधिकार कायद्याप्रमाणे माननीय माहिती आयोगासमोर दिनांक 16.3.2009 ला प्रत्यक्ष आता विचारलेल्या माहिती अर्जामध्ये तीच माहिती मागील अर्जामध्ये होती व ती जशीच्या तशी पुन्हा मागण्यात आलेली होती. परंतू विद्यार्थ्यांची नावे व पत्ते गोपनियता म्हणून आम्ही ती देउ शकत नाही.

4. जर शाळेमध्ये आजारी विद्यार्थी असले तर त्यांना प्राथमिक आरोग्य केंद्र कन्हान यांना कळवून किंवा लेख पत्र देवून वैद्यकीय पथकाला शाळेत बोलावून विद्यार्थ्याच्या आरोग्याची तपासणी करण्यात येते किंवा एक किंवा दोन विद्यार्थी आजरी असल्यास शाळेच्या कर्मचा–यांना त्यांना आरोग्य केंद्रात नेवून त्यांची तपासणी केलया जाते त्या बाबतचा डॉक्टरांचा तपासणीचा अहवाल सोबत जोडत आहे.

5. जोड क्रमांक अ 1 – शाळेच्या गोपनियतेच्या काही कारणास्तव आम्ही शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनीचे नाव व पत्ते आम्ही अर्जदारास देवून शकत नाही.

जोड क्रमांक अ 2 – आजारी विद्यार्थी तपासणी प्राथमिक आरोग्य केंद्र कन्हान तसेच फिरते वैद्यकीय पथक रामटेक यांच्याकडून विद्यार्थ्यांची तपासणी होत असते. त्यासाठी शाळेने तपासणीचे वैद्यकीय रजिस्टर ठेवलेले आहे व त्यामध्ये तपासलेल्या आजारी

विद्यार्थ्यांचा आजार कोणत्या प्रकारचा आहे व त्यावर देण्यात आलेली औषधी यांची नोंद घेण्यात येते. त्यांची प्रत्यक्ष एक प्रत आरोग्य केंद्रात उपलब्ध असते. त्यामुळे अर्जदारास आजारी विद्यार्थ्याची माहिती देता येते किंवा नाही याबाबत आम्हास कल्पना नव्हती. तरीपण संपूर्ण माहिती आम्ही तयार करुन ठेवलेली होती परंतू अर्जदाराने व्यक्तीशः माहिती मागीतल्यामुळे अर्जदार माहिती घेण्याकरीता आलेले नव्हते.

6. अर्जदाराने दि. 20.11.2007 रोजी देशोन्नती वृत्तपत्रात मूले ॲनेमिया व कूपोषण या आजाराने आजारी आहेत अशी खोटी माहिती वृत्तपत्रात दिली त्यासाठी 8.11.2007 ला वद्यकीय अधिकारी व शाळेच्या वतीने देशोन्नती वृत्तपत्रात खुलासा करण्यात आला व प्रत्यक्ष प्राथमिक आरोग्य केंद्र कन्हान येथील डॉक्टरांच्या चमूने भेट देवून विद्यार्थ्याची तपासणी केली परंतु तेथे असे काहीही आढळले नाही त्याकरीता शाळेच्या मुख्याध्यापकाने बदनामी बाबत ॲड. नितीन तेलगोटे यांच्या कडून अर्जदारास लेखी नोटीस दिली होती परंतू अर्जदाराने ती नोटीस स्विकारलेली नाही. यावरुन अर्जदाराबाबत असे सिध्द होते की खोटया माहिती द्वारे शाळेची बदनामी करायची व मानसिक त्रास द्यायचा व शाळेला ब्लॅकमेल करुन शाळा बंद पाडण्याचा हेतू दिसतो.

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनीचे पत्ते देण्याची आवश्यकता नाही तसेच शाळेतील आजारी विद्यार्थीची तपासणी प्राथमिक आरोग्य केंद्रकडून करण्यात आलेली असेल व त्याबाबतची माहिती उपलब्ध आहे असे खुलाशात म्हटलेले असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दि. 4.1.2008 च्या अर्जाप्रमाणे साईबाबा अनुदानित आदीवासी आश्रमशाळेतील संपुर्ण विद्यार्थ्यांची वर्गवारीनुसार संख्या,नावे (पत्रे देवू नयेत) व प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे ज्या विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आलेली असेल त्याबद्यलची माहिती ही अपीलकर्ता यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी. माहिती व्यक्तीशः मागितलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.739–744

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 262/2008.**

श्री डॉ. मिलिंद पंढरीनाथ जीवने
नवा नकाशा, स्वस्तीक शाळेसमोर
नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अति. उपायुक्त (1)
नागपूर महानगर पालिका नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
1. सहा. संचालक
नगर रचना विभाग
नागपूर महानगर पालिका नागपूर
2. वार्ड अधिकारी
महानगर पालिका आसीनगर
झोन क. 9 कामठी रोड नागपूर 17 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 12.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 11.2.2008 रोजी माहिती अधिकारी आसीनगर झोन क्र. 9 यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती एकुण 22 मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते.

मॉडेल टा>न कामठी रोड मौजा इंदोरा प्लॉट नं. 638 बी मनपा घर क्र. 417/638 सिस नं. 532 ख.नं. 97/1, 101/2 येथील माझ्या प्लॉटवरील बांधकाम बगैर नोटीस देता दिनांक 4.2.08 ला दुपारी 3.15 च्या दरम्यान आपल्या विभागातर्फे अवैधरित्या पाडण्यात आल्यासंदर्भात फेब्रुवारी 2008.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 17.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. अपीलाचा निर्णय हा दि. 27.3.2008 रोजी देण्यात आलेला असून विभागाने अपीलार्थीस माहिती 8 दिवसात देण्याचे निर्देशासह अपील निकाली काढण्यात आलेले आहे. मात्र त्यानंतर अपीलकर्ता यांना दि. 3.4.2008 रोजी माहिती उपलब्ध झालेली असून उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 11.2.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने वार्ड अधिकारी (आसीनगर झोन) तथा सहा. माहिती अधिकारी यांनी माहिती अधिका—याने दिनांक 27.2.2008 रोजी सहा. संचालक (नगर रचना) यांना पाठविलेली आहे. परंतु माहिती अधिकारी यांनी ती माहिती अपीलार्थीस दिलेली नाही ही चुकीची बाब आहे व द्वितीय अपीलात दंडनीय आहे याची माहिती अधिकारी यांनी दखल घ्यावी असे विवेचन केलेले आहे. यावरुन अपीलकर्ता यांना अधिनियमाच्या कलम 7 (1) प्रमाणे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. व त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शास्ती लादणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांनी पुन्हा असे सांगितले की त्यांना उपलब्ध

झालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे. उपलब्ध झालेल्या माहितीमुळे त्यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की मुद्या व 16 व 22 मध्ये उपलब्ध करुन दिलेली माहिती ही चुकीची आहे त्याकरीता त्यांनी आयोगास जिल्हा न्यायालयानी आदेश दिलेला नसतांना सुध्दा न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे परिवर्तन विभागातर्फे कार्यवाही करण्यात आलेली आहे असे सांगितले. याबाबत तशा प्रकारची कार्यवाही करण्यात आलेली असेल ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांचा युक्तीवाद हा गुणवत्तेच्या संदर्भात आहे. त्याकरीता त्यांना न्यायालयात किंवा वरीष्ठ सक्षम अधिका—याकडे तक्रार करता येईल तसेच मुद्या क 22 च्या संदर्भामध्ये आसीनगर झोन मध्ये रेकॉर्ड उपलब्ध नाही. नगर रचना विभाग मनपा कडून माहिती घेण्यात यावी असे उत्तर दिलेले आहे. व सदरची माहिती ही सहा. संचालक नगर रचना यांनी दिलेली असल्यामुळे त्यांचे कार्यालयात उपलब्ध आहे असे उत्तर दिलेले आहे व त्यामुळे सदरचे उत्तर हे दिशाभूल करणारे आहे असे त्यांचे म्हणणे आहे. त्याबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी हे समाधानकारक खुलासा करु शकले नाही व त्याबाबत तत्कालीन माहिती अधिकारी हे दोषी आढळुन येतात. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्ता यांना दि. 24.3.2009 रोजी नकाशाच्या स्वरुपात का माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याबाबतही अपीलकर्ता यांचे आक्षप आहेत व सदरचे आक्षेप हे अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक नगर रचना यांचे सोबत चर्चा करुन समाधानकारक माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

4

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 3.4.2008 रोजी जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये त्यांचेकडे आक्षेप असल्यास त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक यांचे सोबत चर्चा करुन व सहकार्य करुन योग्य ती माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

2) अपीलकर्तायांच्या दि. 11.2.2008 च्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक हे दोषी आढळुन येत असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.745–748

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 259/2008, 260/2008 व 261/2008.**

**अपील कमांक 259/2008**

श्री भा>राव झिंगूजी गोहत्रे
59, बंडू सोनी ले आउट परसोडी
नागपूर 22 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त आदिवासी विकास विभाग
आदिवासी आयुक्तालय नाशिक
2) जन माहिती अधिकारी तथा
अपर आयुक्त
आदिवासी विकास गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

**अपील कमांक 260/2008**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आयुक्त आदिवासी विकास विभाग
आदिवासी आयुक्तालय नाशिक
2) जन माहिती अधिकारी तथा
अपर आयुक्त
आदिवासी विकास गिरीपेठ नागपूर ..... **उत्तरवादी**

<u>अपील कमांक 261/2008</u>

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर आयुक्त
आदिवासी विकास गिरीपेठ नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
चिमूर ता. चिमूर जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 8.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही तीनही अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे कागदपत्रे दाखल झालेली नाहीत.

2. अपील क. 259/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 17.10.2007 रोजी माहितीचा प्रवर्ग–शासकीय सेवाशर्ती अशा प्रकारची माहिती संबंधित माहितीचा कालावधी जुलै 2006 ते फेब्रुवारी 2007 शासकीय, माध्यमिक, प्राथमिक आश्रमशाळेतील शिक्षक, कर्मचारी प्रशिक्षणाच्या संदर्भात राज्य जन माहिती अधिकारी तथा आपर आयुक्त यांचेकडे माहिती मागितलेली दिसून येते.

3

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.3.2008 रोजी आयुक्त आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र शासन नाशिक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचा निर्णय झालेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 17.12.2007 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याच्या करीता जन माहिती अधिकारी यांनी कार्यासन अधिकारी 3 शिक्षण कार्यालय अपर आयुक्त नागपूर यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्या करीता दि. 27.12.2007 रोजी पत्र दिलेले दिसून येते. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की कार्यासन अधिकारी 3 यांनी आतापर्यंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील हे नाशिक येथील कार्यालयात दाखल केलेले होते. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी हे नागपूर येथेच असल्यामुळे सदरच्या अपीलाच्या संदर्भात सुनावणी झालेली दिसून येत नाही व निर्णयही झालेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती कार्यासन 3 शिक्षण यांनी उपलब्ध करुन न दिल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता ज्यांचे सहाय्य घ्यावे लागते त्या कर्मचारी अधिका–यांना सुध्दा माहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे कार्यासन अधिकारी 3 शिक्षण हे या प्रकरणात माहिती अधिकारी असल्यामुळे व त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे दोषी आढळुन येतात व शास्तीस पात्र आहेत. व माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

3. अपील क्र. 260/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 17.12.2008 रोजी राज्य जन माहिती अधिकारी अपर आयुक्त आदिवासी विकास कार्यालय नागपूर यांचेकडे कु.

वैशाली भा. गोहत्रे माजी आदिवासी विकास निरीक्षक आ.वि.प्र.चिमूर यांच्या संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही विहित मुदतीत उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 3.3.2008 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून आयुक्त आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य नाशिक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी हे नाशिक येथील कार्यालयात नसल्यामुळे सदरच्या अपीलावर कोणताही कार्यवाही झालेली दिसून येत नाही. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. अपीलकर्ता यांनी दि. 17.12.2008 रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सहा. माहिती अधिकारी अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांनी कार्यासन अधिकारी 4 प्रशिक्षण कार्यालय अपर आयुक्त यांचेकडे अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिलेले दिसून येते. परंतु सदरच्या पत्राप्रमाणे माहिती अधिकारी यांचेकडे अद्यापर्यंत माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले. जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध नसली तरी ज्या शाखेमध्ये माहिती उपलब्ध असेल त्या अधिकारी किंवा कर्मचा–यास माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता सहाय्य घेतले असेल तर अशा अधिकारी किंवा कर्मचा–यास अधिनियमच्या कलम 5 (5) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. व त्यामुळे सदरच्या प्रकरणात कार्यासन अधिकारी 4 प्रशिक्षण हे जन माहिती अधिकारी आहेत व त्यांनी विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे माहिती अधिकारी म्हणून दोषी आढळुन येतात व शास्तीस पात्र आहेत. व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

5. अपील क्र. 261/2008 मध्ये अपीलकर्ता यांनी दि. 24.12.2007 रोजी पुन्हा राज्य जन माहिती अधिकारी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर ते आज हजर नाहीत यांचेकडे कु. वैशाली भा. गोहत्रे माजी आदिवासी विकास निरीक्षक यांचे संबंधाने पोलीस विभागाकडून आपणास प्राप्त झालेल्या एकुण 18 मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते.

सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 11.1.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा सहा. प्रकल्प अधिकारी यांनी आपण माहितीच्या अधिकारा अंतर्गत मागितलेली माहिती पूर्वीप्रमाणेच विहित नमुन्यात मागितलेली नाही सबब आपला अर्ज निकाली काढण्यात येत आहे असे कळविण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. 3.3.2008 रोजी अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. परंतू प्रथम अपीलाच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर आयुक्त यांनी दि. 31.3.2008 रोजी नियमानुसार योग्य ती कार्यवाही करुन तसे संबंधितास कळवावे असा अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये जे दि. 11.1.2008 रोजी उत्तर दिलेले आहे त्याबाबत कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण केलेले नाही व विहित नमुन्यात नाही याचा अर्थही दिलेला नाही व त्यामुळे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही असा निष्कर्ष काढावा लागतो व तत्कालीन जन माहिती अधिकारी हे त्याबाबत दोषी आढळुन येतात व शास्तीस पात्र आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय हा कोणत्याही प्रकारची चौकशी न करता दिलेला आहे व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केलेले आहे व त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यास पात्र आहे.

6

# आ दे श

1) अपील क्र. 259/2008 हे मंजुर करण्यात येत असून यांच्या दि. 17.12.2007 च्या अर्जाप्रमाणे प्रशिक्षणाच्या संदर्भात हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टानी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता यांच्या दि. 17.12.2007 च्या अर्जाप्रमाणे सहा. प्रकल्प अधिकारी यांनी कार्यासन अधिकारी 3 शिक्षण कार्यालय नागपूर आयुक्त यांना दि. 17.12.2007 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता पत्र दिले होते. माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांचेविरुध्द रु. 1000/– ची शास्ती लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाच्या वेतनातून करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करावा.

3) अपील क्र. 260/2008 मध्ये अपीलकर्ता यांच्या दि. 17.12.2007 च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी कार्यासन अधिकारी 4 प्रशिक्षण यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास आदेश दिलेले होते. परंतु कार्यासन अधिकारी 4 यांनी माहिती विहित मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे माहिती अधिकारी दोषी आढळुन येत असल्याने त्यांचेविरुध्द रु. 1000/– ची शास्ती लादण्यात येत असून सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाच्या वेतनातून करुन लेखाशिर्ष ''0070–इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070–016'1)'' मध्ये जमा करावा. व अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकित

प्रतीच्या स्वरुपात रजिस्टर पोस्टानी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.



4) अपील क्र. 261/2008 मध्ये अपीलकर्ता यांच्या दि. 24.12.2007 च्या अर्जाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. जन माहिती अधिकारी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प चिमूर हे आज सुनावणीलासुध्दा हजर नसल्यामुळे व अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाच्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांनी करावयाची आहे.

5) सदरच्या निर्णयाची एक प्रत अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर व आयुक्त आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र राज्य नाशिक यांचेकडे पुढिल कार्यवाहीसाठी एक प्रत स्वतंत्रपणे पोष्टाने पाठविण्यात यावी.

6) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 25.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.753–759

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 268/2008.**

सौ. ज्याती मोहन खुराणा
अलाहाबाद बॅंके समोर, सहारा मॅचिंग सेंटर
भंडारा
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. एम. शिवरकर
जन माहिती अधिकारी तथा
तहसिलदार भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 8.3.2008 रोजी शासकीय माहिती अधिकारी तथा तहसिलदार भंडारा यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचे पत्र क्र. अन्न/संकीर्ण/कावि/198/08 दिनांक 12.2.2008 अनुसार अर्जदारास परस्पर कळवावे.

2. अर्जदारास अर्ज दि. 28.1.2008 अनुसार आपणास व कार्यालयद्वारा काहीपण अद्यावत कळविण्यात आलेला नाहीच.

3. गैरअर्जदार असगरी अहमद सैय्यद रा. तिलणवार्ड अलाहाबाद बॅंके समोर, भंडारा आपणास म्हणजे तहसिल ऑफीस वरुन कोणती कार्यवाही करण्यात आलेली याद्यल सविस्तर माहिती च त्याची सत्यप्रत प्रमाणित झेरॉक्स प्रत पाठविण्यात यावी.

4. तसेच अधिक्षक तथा माहिती अधिकारी जिल्हा अधिकारी कार्यालय भंडारा यांची पत्र क्र. 198/2008 दि. 12.2.2008 नुसार केलेली कार्यवाही व माहिती व सदर प्रमाणित झेरॉक्स प्रत.

अर्जाच्या अनुषंगाने माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. मात्र राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. जन माहिती अधिकारी यांनी खालीलप्रमाणे खुलासा आयोगाचे कार्यालयात दाखल केलेला आहे.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, तक्रारकर्ता सौ. ज्याती मोहन खुराणा अलाहाबाद बॅंके समोर, सहारा मॅचिंग सेंटर भंडारा यांनी दि. 8.3.2008 च्या पत्रानुसार मुद्या क्र. 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. सदर मुद्यांवरील माहितीचे अनुषंगाने गैरअर्जदार श्रीमती अजगरी अहमद सैय्यद रा. टिळकवार्ड भंडारा यांचेवर केलेल्या कार्यवाहीबाबतच्या सत्यप्रती मिळण्याबाबतची मागणी केलेली आहे. परंतु अर्जदारांनी दि. 8.3.2008 च्या अर्जामध्ये विचारलेली माहिती ही प्रश्न उत्तराच्या स्वरुपात असल्यामुळे तसेच अर्जदारास नेमकी कोणती माहिती हवी आहे याबाबतचा उक्त अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा उल्लेख केलेला नाही.

माहिती अधिकारी सार्वजनिक प्राधिकरणामध्ये माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध असेल उदा. अभिलेख, दस्तऐवज व इतर ज्ञापने इत्यादी माहिती ज्या स्वरुपात असेल

3

त्यांच्या छायांकीत प्रत उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे. माहिती अधिकारी हे कोणत्याच प्रकारचे प्रकरणामध्ये अभिमत देवू शकत नाही. तरीसुध्दा अर्जदारांचे अर्जातील अर्जाचे अनुषंगाने गैरअर्जदार श्रीमती अजगरी अहमद सैय्यद यांचे प्रकरणाचा शोध घेवून अर्जदारास सदर प्रकरणातील आदेश पत्राच्या प्रती तसेच फौ.मा.क्र. 39/2006 मध्ये या कार्यालयाचे पत्र क्र. 990/2006 दि. 7.12.2006 नुसार जाब देणा–यास नोटीस देवून दोन प्रतिष्ठीत व्यक्तीची जास्तीत जास्त रकमेची जामीन जाब देणा–यांकडून का घेण्यात येवू नये याबाबतचे लेखी स्पष्टीकरण सादर करण्यास दि. 18.12.2006 ला पेशी तारखेवर हजर राहण्याबाबतचे लेखीपत्र देण्यात आले असून सदर नोटीसची सत्यप्रती व फौ.मा.क्र. 107/07 मधील मामल्यातील आदेश पत्राच्या सत्यप्रती तसेच गैरअर्जदार श्रीमती अजगरी अहमद सैय्यद यांनी दि. 4.1.2008 ला दिलेल्या बंद पत्राची सत्यप्रत अर्जदारास देण्यात आलेली आहे.

तसेच अर्जदारांनी दि. 22.1.08 ला मुद्या क्र. 3 मध्ये नमूद केलेल्या माहिती नुसार दि. 10.1.08 ला सौ. विद्या थुलकर यांनी मा. पोलीस अधीक्षक, भंडारा यांना अर्ज सादर केलेला आहे. तरी सदर अर्जात मागितलेली माहिती मा. पोलीस अधीक्षक, भंडारा यांचेकडून उपलब्ध करुन घ्यावी असे दि. 12.8.08 चे पत्रानुसार अर्जदारास कळविण्यात आलेले आहे. अर्जदारांनी सादर केलला अर्ज हा पोलीस स्टेशन अधिकारी भंडारा यांचे विभागाशी संबंधित असल्यामुळे व सदर माहिती या विभागास संबंधित विभागाकडून प्राप्त न झाल्यामुळे उक्त माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अर्जदारास कळविण्यात आलेले आहे.

त्या संबंधात अर्जदारानी मा. उपविभागीय अधिकारी भंडारा यांचेकडे सुध्दा दिनांक 4.8.2008 च्या अर्जानुसार अपील दाखल केलेली असून सदर अपील प्रकरणात सुध्दा ते दिलेल्या तारखेवर हजर न झाल्यामुळे व अर्जदारास या विभागाशी संबंधित

4

असलेली पुरविलेली असल्यामुळे अर्जदारांची अपील मा. उपविभागीय अधिकारी भंडारा यांनी दि. 28.8.2008 च्या आदेशानुसार फेटाळण्यात आलेली असून अर्जदारांनी अपील नस्तीबध्द करण्यात आलील. सोबत मा. उपविभागीय अधिकारी भंडारा यांचे आदेशाची प्रत माहितीकरीता सोबत सलग्न करण्यात आलेली आहे.

तसेच मा. उपविभागीय अधिकारी भंडारा यांचे कार्यालयात दि. 8.3.2008 च्या अर्जानुसार अपील दाखल केलेली असून सदर अर्जाचे अनुषंगाने अर्जदारास गैरअर्जदार श्रीमती अजगरी अहमद सैय्यद यांचेवर फौजदारी प्रकरणात केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती वारंवार मागत असून त्या प्रकरणात केलेल्या कार्यवाहीबाबत अर्जदारास कळविण्यात आलेले आहे तसेच गैरअर्जदारांना दिलेल्या नोटिसाच्या,आदेशाच्या,तसेच बंद पत्राच्या प्रती अर्जदारास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

सबब अर्जदारानी आपले कार्यालयात केलेली अपील नस्तीबध्द करण्याबाबत आदरपूर्वक विनंती करण्यात येत आहे.

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी प्रश्नोत्तराच्या स्वरुपात माहिती मागितलेली दिसून येते. परंतु कोणत्याही प्रश्नाच्या माध्यमातून अभिप्राय मागितले असले तरी ते माहितीच्या अधिकारात येत नाही तसेच जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की तसेच अपीलकर्ता हे वारंवार माहिती मागत असून त्या प्रकरणात त्यांना अगोदरपण भरपूर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्यामुळेच अर्जदाराचे अपील हे उपविभागीय अधिकारी भंडारा यांनी दि. 28.8.2008 च्या आदेशानुसार फेटाळण्यात आलेले आहे. अपीलकर्ता यांनी कागदपत्रेसुध्दा आयोगाकडे योग्यरित्या दाखल केलेले नाहीत व गैरहजर असल्यामुळे तसेच कोणत्याही प्रकारचा खुलासा केलेला नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असा निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

5

# आ दे श

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 8.3.2008 च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते. अपीलकर्ता यांचा दि. 21.1.2008 च्या संदर्भात कोणतेही कागदपत्र दाखल केलेले नसल्यामुळे ते विचारात घेण्यात आलेले नाही.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.760–764

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 266/2008.**

श्री कुशाब रामचंद्र पारेलवार
दाल ओली 2 कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस आयुक्त,
ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
अपर पोलीस आयुक्त,
ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 11.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 23.12008 रोजी माहिती अधिकारी म्हणून यांचेकडे अपर पोलीस आयुक्त, ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

पो.स्टे.बुटीबोरी गुन्हा 6/1994 कलम 13 (2) वगैरे लाचलुचपत कायदा मधील जप्ती मालासबंधाने. माहितीचा कालावधी 1994, 1995 दिसून येतो.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक 26.2.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17.3.2008 रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 'ड' संदर्भात कागदपत्राची पाहणी करुन तसेच मुद्या क्र. 'ग' संदर्भात मुद्येमाल दाखल करण्याच्या बाबत आदेश असल्यास त्या आदेशाची प्रत उपलबध करुन देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 7.4.08 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तरीही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 18.4.2008 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

3. द्वितीय अपीलाच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी सांगितले की सदरच्या गुन्हयाच्या संदर्भामध्ये सन 1994 मध्ये गुन्हा नोंदीची स्टेशन डायरीतील माहिती उपलब्ध झाली नाही ती देणे शक्य आहे तसेच मुद्या क्र. 'इ' प्रमाणे पोलीस ॲन्टी करप्शन मॅनुअलमधील मुद्येमाच्या संदर्भात करण्यात येणारे कार्यवाहीच्या संदर्भात जे नियम असतील त्या नियमाची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ॲन्टी करप्शन मॅनुअलमधे तशा प्रकारची तरतुद आहे परंतु सदरचे मॅनुअल हे कार्यालयीन कामकाजासाठी असल्यामुळे त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही. ॲन्टी करप्शन मॅनुअलमधे गुन्हयाच्या संदर्भात करण्यात येणा–या कार्यवाहीची क्रमशः नियम दिलेले असतात. व

त्या नियमाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक असते व त्यामुळे सदरचे नियम हे गोपनिय असू शकत नाही व त्यामुळे संबंधित नियमाची छायांकीत प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. व त्याकरीता सदरचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना स्टेशन डायरीतील नोंदीची छायांकीत प्रत तसेच ॲन्टी करप्शन मॅनुअलमधे मुद्येमाल संबंधी जे नियम आहेत त्यां नियमाची छायांकीत प्रत हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत रजिस्टर पोस्टानी विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.764–767

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 270/2008.**

श्री जोगीराम इस्तारी गहाने
रा. ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एच. पी. सुपले
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी
पंचाय समिती अर्जुनी मोर. जि. गोंदिया
2) श्री आर. पी. उगले
जन माहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी
ग्रामपंचायत अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 26.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.10.2007 रोजी ग्रामसचिव यांना माहिती अधिकारी म्हणून खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

ग्रामपंचायत अर्जुनी मोर येथील आबादी जमीन श्री मधुकर सदाशिव खुने रा. कन्हाळगाव यांना सन 1986 मध्ये लिज देण्यात आली त्या संबंधीची माहिती.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 24.4.1992 च्या ठरावाची प्रत उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 25.1.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 17.4.2008 रोजी देण्यात आलेला असून ग्रामपंचायतने ठराव करुन अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे परंतु तरी सुध्दा अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या दि. 15.2.2007 च्या अर्जाप्रमाणे व दि. 25.1.2008 च्या अर्जाप्रमाणे प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 26.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.768–769

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 285/2008.**

श्री जोगीराम इस्तारी गहाने

रा. ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

अधिक्षक

भूमी अभिलेख गोंदिया ता. जि. गोंदिया

2) श्री राम बाबुराव फडतरे

जन माहिती अधिकारी तथा

तालुका निरीक्षक

भूमी अभिलेख अर्जुनी मोर

ता. अर्जुनी मोर. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.3.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 15.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी म्हणून तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

श्री मधुकर सदाशिव खुने यांना कृषी केंद्राकरीता दिलेल्या लिज संबंधीची माहिती मळण्याबाबद. लिज संपली असून नविन मुदतवाढ किंवा आदेश प्राप्त झाले आहेत काय? जमीन सरकार जमा झाली आहे काय. सरकार नामे न करण्याची कारणे इत्यादी माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 1.11.2007 रोजी अपीलकर्ता यांना तालुका निरीक्षक भूमी अभिलेख तथा माहिती अधिकारी यांनी सदरहु मिळकत जमा करुन संबंधाने आपण महसुल विभागाकडे पत्रव्यवहार करावा तसेच तपशिलामध्ये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक 15.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 11.12.2007 रोजी पुन्हा अपीलकर्ता यांना संपूर्ण तपशिलात तीच माहिती दिलेली असून अपील फेटाळण्यात आले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 11.12.2007 रोजी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचा प्रथम अपीलाचा निर्णय दि. 11.12.2007 रोजी दिलेला असून तो योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.770–772

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 276/2008.**

श्री रामदास दशरथजी दहाट

C/o श्री जी. प्र. बन्साड 65 विवेकानंदनगर

साईमंदिर मागे वर्धा रोड नागपूर 15. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

सचिव/अध्यक्ष

महात्मा फुले विद्यालय

ता. सिदेंवाही जि. चंद्रपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

मुख्याध्यापक

महात्मा फुले विद्यालय

ता. सिदेंवाही जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 4.8.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हजर आहेत.

उत्तरवादी गैरहजर आहे. परंतु त्यांचे तर्फे ॲड. अे. डी. सोनक यांनी जन माहिती अधिकारी हे आजारी आहेत व ते आज उपस्थित राहू शकत नाही. वैद्यकीय प्रमाणपत्र आहे व त्या कारणास्तव मुदतवाढ मिळावी असे त्यांनी विनंती केलेली आहे परंतु कोणतेही कागदपत्र त्यांनी दाखल केलेली नाहीत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 26.12.2007 रोजी माहिती अधिकारी तथा मुध्याध्यापक यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. वरील विद्यालयाच्या ''संस्था संचालक मंडळ'' कार्यकारीणीच्या पदाधिका—यांचे पूर्ण नाव व पत्त्यासहीत शेडयूल 1 प्रतीसह प्रमाणित प्रत तात्काळ देण्यात यावी.

2. महात्मा फुले विद्यालय सिदेंवाही या शाळेची इमारत कोणाच्या मालकीची आहे?

सदरची माहिती नोंदणीकृत शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले आहे.

अर्जाच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगास सांगितले. व त्यामुळे त्यांनी दि. 28.2.2008 रोजी अध्यक्ष सचिव यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय झालेला नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. अधिनियमाच्या कलम 19 (5) प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली किंवा नाही हे सिध्द करण्याची जबाबदारी ही जन माहिती अधिकारी यांची आहे परंतु वर नमुद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र पाठवून मुदत मागितलेली आहे. परंतु कोणतेही कागदपत्र दाखल केलेली नाहीत. वास्तविक आयोगाचे कार्यालयातून दि. 26.2.2009 रोजी आजच्या सुनावणीची नोटिस काढण्यात आलेली होती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना वैद्यकीय प्रमाणपत्राबरोबर कागदपत्रे सादर करता आली असती तसेच सदरची नोटिस ही प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव/अध्यक्ष यांना सुध्दा काढण्यात आलेली होती. व अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती संस्थेच्या संदर्भातच दिसून येते. त्यामुळे संस्थेचे सचिव किंवा अध्यक्ष यांचेकडून प्रथम अपीलाच्या संदर्भात कागदपत्रे

दाखल करणे शक्य झाले असते. परंतु संस्थेनी सुध्दा त्याबाबतची कोणतीही काळजी न घेता वकील श्रीयुत सोनक यांना वकीलपत्र दिलेले दिसून येते. परंतु वकीलपत्र, मुदतीचा अर्ज व वैद्यकीय प्रमाणपत्र दाखल केलेले नाही. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करुन अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांच्या दि. 26.12.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत छायांकित प्रतीच्या स्वरुपात नोंदणीकृत टपालाद्वारे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जर माहिती उपलब्ध करुन दिली नाही तर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे शास्तीस पात्र राहतील यांची नोंद घ्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.773–775

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 283/2008.**

श्री दत्तु दंदु कुसणाके
वार्ड नं. 5, पोस्ट उर्जानगर, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री आ. मा. गुरनुले
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी
पंचायत समिती चंद्रपूर
2) सौ. कांचन हरीराम वरठी
जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी
पंचायत समिती चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 30.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 3.10.2007 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती चंद्रपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती चंद्रपूर यांचा सामान जप्ती संबंधात चौकशी अहवालावर केलेली कारवाई. कालावधी सन 2004 ते 2005. ग्रामपंचायत उर्जानगरने थकीत ग्राहकाचे नावाखाली अर्जदाराचे घरचे सामान जप्त केले. त्यावर केलेल्या तक्रारीने संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती चंद्रपूर यांनी चौकशी अहवाल सादर केला काय? त्यात सचिव व अधिका–यांना दोषी ठरविले आहे. त्यांचे विरुध्द कोणती कारवाई केली व अर्जदाराचे घरातील बेकायदेशीरपणे जप्त केलेल्या मालाचे काय केले याची सविस्तर माहिती पुरवण्याबाबत.

सदरची माहिती ही स्वतः घेईन असे नमूद केलेले आहे.

सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 13.11.2007 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये संवर्ग विकास अधिकारी यांच्या चौकशी अहवालानुसार करण्यात आलेल्या चौकशीचा अहवाल उपमुख्य कार्यपालन अधिकारी ग्रामपंचायत यांचेकडून प्राप्त करुन आवश्यक माहिती अपीलकर्ता यांना 3 महिन्याचे आंत पुरविण्यात यावी तसेच अपीलकर्ता यांनी त्यांचेकडे थकीत असलेले गृहकर, विज कर, सफाई कर, पाणी कर ग्रामपंचायत उर्जानगर येथे जमा करुन त्याचे जप्त असलेले सामान परत करण्यात यावे असाही आदेश दिलेला दिसून येतो. परंतु त्यानंतरही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

3. अपीलकर्ता यांच्या दि. 3.10.2007 च्या अर्जाच्या वेळेस त्यांना अपेक्षित असलेली कारवाई झालेली नसल्यामुळे त्यावेळेस माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दि. 5.10.2008 रोजी वर नमुद केल्याप्रमाणे दिलेला आहे परंतु त्याही वेळेस चौकशी पूर्ण झालेली नसल्यामुळे

अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. मात्र अहवालानुसार आता कारवाई झालेली असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता येईल तसेच अपीलकर्ता यांचे विरुध्द जी अतिरिक्त रक्कम आकारण्यात आलेली आहे ती माफ करुन त्यांनी थकीत कराची रक्कम भरणे आवश्यक राहिल. तसेच त्यांना माहिती पण उपलब्ध करुन देता येईल असे आयोगाचे निदर्शनास आणले असल्यामुळे आणि अपीलकर्ता यांना सदरची माहिती दि. 13.3.2009 रोजी चौकशी अहवालाप्रमाणे कारवाई झाल्यानंतर उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केलेला होता. परंतु अपीलकर्ता यांनी ती माहिती घेतलेली नाही व त्याबाबत त्यांचे पोचपावती, स्वाक्षरी वगैरे कागद दाखल केलेले आहे. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना त्यांच्या 3.10.2007 च्या अर्जाप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून विनामुल्य माहिती उपलब्ध करुन घ्यावी व तशी पोच द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 30.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.776–778

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षेत्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 288/2008.**

श्रीमती सिंधुताई उत्तमराव पाटील
651 नेहरु नगर, महानगर पालीका नागपूर पाणी कर
कार्यालय झोन (5) जवळ, सक्करदरा नागपूर 9. ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उप आयुक्त
पूर्व नागपूर विभाग क्र. 3,
कोतवाली महाल नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
सहा. पोलीस आयुक्त
कोतवाली विभाग, कार्याल महाल नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 29.1.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

1. हैदर हबीब शेख पो.सब.ई.पो.स्टे.लक्कडगंज नाग. चा आठवडा अहवाल पत्र नोंदणी अभिलेख वही दि. 21.10.2002 ते 8.3.2003 पावेतो लिहिले त्या अभिलेखवही पानाचा नकलाची प्रमाणित प्रत.

2. पी.जी.आत्राम पो.सब.ई.पो.स्टे.लक्कडगंज नाग. चा आठवडा अहवाल पत्र नोंदणी अभिलेख वही दि. 21.10.2002 ते 3.11.2003 पावेतो लिहिले त्या अभिलेखवही पानाचा नकलाची प्रमाणित प्रत.

3. पो.स्टे.लक्कडगंज नाग. गु.र.नं.436/02 कलम 379, 34 भा.द.वि.चा तपासातील कागदपत्राचा नक्कलाच्या प्रमाणित प्रत.

विषय – 1. पो.स्टे.लक्कडगंज नाग. गु.र.नं.436/02 कलम 379, 34 भा.द.वि.चा तपासातील कागदपत्राचा नक्कलाच्या प्रमाणित प्रत करुन मिळणेबाबत.

2. पो.सब.ई. हैदर हबीब शेख लक्कडगंज नाग.ने गुन्हयाचा तपास केल्याची आठवडा डायरीत नोंद केल्या मुळ पानाचा नक्कलाच्या प्रमाणित प्रती मिळणेबाबत.

सदरच्या माहितीचा कालावधी 21.10.2002 पासून ते आज तारखेपावेतो.

सदरची माहिती स्पिड पोष्टने पाठवावी असे नमूद केलेले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 6.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या अनुषंगाने दि. 11.3.2008 रोजी मागितलेल्या माहितीप्रमाणे माहिती तात्काळ संबंधित पोलीस स्टेशन कडून गोळा करुन 7 दिवसात या कार्यालयात न चुकता सादर करावी असे आदेश दिलेले दिसून येते व त्यानंतर अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. 15.3.2008 रोजी आपण मागितलेल्या माहितीचा कालावधी संपल्यामुळे आपणास

माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अन्वये माहिती देता येत नाही असे माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांनी कळविलेले दिसून येते. व उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करतांना असे सांगितले की महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999 भाग 2 मधिल परिशिष्ट 15 पान क्र. 254 व 255 अन्वये नमुद केलेल्या कालावधीतील माहिती ही नष्ट केलेली असल्यास तशा प्रकारचे आदेश अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी अन्यथा त्यांनी पोलीस विभागाच्या क्राईम विभागात त्याच कालावधीतील पोलीस डायरीतील मागितली असता ती मात्र त्यांनी उपलब्ध करुन दिली आहे व यावरुन महाराष्ट्र पोलीस नियमावली 1999 हे ज्या विभागस सुध्दा लागू आहे त्या त्यांनी माहिती दिलेली आहे. त्याप्रमाणे या प्रकरणात सुध्दा माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त यांनी माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

4. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी न घेता व कोणत्याही प्रकारची चौकशी न करता माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असल्यामुळे सदरचे आदेशाचे पालन होणे आवश्यक होते परंतु तसे न होता माहिती नष्ट झालेली आहे असे कळविण्यात आलेले आहे. यावरुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनीसुध्दा कोणत्याही प्रकारची चौकशी ही केलेली नाही अन्यथा अपीलकर्ता यांना राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची आवश्यकता नव्हती त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून संबंधीत माहितीचा शोध घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत प्रथम अपीलाची सुनावणी ही अपीलकर्ता अर्जदार व जन माहिती अधिकारी यांचे उपस्थित घेवून अपीलकर्ता अर्जदार यांना माहिती जशी आहे तशी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.779–782

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 286/2008 व अपील क्रमांक 576/2008.**

श्री दिवाकर सुभाष मडावी (परि.भूमापक)
तालुका निरीक्षक भूमी अभिलेख कार्यालय
गोंडपिपरी ता. गोंडपिपरी जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक
भूमी अभिलेख नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा
उपसंचालक
भूमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. सदरच्या दोनही द्वितीय अपीलांची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी अपील क्र. 286/2008 मध्ये माहितीचे तीन अर्ज अनुक्रमे दि. 3.10.2007, 8.10.2007 व 1.11.2007 हे दाखल केलेले आहे. अपील क्र. 576/2008

मध्ये त्यांनी माहितीचा दि. 1.11.2007 चा अर्ज दाखल केलेला आहे. परंतु सर्व अर्जाच्या प्रमाणे त्या त्या मुदतीमध्ये अपीलकर्ता यांना माहिती ही कागदपत्राच्या स्वरुपात उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना त्यांची पदोन्नती का डावलण्यात आली याबद्यलची कारणे अपेक्षित आहे. व त्यामुळे दि. 19.12.2007 रोजी तीन प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येते. दोन प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दि. 7.2.2008 रोजी निर्णय दिलेला असून मौजा पानोरा येथील नवीन अंतिम नं. 191, 198 व 202 बाबत अधिक्षक भूमी अभिलेख यांची उपस्थितीबाबतची माहिती अधिक्षक भूमी अभिलेख चंद्रपूर यांचेकडून नियमानुसार महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 चे कलम 357 अन्वये नक्कल अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. अपीलकर्ता यांनी या सर्व अर्जामध्ये जी माहिती मागितलेली दिसून येते ती वेगवेगळया प्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. व प्रत्येक मागितलेल्या माहिती मध्ये त्यांना कारवाई अपेक्षित आहे. माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेच्या आधारावर हस्तक्षेप करणे किंवा निर्णयाच्या बाबत आदेश करणे हे अपेक्षित नाही. सार्वजनिक प्राधिकरणात ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. कागदपत्र, अभिलेख, दस्तऐवज इत्यादी स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते ती छायांकित प्रतीच्या स्वरुपात अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. एकुण दोनही अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांना छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु ज्या मुद्यांमध्ये कारणे विचारलेली आहेत ती माहिती अपेक्षित नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. परंतु त्यांच्या पदोन्नतीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा निर्णय आयोगास करण्याचा अधिकार नसल्यामुळे सदरचे दोन्ही अपीले खारीज करण्यास पात्र आहे.

3

# आ दे श

1) अपीलकर्ता यांच्या अपील क्र. 286/2008 व अपील क्र. 576/2008 मध्ये विनंती मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.3.2009**

( विलास पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

Ageyord3.782–785

**राज्य माहिती आयोग, विदर्भ क्षे़त्र, अमरावती/नागपूर विभाग, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 295/2008.**

श्री सरेंद्र पुंडलिकराव रेवतकर

C/o बी.डी.जोसफ 17/3 कॅनल रोड

गिरीपेठ नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा

मातृसेवा संघ, सुतिकागृह

सिताबर्डी नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा

मातृसेवा संघ, सुतिकागृह

सिताबर्डी नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 31.3.2009 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.4.2008 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता गैरहजर असून त्यांनी आज सुनावणीस उपस्थित राहता येत नाही असा अर्ज दिला आहे. परंतु कागदपत्राची तपासणी केल्यावर अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती अपील क. 2574/2007 मध्ये मागितलेल्या माहिती प्रमाणेच असल्यामुळे सदरचे अपील आज सुनावणीस घेण्यात आले. उत्तरवादी हजर आहेत.

2. अपीलकर्ता यांनी दि. 27.2.2008 रोजी मातृसेवा संघ, सुतिकागृह सिताबर्डी नागपूर यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

अे सी एफ ऑफिस सिताबर्डी नागपूर द्वारे कळविलेल्या 2.8.2007 रोजी मातृसेवा संघ येथे ॲबार्रशन केल्याचे दर्शविण्यात आले आहे.

1. ॲबार्रशन कोणच्या तपासणी अहवालावरुन केले आहे.

2. गर्भ किती दिवसाचे होते. 3. ॲबार्रशन मध्ये त्यांना कोणी मदत केली आणि वेळ

4. त्याची तपासणी अहवाल औषधाचे प्रीस्क्रिप्शन 5. बेड हेड तिकीटची कॉपी

1. ॲबार्रशन 2.8.2007 ला झाल्याचे कारण तसेच वेळ 2. ते कोणच्या तपासणी अहवालावरुन केले 3. गर्भ किती दिवसाचे होते. 4. ॲबार्रशन मध्ये त्यांना कोणी मदत केली 5. त्याची तपासणी अहवाल औषधाचे प्रीस्क्रिप्शन 6. बेड हेड तिकीटची कॉपी 7. कोणत्या डॉक्टरने केले आदी.

सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमूद केलेले आहे.

विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. 28.3.2008 रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. व प्रथम अपीलाचासुध्दा निर्णय विहित मुदतीत मिळाला नाही म्हणून दि. 7.4.2008 रोजी द्वितीय अपील दाखल केलेले आहे. जन माहिती अधिकारी म्हणून आयोगाकडे खुलासा करतांना अर्जदाराने 9.6.2008 रोजी जिल्हा शल्यचिकित्सक सामान्य रुग्णालय नागपूर यांनाही अर्ज केला त्यावर जिल्हा शल्यचिकित्सक नागपूर यांनी चौकशी केलेली आहे. गर्भपात 2.8.2007 ला झाल्याचे कारण व वेब ते कोणच्या तपासणी अहवालावरुन केले आहे. गर्भ किती दिवसाचे होते. ॲबार्रशन मध्ये त्यांना कोणी मदत केली त्याची तपासणी अहवाल औषधाचे प्रीस्क्रिप्शन बेड हेड व तिकीटची कॉपी कोणत्या डॉक्टरने केले. ही वैयक्तिक उपचाराची माहिती असल्याने व्यवस्थापन ही माहिती देवू शकत नाही. अर्जदाराने व्यवस्थापन मंडळास अपील केलेले आहे. अपीलाची तारीख 28.3.2008 ही आहे. सदर

माहिती देता येत नाही असे अर्जदारास दि. 5.10.2007 रोजी आधीच कळविले आहे. मुळ अर्ज दि. 5.10.2007 रोजी फेटाळण्यात आलेला आहे. अर्जदाराने हयापूर्वी अपील क्र. 2574/2007 दाखल केले होते. त्याचा निर्णय दि. 25.2.2009 रोजी होवून अपील खारीज करण्यात आली. त्याची प्रत सोबत जोडली आहे. वरील बाबतीत पोलीस स्टेशन सिताबर्डी यांनी डॉ. रत्ना शेखावत यांचे बयान नोंदविले आहे त्याची प्रत जोडली आहे. मागीतलेली माहिती कलम 7 (क) अनुसार देय नसल्यामुळे दिलेली नाही. पी.एन.डी.टी. नियमानुसार अशी माहिती देता येत नाही. माहिती गोपनिय असल्याने दिल्या जावू शकत नाही असे अर्जदारास सूचित केलेले आहे. राज्य माहिती आयोगाच्या पत्रानुसार आयोगास दि. 12.3.2008 रोजी सर्व माहिती पुरविण्यात आलेली आहे. त्याची प्रत सोबत जोडली आहे.

वरील खुलाशावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी जी मागितलेली आहे ती सौ. कविता सुरेंद्र रेवतकर यांच्याबद्यलची आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. व त्याबद्यल राज्य माहिती आयोगाकडील अपील क्र. 2574/2007 मध्ये दि. 25.2.2009 रोजी निर्णय झालेला असून सौ. कविता सुरेंद्र रेवतकर यांचे म्हणणे त्रयस्थ पक्ष म्हणून अधिनियमाच्या कलम 19 (4) प्रमाणे आयोगाने एकुन घेतलेले होते. त्याप्रमाणे सौ. कविता सुरेंद्र रेवतकर यांनी माझे कोणत्याही प्रकारचे दवाखान्याचे कागदपत्र माझे पतीला देवू नये किंवा कोणतीही माहिती देवू नये असे लेखी आयोगाकडे दिलेले आहे. तसेच पी.एन.डी.टी. नियमानुसार सदरची माहिती श्री रेवतकर यांना उपलब्ध करुन देता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात आले होते. प्रस्तुत संदर्भात डॉ. रत्ना शेखावत यांनी खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

मी समक्ष विचारलेवरुन आपला जबाब देते की वरील पत्यावर रहात आहे. आणि मातृसेवा संघ, सुतिकागृह सिताबर्डी येथे सिनिअर मेडिकल ऑफिसर व नागरी आरोग्य केंद्रचे मेडिकल ऑफिसर या पदावर कार्यरत आहे. सुरेंद्र रेवतकर यांनी दिलेल्या अर्जाचे

अनुषंगाने कविता रेवतकर यांची फाईल मातृसेवा संघ येथेच आहे. ती फाईल ऑफीसमध्येच आहे. माझ्या मार्गदर्शनाखाली व डॉ. वैशाली व–हाडकर हयांचे मार्गदर्शनाखाली डॉ. किर्ती पारधी व डॉ. तजीम ख्वाजा हयांचे देखरेखीखाली गर्भपात कविता रेवतकर व त्याची आई ललीता राउत यांचे सहिनिशी त्यांचे लिहून दिलेल्या पत्रावरुन गर्भपात करण्यात आला.

कविताच्या ॲबॉर्शन संबंधीची नोंद हि डिलीव्हरी वार्डचे रजिस्टरमध्ये सिरीयल नं. 699 वर डयुटीवरील स्टाफ नर्सनी घेतली व कविताचे गर्भाबद्यलची माहिती ॲडमिशन फाईलमध्ये ऑन डयुटी डॉ. तजीम ख्वाजानी लिहली व एमटीपी फॉर्मवर जी मासिक माहिती महानगरपालीकेला देण्यात येते ती पुरवण्यात आली होती.

वरील कविताचे गर्भपातासंबंधीचे कागदपत्र दिलेले आहेत. कविता सुरेंद्र रेवतकर व तिची आई ललीता राउत हयांचे सहीनेच गर्भपात करण्यात आला होता. त्यांच्या मर्जीनुसार करण्यात आला होता. वरील दोन्ही स्त्रियांच्या मर्जीनुसार आम्ही पेशन्टचे गर्भपात केले आहे. व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येत आहे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

नागपूर
**दि. 31.3.2009**

**( विलास पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

Ageyord3.786–789